१८६९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# मण

## ४

श्रीपाद जोशी



REFBK-0017699

चेतक पुस्तके

# भारत भ्रमण

भाग

REFBK-0017699

लेखक

श्रीपाद जोशी

किंमत अडीच रुपये

चेतक पुस्तकें

चिराबाजार, मुंबई २

© श्रीपाद जोशी

पहिली
आवृत्ति
१५
ऑगस्ट
१९६९

मुद्रक
व० वा० खळे
जय गुजरात प्रिंटिंग प्रेस
गांवदेवी
मुंबई ७

प्रकाशक
वा० ग० ढवळे
चेतक पुस्तकें
चिराबाजार
मुंबई २

एकमेव विक्रेते
साहित्य सहकार संघ लि.
नायगांव क्रास रोड
दादर, मुंबई १४

अनुक्रम ................ दि: ........
क्रमांक ................ नोंद दि: ........
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

चि० डॉ० सदाशिव
रघुनाथ
ऊर्फ
गोपाळराव
जोशी
आणि
चि० सौ० डॉ० शैलजा
जोशी
ह्यांना
स्नेहपूर्वक....

# भ्रमणाची संधि

सन १९४९ पासून १९६० पर्यंत सतत बारा वर्षें दरसाल सर्वोदय संमेलनाच्या निमित्तानें भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशांत भ्रमण करण्याची संधि मला मिळाली. तत्पूर्वींही सन १९३८ पासून ह्या-ना-त्या कारणानें मी भारतांत भटकलों. अशा प्रकारें गेल्या दोन-अडीच तपांतील भारत-भ्रमणाच हा अहवाल वाचकांसमोर ठेवतांना मला आनंद होत आहे. ह्यांतील बहुतेक लेख त्या-त्या वेळीं वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. कांहीं लेख 'माझा देश माझे लोक' ह्या पुस्तकाच्या दोन खंडांत प्रसिद्ध झाले होते. आतां त्या सर्व लेखांचें नीट वर्गीकरण करून नेटक्या स्वरूपांत वाचकांसमोर ठेवण्याचें स्वप्न साकार होत आहे.

माझीं प्रवास-वर्णनें मुख्यत: माहिती देण्याच्या हेतूनें लिहिलेलीं असतात. आजकालचीं प्रवास-वर्णनें ही लघुनिबंधाच्या स्वरूपाचीं असतात. त्यामुळें कांहीं टीकाकार माझ्या प्रवास-वर्णनांना नाकें मुरडतात. परंतु सर्वसामान्य वाचकांनीं माझ्या प्रवासलेखांचें नेहमींच स्वागत केलें आहे. त्यांच्या ह्या आत्मीयतेमुळेंच मी हे लेख पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यास तयार झालों.

ह्यांतील कांहीं लेखांत तत्कालीन व्यक्तींचे व घटनांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामुळें ते कालबाह्य वाटण्याची शक्यता आहे. परंतु त्या संदर्भांत जी माहिती देण्यांत आली आहे व जी चर्चा करण्यांत आली आहे, तिचें ऐतिहासिक महत्त्व लक्षांत घेऊन ते लेख तसेच ठेवले आहेत.

कांहीं स्थळांना मीं एकाहून अधिक वेळां भेटी दिल्या आणि त्या-त्या वेळीं त्यांच्यासंबंधीं लिहिलें. ह्यामुळें एकाच स्थानासंबंधीं अधिक लेखही ह्या संग्रहांतून आढळतील. त्यांत क्वचित् कोठें पुनरुक्ति झाली असली, तरी

प्रत्येक लेखाची भूमिका व त्यांतील माहिती ह्यांत खूपच फरक आहे. म्हणून ते तसेच राहूं दिले आहेत.

भारताच्या भावनात्मक ऐक्याला हातभार लावावा हाही हे लेख लिहिण्यांतील एक हेतु. सारा भारत एक असल्याचें आपण बोलतों खरें, परंतु ह्या भारतांतील विभिन्न प्रदेश व तेथील रहिवासी ह्यांच्याविषयीं आपल्याला किती थोडी माहिती असते! ही माहिती नसेल, तर आपण आपल्या देशबांधवांवर प्रेम तरी कसें करणार? तेव्हां अशी माहिती आपल्या वाचकांना मिळवून द्यावी, ह्या हेतूनें मीं देशभर हिंडतांना जें निरीक्षण केलें, त्याचें चित्र ह्या लेखांतून पाहायला मिळेल. क्वचित् एखाद्या ठिकाणीं स्थानिक लोकांचे दोषही मीं दाखविले आहेत; परंतु ते तिरस्काराच्या, हेटाळणीच्या भावनेनें नसून, वाचकांसमोर सत्यचित्र मांडलें जावें, एवढ्याच हेतूनें. त्यावरून कोणी गैरसमज करून घेणार नाहीं, अशी आशा आहे.

साऱ्या भारतांतील महत्त्वाचीं स्थळें व लोकांच्या रीतीभाती ह्यांसंबंधींची ही माहिती संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी पडावी. ह्या मालेच्या वाचनानें भारताची व भारतीय लोकसमूहांची थोडीबहुत ओळख वाचकांना होऊं शकली, तर माझें उद्दिष्ट साध्य झालें, असें मी समजेन.

श्रीपाद जोशी

'श्रीरघुवंश', पुणें ४

स्वातंत्र्यदिन, १५ ऑगस्ट, १९६९

# अनुक्रमणिका


गुजरातच्या वाटेवर ९

बडोद्यांतील दोन दिवस १५

अहमदाबाद २१

आपला प्रेमळ शेजारी : सौराष्ट्र २८

सौराष्ट्राचें पुणें : भावनगर ३५

जैनांची मंदिरनगरी : शत्रुंजय ३९

जय सोमनाथ ४५

घेला सोमनाथ ५२

गांधीजींच्या जन्मभूमींत ५६

सौराष्ट्राची राजधानी : राजकोट ६१

जीर्ण दुर्ग : जुनागड ६३

सृष्टिसौंदर्याचें दर्शन घडविणारा गिरनार ७०

द्वारिका ७८

रमणीय, तसेंच उद्यमशील शहर : मोरवी ८५

कंडला बंदर ९०

# गुजरातच्या वाटेवर

## सत्याग्रहानें पारडीची प्रसिद्धि

२४ ऑक्टोबर, १९५५ ची रात्र. दहा वाजून गेले आहेत. बडोद्याला जाण्यासाठीं मी वलसाडच्या थर्डक्लास वेटिंग-रूममध्यें बसलों आहें. उकाडा होत आहे. डोक्यावर विजेचा पंखा फिरत असला, तरी त्याचें अस्तित्वही जाणवत नाहीं.

गाडीला बराच अवकाश आहे, ह्यामुळें मी लिहायला बसलों आहें. काल सायंकाळीं पॅसेंजरनें पारडीला आल्यापासून आतांपर्यंत पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींचा गुंता डोक्यांत अस्ताव्यस्तपणें पडलेला आहे. तो हळुवार हातानें सोडवायचा आहे.

पंडित सातवळेकरांचा ' आनंदाश्रम ' पारडी स्टेशनपासून जवळ जवळ दोन मैल दूर आहे. स्वाध्याय मंडळ तेथेंच आहे. स्थान मोठें रमणीय आहे. सभोवतीं आंब्यांचीं मोठमोठीं झाडें आहेत. छानशी बाग आहे. पूर्वीं ह्या ठिकाणीं मिशनऱ्यांचा अड्डा होता. त्यांच्याकडून ही जागा पंडितजींनीं विकत घेतली. किंमत भरपूर द्यावी लागली, पण गुजरातच्या धनिकांनीं चांगलें साहाय्य केलें. पंडित सातवळेकर आर्यसमाजी, वेदाभिमानी. हिंदूंनीं वेदांची शिकवण पाळली नाहीं म्हणून त्यांची अवनति झाली ; त्या गर्तेंतून वर यायचें असेल, तर पुन्हा वेदांनाच शरण गेलें पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. तें कांहींही असलें, तरी सातवळेकर पंडितजींबद्दल येथील लोकांमध्यें विलक्षण आदर आहे आणि त्यांचें, म्हणजेच स्वाध्याय मंडळाचें काम व्यवस्थित चालू आहे.

येथून तीन मासिकें निघतात. ' पुरुषार्थ ' ( मराठी ), ' वैदिकधर्म ' ( हिंदी ), ' वेदसंदेश ' ( गुजराती ). ह्यांचा खप कांहीं फारसा नाहीं.

पण वैदिक ज्ञानाचा प्रसार जनतेंत झाला पाहिजे, ह्या तळमळीनें तीं चालविण्यांत येत असल्यामुळें, रुपये-पैशांत त्यांच्या यशाचें मोजमाप करणें योग्य होणार नाहीं. संस्कृत भाषेच्या परीक्षाही येथून चालतात आणि दरसाल बारा हजारांपर्यंत विद्यार्थी ह्या परीक्षांना बसतात. अर्थात् ह्या परीक्षा तोट्यांत चालत नाहींत, हें सांगणें नलगे.

येथील इमारत ख्रिश्चन मिशनऱ्यांनीं बांधलेली असल्यामुळें पाश्चात्य सोयी मात्र छान आहेत. विशेषतः भरपूर खोल्या, संडास, बाथरूम, व्हरांडा, वगैरे गोष्टी कशा प्रशस्त आहेत. ज्या ठिकाणीं पूर्वीं किरिस्तांवांचें चर्च होतें, त्याच ठिकाणीं मूळच्या चर्चच्या पायावर सातवळेकरांनीं वेदमंदिर उभारलें आहे. तें लहानसेंच असलें, तरी टुमदार आहे. वेदांच्या किंवा सत्य-अहिंसेच्या मूर्ति तयार करून, त्यांची पूजा न करतां, येथें एका सुंदर कपाटांत वेद, कुराण, बायबल, अवेस्ता, वगैरे ग्रंथ ठेवलेले आहेत. दर शनिवारीं तेथें सामुदायिक प्रार्थना आणि पंडितजींचें प्रवचन होत असे. गांवांतील बरेच लोक ह्या कार्यक्रमाला हजर असत.

## गुजरात्यांचे नवे कारखाने

येथून जवळच गुजराती धनिकांनीं चालविलेला ' अतुल प्रॉडक्टस् ' हा प्रचंड कारखाना आहे. त्यांत नाना प्रकारचे रंग तयार करतात. पांच-सहा कोटि रुपये येथें आतांपर्यंत खर्च झाले आहेत. ' इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज ' चाही रंगांचा कारखाना येथें सुरू होणार आहे. मुंबईवर मराठी लोकांनीं अधिकार सांगायला सुरुवात केल्यापासून, तेथील कारखाने गुजरातेंत हलवावेत आणि नवे कारखाने गुजरातेंतच उभारावेत, अशी कल्पना गुर्जर धनिकांच्या डोक्यांत घोळूं लागली असेल, तर त्याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं.

ह्या भागांत पारडी नांवाचीं गांवें बरींच आहेत. त्यांच्यांत घोटाळा होऊं नये, म्हणून ह्या पारडीला ' किल्ला पारडी ' असें नांव देण्यांत आलेलें आहे, कारण ह्या पारडी गांवांत एक किल्ला आहे. वस्तुतः

त्याला किल्ला म्हणण्यापेक्षां मोटा वाडाच म्हटलें पाहिजे. त्याच्या भिंती अगदींच सामान्य व फुसक्या दिसतात. पण 'एरंडोऽपि द्रुमायते!' जेथें मोठा किल्ला नसेल, तेथें एखाद्या वाड्याला किल्ला म्हणायला काय हरकत आहे? पारडी गांवांतील घरें मात्र छान आहेत. मुंबईत मिळविलेला पैसा येथें असा सत्कारणीं लागला आहे. घरें आलीशान असलीं तरी गांवाला शाळा मात्र नाहीं, कारण गांवांतील कर्तबगार मंडळी बहुधा मुंबईतच असतात. गलिच्छपणा आपल्या देशाच्या पांचवीला पुजलेला आहे, तेव्हां पारडींतील घाणीबद्दल तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तरीही अनेक मराठी शहरांपेक्षां हें छोटेंसें शहर अधिक स्वच्छ आहे, असें मला वाटलें. गांवाबाहेरील तळें जरा जास्त गलिच्छ आहे. त्याचा पृष्ठभाग कमळांच्या पानांनीं व्यापून टाकला आहे हें खरें, पण हिंदुस्थानांतलें कोणतें तळें ह्याला अपवाद आहे?

पारडी गांवातला किल्ला जरी खेळण्यांतल्या किल्ल्यासारखा असला, तरी येथून जवळच एक खराखुरा किल्ला आहे. त्याला पारनेराचा किल्ला म्हणतात. सुमारें पुण्याच्या पर्वतीइतका उंच आणि माथ्यावर तेवढेंच क्षेत्रफळ असलेला हा किल्ला सिंहगड, रायगड, प्रतापगड ह्यांच्या तुलनेनें जरी इटुकला वाटला, तरी त्याची शान कांहीं और आहे, हें नाकारण्यांत अर्थ नाहीं. हा किल्ला पेशव्यांनीं बांधलेला आहे असें म्हणतात. शिवाजी-महाराज इंग्रजांच्या ताब्यांत असलेलें सुरत शहर लुटण्यासाठीं गेले, तेव्हां त्यांचा मुक्काम ह्या किल्ल्यावर होता, असेंही म्हणतात. ह्या भागांतील बहुतेक किल्ले मराठ्यांनींच बांधलेले असावेत असें दिसतें. अर्थात् कांहीं मुसलमानांनींही बांधलेले असतीलच. उद्यां अष्टमीला तेथें मोठी जत्रा भरणार आहे. मीं ती जत्रा पाहायला राहावें आणि नाच-गान करणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या तोंडून पेशव्यांच्या पराक्रमाचे पोवाडे (गुजरातींत) ऐकावेत, असा आग्रह मला करण्यांत आला, पण 'उद्यां सकाळीं बडोद्यास पोंचत आहें,' असें कळवून ठेवलेलें असल्यामुळें, मला जाणेंच भाग आहे. शिवाय उद्यांची जत्रा कशी

असेल, ह्याचा अंदाज आज पाहिलेल्या दृश्यांवरूनही करतां येण्यासारखा आहे. दुकानांची मांडामांड सुरू आहे. सोडा-लेमनच्या बाटल्या आल्या आहेत. करंगळीएवढ्या जाडीच्या उसाच्या गाड्या येऊन पडल्या आहेत, त्यांचा रस हे लोक पिणार! भिकारी नि महारोगी ह्यांनीं तर सर्वांच्या आधीं येऊन ठाण मांडलें आहे. महारोगी आपसांत गुजराती बोलत होते, पण त्यांचें रंगरूप आपल्याला परिचित असलेल्या गुजरात्यांसारखें नव्हतें. ते बहुधा रानीपरज-काळीपरज जातीचे गरीब आदिवासी असावेत. एकूण तयारी जय्यत दिसली.

किल्ला पर्वतीइतकाच उंच असला, तरी पर्वतीसारख्या ऐसपैस पायऱ्या नसल्यामुळें, चढतांना थोडें दमल्यासारखें वाटलें. लोकांनींच आपल्या सोयीसाठीं कच्च्या दगडमातीच्या पायऱ्या तयार केल्या आहेत, पण त्या अगदींच जुजबी आहेत. खालीं उतरतांना तर वाहाणा हातांत काढून घेऊनच उतरावें लागतें!

किल्ल्यावरून आजूबाजूचें दृश्य फारच सुरेख दिसतें. सागाच्या वृक्षांचें हिरवेंगार वन खालपासून वरपर्यंत चढत आलेलें आहे. थोड्याच अंतरावर दमणचा समुद्र दिसतो. ज्या 'पार' नदीमुळें 'पारडी' व 'पारनेरा' (पार नदीचें पाणी) हीं नांवें पडलीं, ती चिमुकली पण सततवाहिनी नदी नकाशावर काढलेल्या वाकड्या-तिकड्या रेषेसारखी दिसते. भाताचीं पिकून पिवळीं झालेलीं शेतें गालिच्यासारखीं दिसत नसलीं, तरी मोहक वाटतात. 'अतुल प्रॉडक्टस्'चा अवाढव्य विस्तार डोळ्यांत भरतो. एका बाजूला ऐसपैस पसरलेलें बलसाड दिसतें, तर दुसरीकडे छोटेंसें पारडी शहर. तरी पण डोळे पुनः समुद्रावरच जाऊन खिळतात आणि मावळतीच्या उन्हांत चमचमणारें त्याचें पाणी सारखें पाहातच राहावें असें वाटतें.

पण नुसतें समुद्राचें पाणी पाहून भागणार नाहीं. किल्लाही बघितलाच पाहिजे. आतां फार थोडा तट शिल्लक राहिला आहे. एखादा बुरूज थोड्याफार तटाच्या भिंतींना सावरून अंग चोरल्यागत उभा आहे, पण

सगळें अगदीं लुटुपुटीच्या लढाईसाठीं बांधल्यासारखें वाटतें. छोटासा बुरूज, इवलेसे तट नि ल्हानसे दरवाजे. ‘ शिवाजीमहाराज घोड्यावर बसून ह्या दारांतून पळून गेले ’ ( कोणाच्या हातावर तुरी देऊन कोण जाणे ! ) असें जेव्हां वाटाड्या सांगूं लागला, तेव्हां त्याची कींव करावीशी वाटली. त्या दारांतून एकटे शिवाजीमहाराजही जाऊं शकले नसते, मग घोड्यावर बसून जाण्याची गोष्टच दूर. वाटाड्या सांगत होता, “ हा इथें मारुती दिसतो ना, त्याच्या खालीं भुयारांत जाण्याची वाट होती, पण ती आतां बुजवून टाकली आहे. हें भुयार पारडी गांवांतल्या किल्ल्यापर्यंत गेलेलं आहे, पण तिथेंही त्याचं तोंड बुजवून टाकलंय् ! ” म्हणजे खरें-खोटें ठरवण्याची कटकटच मिटली.

किल्ल्यावर देवीचें एक भिकार देऊळ आहे. भिकार कां असेना, पण देऊळ आहे, ह्याचेंच त्या वाटाड्याला कौतुक वाटत होतें. तें देऊळ अलीकडेच कोणीं शेठजींनीं बांधलेलें आहे. देवीच्या मूर्ति नसून, तीन गोल दगड आहेत व त्यांना शेंदूर फासून चांदीचे डोळे लावले आहेत. एका अंधाऱ्या खडकांतही एक देवी आहे. बस्स. एवढेंच. दुपारी दोनला निघून, साडेचारला आश्रमांत परत आलों. धमणीचे बैल कमी सुस्त असते, तर वेळ आणखी कमी लागला असता. संध्याकाळीं गांवांतून चक्कर मारून आलों आणि जेवण करून एस्. टी. च्या बसनें बल्साडला यायला निघालों, कारण रात्रींच्या फास्ट गाड्या पारडीला थांबत नाहींत. एस्. टी. ची बस चांगली कोरी होती. ‘ सौजन्य हें आमचें कर्तव्य आणि आपला हक्क आहे ’, ‘ आपल्या गाडींत घाण करूं नका ’, ‘ गाडींत थुंकण्याची सक्त मनाई आहे ’, वगैरे बोधवचनें ह्या गाडींत लिहिलेलीं नव्हतीं. बहुधा येथील जनतेला त्यांची जरूरी नसावी.

## प्रांतरचनेंत लोकांना आस्था नाहीं

ह्या भागांतले मागस जमातीचे एक आमदार नुकतेच भेटले. “ राज्यपुनर्रचना मंडळाच्या अहवालाबाबत तुमचं काय मत आहे ? ”

असें त्यांना विचारलें असतां ते म्हणाले, " त्यांत आम्हांला कांहीं कळत नाहीं. आमचे पुढारी जें ठरवतील, तें आम्हांला मान्य. आमच्या गांवांत पाण्याची सोय आहे कीं नाहीं, शेतीसाठीं खतं, वगैरे मिळतात कीं नाहीं, शिक्षणाचा प्रसार होतो कीं नाहीं, वगैरे गोष्टींतच मी लक्ष घालतों. नि खरं सांगू तुम्हांला ? आमच्या गुजरातेंत सामान्य माणसाला ह्या राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नाविषयीं मुळींच आस्था नाहीं. इतके दिवस आपण महाराष्ट्राबरोबर प्रेमानें राहिलों, तर आतां न राहाण्यासारखं काय कारण घडलंय्, तें त्यांना कळत नाहीं. राज्य कोण करतंय् ह्याचं त्यांना महत्त्व नाहीं, त्यांच्या अडचणी दूर झाल्या म्हणजे झालं. "

## कूळकायद्यानें सर्वांचें असमाधान

"कूळ कायद्याच्या बाबतींत लोकांचं मत काय ?" असें विचारतां ते म्हणाले, " प्रारंभींचा कायद्याचा आराखडा बरा होता, पण नंतर त्यांत पाणी घालून तो इतका पातळ करण्यांत आला, कीं कुणाचंच समाधान होणार नाहीं त्यानें. सध्या तरी, तो तसाच चालवून पाहिला पाहिजे. "

रात्रीं १२ वाजतां मुंबई–अहमदाबाद जनता एक्स्प्रेस आली. गर्दी मुळींच नव्हती, पण मध्यरात्र झालेली असल्यामुळें लोकांनीं झोपून सगळ्या जागा अडवून टाकल्या होत्या. त्याना उठवणंही जिवावर आलें. एका बाकावर थोडीशी जागा रिकामी मिळाली. त्याच्यावर आसन ठोकलें आणि हळूहळू हातपाय पसरायला सुरुवात केली. मला गाडींत झोप येतच नाहीं, मग फर्स्ट क्लासमधून प्रवास असो, कीं एअरकंडिशन्ड डब्यांतून ! तेव्हां पाठीला ताण पडूं नये, एवढीच धडपड करतों मी.

ह्या जनतेचे डबे छान आहेत. स्वच्छता अगदीं दृष्ट लागण्यासारखी आहे. एकूण गुजरातेंत महाराष्ट्रापेक्षां स्वच्छतेचें प्रमाण जास्त आहे कीं काय, अशी शंका येते. फुकटे प्रवासीही फारसे दिसले नाहींत.

इतक्या पहाटे अपरिचित ठिकाणीं जाणें शहाणपणाचें नाहीं, असा विचार करून, मी बडोद्याच्या वेटिंग रूममध्यें लेखन करीत बसलों आहें. गायकवाडांच्या जमान्यांत मी येथें आलों होतों, १९४६

सालीं, पण त्या वेळचें कांहीं आठवत नाहीं आतां. कदाचित् मराठी पोलिसांची शान त्या वेळीं पाहायला मिळाली असेल. आजही हें स्टेशन कांहीं कमी आकर्षक नाहीं. मराठी लोक जरा कमी झाले असावेत, पण तसेंही म्हणणं योग्य होणार नाहीं. अशा अवेळीं येथले मराठी लोक कशाला येतील ? जे कोणी ह्या गाडीनें आले असतील, ते आपल्या घरीं निघून गेले असतील. मला मात्र उजाडेपर्यंत येथें बसायला पाहिजे ! हो, बसलेंच पाहिजे ! !

# बडोद्यांतील दोन दिवस

ग्वाल्हेर, इंदूर, बडोदें, झांशी, वगैरे महाराष्ट्राबाहेरील शहरांबद्दल मराठी लोकांना एक प्रकारचें विशेष आकर्षण वाटत आलेलें आहे. हीं शहरें वस्तुतः महाराष्ट्रांत नाहींत, अथवा महाराष्ट्राचीही नाहींत, परंतु आपली अशी एक समजूत होऊन बसलेली आहे, कीं तीं मराठीच शहरें आहेत. ह्यामुळें तेथील लोक, त्यांच्या संस्था, त्यांची भाषा ह्यांबद्दल आपल्याला नेहमींच आपलेपणा व जिव्हाळा वाटत आलेला आहे. होय, भाषेबद्दलही ! कांहीं महाराष्ट्रीय लोक बडोद्याच्या गुजराती-मिश्रित घेडगुजरी भाषेला हसत असतीलही, नाहीं असें नाहीं. कांहीं पुणेरी लोकांनीं ग्वाल्हेर-इंदूरच्या हिंदी-प्रभावित मराठीची टिंगलही केली असेल, परंतु सर्वसामान्य मराठी माणसाला ( त्यांत माझाही समावेश होतो ) त्यांच्या त्या भाषेचेंही कौतुक वाटतें. इतक्या दूर राहूनही त्यांनीं आपली मायबोली जतन करून ठेवली आहे, ह्याचा अभिमान वाटतो. महाराष्ट्राचें प्रतिनिधित्व जणूं तेथील लोक करीत आहेत, अशी आपली भावना असते.

ह्या भावनेनेंच मीं नडियादच्या गुजराती साहित्य-संमेलनाला जातांना ( ऑक्टोबर, १९५५ ) दोन दिवस हातार्शी ठेवून बडोद्याला

उतरलों आणि मराठी छंदःशास्त्राचे नामवंत विद्वान् डॉ. ना. ग. जोशी ह्यांच्याबरोबर दोन दिवस खूप मजेंत भटकलों. सुमारें दहा वर्षांपूर्वी आचार्य काकासाहेब कालेलकर तेथील साहित्य-संमेलनाचे अध्यक्ष असतांना मी सहकुटुंब बडोद्याला गेलों होतों. त्या वेळीं आम्ही उभयतां एका गुर्जर कुटुंबांत उतरलों होतों. त्या वेळचें बडोद्याचें एकूण वातावरण मात्र इतकें मराठीमय होतें, कीं आपण महाराष्ट्राबाहेरील एखाद्या शहरांत वावरत आहोंत, असा भासही होत नव्हता. खानदानी मराठमोळ्याची एक मोहक छाप साऱ्या राज्यकारभारावर आणि शहराच्या व्यवस्थेवर पडलेली अनुभवाला येत होती. ह्याच्या उलट ह्या खेपेस मराठी कुटुंबांत राहून, मराठी माणसांना भेटून आणि मराठींत संभाषण-सुख लुटूनही क्षणोक्षणीं आपण गुजरातेंत आहोंत, ही गोष्ट मनांतून जात नव्हती. पूर्वींचें सारें वातावरण पार बदलून गेलें होतें. मराठी माणसांतील तो खानदानी रुबाब कोठेंच दिसत नव्हता. उलट आज आपण येथें आहोंत, उद्यां येथें राहूंच असें नाहीं, अशा प्रकारची अनिश्चित मनोवृत्ति मला तेथें दिसली. जे लोक पूर्वी गुजरात्यांशीं अरेरावीनें व फटकून वागत होते, तेच आतां मराठीचा आग्रह सोडून, त्यांच्याशीं सर्व प्रकारें मिळतें घेण्याचा प्रयत्न करीत आहेत, असें मला वाटलें. अर्थात् ह्यांत दुःख करण्यासारखें कांहींच नव्हतें. लोकशाहीच्या जमान्यांत लोकांच्या तंत्रानेंच सर्व कारभार चालला पाहिजे असें आपण म्हणतों, मग ती गोष्ट उल्लेखित शहरांच्या बाबतींतच घडून येऊं नये, असें आपल्याला कसें म्हणतां येईल ?

## सुंदर इमारतींचें शहर

एके काळीं मराठ्यांनीं गुजरातवर राज्य केलें होतें, त्याचें स्मारक म्हणून बडोदें शहराकडे पाहाण्यास हरकत नाहीं.

वाईट गोष्टी भूतकाळांत जमा झाल्या असल्या, तरी चांगल्या गोष्टी मात्र अजूनही अभिमानानें मस्तक वर करून उभ्या आहेत. त्यांपैकीं

सुंदर इमारती व प्रेक्षणीय स्थळें ह्या मुख्य आहेत. बडोद्याची रचना मोठी सुरेख असून, तेथें अनेक प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. ज्या सुरसागर तलावाच्या कांठीं मी उतरलों होतों, त्याच्या कडेला असलेली न्यायमंदिराची इमारत मोठी शानदार वाटते. तिच्यासाठीं वापरलेल्या विटा परदेशांतून आणलेल्या असून, पौर्वात्य व पाश्चात्य स्थापत्यकलेचें सुंदर मिश्रण त्या इमारतींत झालेलें आहे. तिच्या समोरील कारंजें सुरू असलें, म्हणजे इमारतीची शोभा कांहीं औरच दिसते. पूर्वीचा भपका व टापटीप आतां तेथें आढळत नाहीं, तरीही मला ती इमारत फार आवडली. रात्रीच्या वेळीं सुरसागर तलावाच्या कांठावरील इमारतींतील दिवे लागले; म्हणजे त्यांचीं प्रतिबिंबें तलावांत पडतात आणि मोठें विलोभनीय दृश्य दिसूं लागतें.

ह्याखेरीज बडोदा विद्यापीठाची इमारत, भाजीमार्केटची इमारत, वगैरे इतर इमारतीही मोठ्या प्रेक्षणीय आहेत. सरकारी राजवाडे व इतर इमारती भरपूर असल्यामुळें गुजरातची राजधानी येथेंच करावी, असा कांहीं मंडळींचा प्रचार चालू होता.

## भव्य राजवाडे

बडोद्यांतील राजवाडे, वगैरे सरकारी मालकीच्या (आणि आतां राज्याच्या खासगी मालकीच्या) गोष्टी पाहाण्याकडे लोकांचा कल असल्यास आश्चर्य नाहीं. मात्र त्यासाठीं आधीं परवाना घ्यावा लागतो. हे राजवाडे पाहाण्याची वेळ सकाळीं ९ ते ११ व दुपारीं ३ ते ४॥ असते. ह्या अवधींत लक्ष्मीविलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजरबाग राजवाडा, सोन्याची बगी, चांदी-सोन्याच्या तोफा व चांदी-सोन्याच्या अंबाऱ्या ह्या गोष्टी पाहायच्या असतात. एकदा घेतलेला पास चार दिवस पुरत असल्यामुळें दूरदूर असलेले हे राजवाडे निवान्तपणें पाहून घेतां येतात. मजजवळ वेळ थोडा असल्यामुळें, त्यांपैकीं सर्वोत्कृष्ट समजला जाणारा इंडोसॅरसिनिक पद्धतीचा

लक्ष्मीविलास राजवाडा तेवढाच मीं पाहून घेतला. हा वाडा रुबाबदार असून, तेथील प्रचंड तैलचित्रें, पुतळे व दरबार हॉल ह्या गोष्टी विशेष प्रेक्षणीय आहेत. माझ्या मनावर छाप पडली, ती मात्र राजवाड्याच्या चौकांत ठेवलेल्या एका शिकाऱ्याच्या ब्रॉंझच्या पुतळ्याची. हा छोटासा पुतळा परदेशांतून आणलेला असून, त्यांतील नग्न रानटी शिकाऱ्याच्या चेहऱ्यावरील हावभाव आणि त्याच्या शरिराचा पीळ, हीं मनावर ठसून जातात. त्याखेरीज खूप मोठ-मोठे ब्रॉंझचे पुतळे वाड्यामध्यें आहेत. ह्या वाड्यासभोंवतीं खूप मोठी बाग असून, तिचें आवार खूप मोटें आहे. ह्यामुळें वाड्याला निसर्गाची सुंदर पार्श्वभूमि लाभलेली आहे.

## कीर्ति-मंदिर

नांवासाठीं आणि कीर्तीसाठीं माणूस किती धडपडतो हें पाहिलें, कीं अनेकदा मला हसूं येतें. अर्थात् त्यांतून कोणी सुटला आहे, असें मात्र मला कधीं वाटलें नाहीं.

ज्यांच्याजवळ खरी योग्यता नसते, पण पैसा असतो, ते लोक पैशाच्या जोरावर आपलें नांव अजरामर करण्याचा जो प्रयत्न करीत असतात, तो पाहिला, कीं अनेकदा हसावें कीं रडावें, तेंच कळत नाहीं. विशेषतः राजेरजवाड्यांना ह्या मार्गाबद्दल जास्त आकर्षण असतें, असें दिसून येतें. बडोद्याच्या राजघराण्यांतील मंडळींची कीर्ति कायम राहावी, ह्यासाठीं तेथें एक कीर्तिमंदिर बांधण्यांत आलेलें आहे. त्यांत मूळ कल्पकाचा उद्देश कांहीं सफल झालेला दिसत नाहीं, कारण तेथील राजघराण्यांतील लोकांच्या तसबिरींकडे फारच थोड्या लोकांचें लक्ष जातें. तेथें जाणारे बहुतेक सर्व लोक वरच्या मजल्यावरील भिंतींवर सुप्रसिद्ध बंगाली चित्रकार श्री. नंदलाल बसु ( बोस ) ह्यांनीं काढलेलीं चित्रें पाहाण्याकरितांच जात असतात. सुसंस्कृत अभिरुचीचे प्रेक्षक तर तीं चित्रें पाहून अत्यंत आनंदित होतात, ह्यांत शंका नाहीं. अशा प्रकारें ती इमारत गायकवाडांचें कीर्तिमंदिर न बनतां, नंदलालबाबूंचें कीर्तिमंदिर बनलेली आहे.

स्व. रवीन्द्रनाथ ठाकूर ह्यांच्या 'नटीर पूजा' ह्या कवितेचें नंदलालबाबूंनीं केलेलें चित्रण फार सुंदर आहे. मीराबाईचीं चित्रेंही छान आहेत. मला स्वतःला सर्वांत विशेष आवडलेलें चित्र, म्हणजे गांधारी व धृतराष्ट्र ह्यांचें. डोळ्यांना पट्टी बांधलेली गांधारी जितकी बोलकी वाटते, त्यापेक्षां पाठमोऱ्या आकृतीचा बलिष्ठ धृतराष्ट्र जास्त बोलका वाटतो. त्याच्या आकृतींतील रेषान्‌रेषा जणूं त्याच्या कुटिल स्वभावाचें प्रकटीकरण करीत असते. ह्या अंधानें खरोखरीच लोखंडी भीमाचा भुगा करून टाकला असेल, ह्याविषयीं मनांत शंकाही राहात नाहीं. हें चित्र पाहिल्यानंतर, माणूस इतर सर्व कांहीं विसरून, त्याचाच विचार घोळवीत परत फिरतो.

## विस्तीर्ण सार्वजनिक उद्यान

येथील सार्वजनिक उद्यान विश्वामित्री नदीच्या कांठीं सुमारें दीडशें एकरांत पसरलें असून, त्यांत येथील प्रसिद्ध पदार्थसंग्रहालय, पशुसंग्रहालय आणि चित्रसंग्रहालय हीं आहेत.

पशुसंग्रहालयांतील वाघच मुख्यतः पाहाण्यासारखे आहेत. येथें सिंह नाहीं. एक सिंहीण सारखी ओरडत आणि लोळत होती. तेथील रखवालदाराला आम्हीं विचारलें, "काय रे, ही असं कां करते आहे? तिला कांहीं आजारबिजार झालाय् कीं काय?" त्यावर तो हसून म्हणाला, "साहेब, इथं सिंह नाहीं ना, त्यामुळें ती अशी बेचैन झालीय्."

येथील पदार्थसंग्रहालय भारतांत अत्यंत उत्कृष्ट समजलें जातें. भारतीय कला व संस्कृति आणि लोक-जीवन ह्यांचें दर्शन येथें उत्कृष्ट घडतें. पशुपक्ष्यांचीं पेंढे भरलेलीं शरिरें येथें आहेत. संग-मरवरी व धातूचे पुतळे आहेत आणि चित्रें पाहातां पाहातां तर मन अगदीं थकून जातें. तेथील भडक रंगांतील रोरिकचीं चित्रें मीं दहा वर्षांपूर्वी पाहिलीं होतीं, तीं माझ्या स्मृतींत अजून ताजीं होतीं, तीं पुनः पाहून घेतलीं. इतर भारतीय व पाश्चात्य नव्या-जुन्या चित्रकारांचीं चित्रेंही सुंदर आहेत.

## अजस्र तिमिंगिलाचा सांगाडा

ह्या खेपेला एक नवीन चीज पाहायला मिळाली, ती म्हणजे एक अजस्र जलचराचा सांगाडा.

ह्याचें भारतीय नांव तिमिंगिल असून, इंग्रजींत त्याला व्हेल म्हणतात. हा प्राणी मासा नसून, तो सस्तन प्राणी आहे. हा दुर्लभ व आश्चर्यकारक प्राणी २८ नोव्हेंबर, १९५४ रोजीं बडोद्याजवळील महीसागर नदीच्या कांठीं पडलेला आढळला. तो बहुधा पुराच्या प्रवाहांत वर आला असावा आणि मग त्याला परत जातां आलें नसावें. त्याची एकूण लांबी ७१ फूट, २ इंच आहे. म्युझियमच्या तळघरांत हा सांगाडा ठेवलेला असून, त्यानें संबंध तळघर व्यापलेलें आहे. हा सांगाडा पाहाण्याची वेळ रोज दुपारीं फक्त ३ ते ४ असते. (शनिवारीं दुपारीं २ ते ३) ह्यामुळें अनेकांना त्याची माहितीही होत नाहीं.

हिंदुस्थानांत एवढा मोठा सांगाडा अन्यत्र कोठेंही नाहीं. हा सांगाडा जमिनीवर तसाच ठेवलेला नसून, लहान पितळी खांबांवर अधांतरीं ठेवलेला आहे. त्याचें तोंडच एवढें मोठें आहे, कीं त्यासाठीं सात खांब अडलेले आहेत. हें तोंड सुसरीच्या जबड्यासारखें दिसतें, पण त्यांत दांत दिसत नाहींत. त्याच्या छातीला १४ फासळ्या आहेत. तिमिंगिलाचा रंग अस्मानी होता. हाडांचा रंग मात्र हस्तिदंतासारखा भुरकट आहे.

## आणि तें ग्रंथालय

बडोद्याच्या विलीनीकरणानें जर कशाची सर्वांत जास्त हानि झाली असेल, तर ती तेथील मध्यवर्ती ग्रंथालयाची.

इतकें अद्ययावत् व मोठें ग्रंथालय मुंबई इलाख्यांत दुसरें नाहीं, असें म्हणतात, पण आतां त्याचें तें महत्त्व उरलें नाहीं. त्याला जिल्हा ग्रंथालयाचें दुय्यम स्थान प्राप्त झालेलें आहे. स्वतःच्या हातानें पुस्तकें निवडण्याची व वर्गणीशिवाय (जबाबदार माणसाच्या शिफारशीनंतर) घरीं पुस्तकें नेण्याची येथील पद्धत फार चांगली आहे. खालच्या मजल्यावरील पुस्तकांच्या जागेंत अंधार पडूं नये, म्हणून वरच्या

मजल्यावर घालण्यांत आलेली काचेची फरशी, वगैरे गोष्टीही आकर्षक आहेत.

येथील केमिकल वर्क्स, कलाभुवन, वगैरे गोष्टीही पाहाण्यासारख्या आहेत, पण आतां तशा गोष्टी इतरत्रही निर्माण झालेल्या असल्यामुळें, त्यांचें पूर्वीचें महत्त्व आतां उरलेलें नाहीं. ज्या गायकवाडांनीं ह्या शहराला इतकें भव्य व रुबाबदार स्वरूप आणून दिलें, त्यांची आठवण मात्र बडोदें सोडतांना झाल्याशिवाय राहात नाहीं !

# अहमदाबाद

## गुजरातचें पाटनगर — अहमदाबाद

लवकरच अस्तित्वांत येणाऱ्या महागुजरातची राजधानी बडोद्याला राहावी कीं अहमदाबादला, ह्याविषयीं गुर्जरबंधूंमध्यें त्या वेळीं चर्चा चालू होती. ह्याचें कारण असें, कीं राजधानीला आवश्यक असणाऱ्या इमारती बडोद्याला भरपूर आहेत. त्यामुळें राजधानी बनल्याबरोबर नवीन इमारतीसाठीं पैसा खर्च करावा लागणार नव्हता. परंतु सर्वसामान्य जनतेच्या मनांत मात्र अहमदाबाद किंवा अमदाबाद हेंच गुजरातचें पाटनगर ( राजधानी ) म्हणून शेकडों वर्षांपासून वसलेलें आहे. कारण पूर्वीच्या काळीं गुजरातची राजधानी येथेंच होती. आधुनिक काळीं कापडाच्या गिरण्या व व्यापार ह्यांमुळें अहमदाबादचें नांव लोकांच्या तोंडीं झालेलें असलें, तरी प्रेक्षणीय स्थळांच्या दृष्टीनें तेथील ऐतिहासिक वास्तूंकडेच आपल्याला जावें लागतें. तेथें शिल्पशास्त्राचे असे कित्येक अद्भुत नमुने आहेत, कीं ज्यांच्या तोडीच्या वास्तु इतरत्र पाहायलाही मिळणार नाहींत. हेंच ह्या शहराचें खरें वैभव ! अेड्विन ऑर्नाल्डनें ह्या शहरांतील स्थापत्याचें वर्णन ‘ जगांतील सर्वांत सुंदर लहान इमारतींचें

शहर ' ( दि फायनेस्ट लिटल बिल्डिंग्ज् इन् दि वर्ल्ड ) असें केलें आहे. ह्या इमारती आजकालच्या नसून, गेलीं चार-पांचशें वर्षें त्या येथें डौलानें उभ्या आहेत. सम्राट् अकबरशाहाच्या काळीं ह्या शहरांत एक हजार उत्कृष्ट मशिदी होत्या, असें अबुलफजलनें लिहून ठेवलें आहे. त्या काळीं ह्या शहराचें वैभव किती असेल, ह्याची कल्पनाच केलेली बरी. उत्तमोत्तम इमारती आणि मनोहर बागबगीचे ह्यांनीं शृंगारलेलें हें शहर शहाजहाननें आग्रा-दिल्लीच्या इमारती बांधण्यापूर्वीं, म्हणजे सतराव्या शतकापूर्वीं, हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ नगर होतें, असें इतिहास सांगतो. पूर्वीं ह्या शहराचीं नांवें ' आशावल ' आणि ' कर्णावती ' अशीं होतीं. इ. स. १४११ सालीं गुजरातचा स्वतंत्र सुलतान अहमद शाह ह्यानें ह्या नव्या शहराचा पाया घातला. तेव्हांपासून त्याला अहमदाबाद हें नांव पडलें. हा सुलतान स्वतः एक महात्मा होता. ह्यामुळें अजूनही त्याचें पीर म्हणून स्मरण करण्यांत येतें. तेव्हांपासून ह्या शहराचें वैभव सतत वाढतच होतें. आज ज्याप्रमाणें जगांतील सगळ्या वस्तु मुंबईत मिळतात, त्याप्रमाणें एके काळीं अहमदाबादमध्यें जगांतील एकूण एक वस्तु मिळत असत आणि सर्व जाती-जमातींचे व देशांचे लोक येथें राहात असत, असें अबुलफजलनें लिहून ठेवलें आहे. सर टॉमस रो ह्यानेंही इ. स. १६१५ सालीं असें लिहून ठेवलें आहे, कीं " अहमदाबाद हें लंडनइतकेंच मोठें शहर आहे." शहाजहाननें आपली सुंदर राणी मुमताजमहल हिच्या सहवासांत आपल्या लग्नानंतरचीं पहिलीं पांच वर्षें ह्या शहरांत विलासांत घालविलीं होतीं. ह्यावरून ह्या शहराचें आकर्षण किती मोठें असेल, ह्याची कल्पना येते. ह्या शहराची लोकसंख्या एके काळीं आठ लाख ( कांहींच्या मतें वीस लाख ) होती असेंही इतिहासकार सांगतात.

## मशिदींचें व कलाकुसरीचें आगर

अहमदाबादमध्यें पाहायची मुख्य वस्तु, म्हणजे वेगवेगळ्या मशिदी. इतक्या तऱ्हतऱ्हेच्या मशिदी, कलाकुसर आणि भव्यता ह्यांचा इतक्या

मोठ्या प्रमाणावरील संगम क्वचितच पाहायला मिळतो. अहमदाबादच्या बहुतेक मशिदींचे मनोरे इ. स. १८१९ च्या धरणीकंपामध्यें कोसळून खालीं पडले. पण जे मनोरे सध्या शिल्लक आहेत, तेही अद्भुत आणि प्रेक्षणीय आहेत. ह्या मशिदींचें स्थापत्य हिंदु-मुस्लिम संस्कृतीच्या मीलनाचें द्योतक आहे. कारण मशिदी जरी मुस्लिम राजकर्त्यांनीं बांधविलेल्या असल्या, तरी कारागीर हिंदुच होते. अर्थात् ही गोष्ट भारतांतील सर्वच मुस्लिम शिल्पांबद्दल म्हणतां येईल. परंतु अहमदाबादेंतील मशिदींमध्यें हिंदु स्थापत्याची छाप विशेष स्पष्ट दिसून येते. कांहीं मशिदींमध्यें हिंदु व जैन मंदिरांचे खांब, वगैरे अवशेषही जसेच्या तसे वापरलेले आढळून येतात.

## हिंदु-मुस्लिम बांधकामाचा संगम

अहमदाबादची जुम्मा ( जामी ) मशीद ही भारतांतील मोठ्यांत मोठ्या मशिदींपैकीं एक समजली जाते. ह्या मशिदींत हिंदु-मुस्लिम स्थापत्याचा सुरेख संगम झालेला आहे. आंतील बांधणी मुख्यतः हिंदु पद्धतीची असून, मुख्य दरवाजासमोरील खांबांवर हिंदु तोरण शोभेसाठीं कोरलेलें आहे. ह्यामुळें त्याला देवळाची शान आलेली आहे. मशिदीचें आवार ३८८ फूट, ९ इंच लांब व २४६ फूट, ८ इंच रुंद आहे. मशिदीच्या खुल्या चौकाचें क्षेत्रफळच मुळीं ८७,०९५ चौरस फूट आहे. मशिदींत एकूण २५६ खांब असून, ७५ मोठे चौकोनी खांब आहेत. ही मशीद पहिला सुलतान अहमदशाह ( इ. स. १४११ ते १४४२ ) ह्यानें १४२३ सालीं बांधली. हिचे दोन्ही मनोरे ‘ हलते मनोरे ’ म्हणून साऱ्या आशियांत प्रख्यात होते, पण १८१९ च्या धरणीकंपांत त्यांचा वरील भाग पडून गेला. जहांगीर बादशहाला अहमदाबाद शहर विशेष आवडलें नव्हतें, पण जुम्मा मशिदीच्या बांधणीवर मात्र तो बेहद्द खूष होता. ही मशीद गांवांतच भाजीबाजाराजवळ आहे.

## सिद्दी सैयदच्या मशिदींतील जाळ्या

अहमदाबादेंतील सर्वोत्कृष्ट कलाकुसर कोणती, असें मला कोणीं विचारलें, तर मी सिद्दी सैयदच्या मशिदींतील दोन दगडी जाळ्यांचें नांव घेईन. लाल दरवाजासमोरील सिद्दी सैयदची ही मशीद छोटीशीच आहे, पण तिच्या मागील बाजूच्या भिंतींत प्रकाशासाठीं सामान्य खिडक्या न करतां, झाडांच्या सुंदर आकृत्या कोरलेल्या दोन अद्भुत जाळ्या आहेत. ह्या जाळ्या कितीदा जरी पाहिल्या, तरी मनाची तृप्ति होत नाहीं. दहा वर्षांपूर्वी मीं अहमदाबाद पाहिलें होतें. त्या वेळच्या गोष्टींपैकीं फक्त ह्या दोन जाळ्याच माझ्या आठवणींत अगदीं ताज्या राहिल्या होत्या. दिल्लीला किंवा आग्र्यालाही अशी सुंदर दगडी जाळी पाहायला मिळत नाहीं, ही गोष्ट विद्वानांनीं मान्य केली आहे. ह्या जाळ्यांतून सूर्यप्रकाश येत असला, म्हणजे तर ह्यांचें सौंदर्य फार खुलून दिसतें.

## साठ फूट उंचीचा हलता मनोरा

सिद्दी सैयदच्या मशिदींतील जाळीइतकीच माझ्या लक्षांत राहिलेली दुसरी वस्तु, म्हणजे एकतोडानी मशिदींतील हलता मनोरा होय. सुमारें ६० फूट उंचीचा हा मनोरा वीट व चुना ह्यांनीं बांधलेला असून, एखादी पोलादी कांब लवलवावी तसा हलतो. ह्यावर प्रथम तर माझा विश्वासच बसेना, पण जेव्हां प्रत्यक्ष वर चढून स्वतःच्या हातांनीं हलवून पाहिला, तेव्हां खात्री पटली. वरून खालीं पाहातांना आधींच डोकें गरगरत होतें. त्यांत पुनः मनोरा हलूं लागल्यावर तर तोंडचें पाणी पळालें. क्षणाक्षणाला अशी भीति वाटे, कीं हा असा हलतांना एकदम ढासळून तर पडणार नाहीं ना? माझ्याबरोबर आलेले प्रसिद्ध गुजराती लेखक श्री. शिवकुमार जोशी मात्र खुशाल त्या हलत्या मनोऱ्याच्या सज्जांत बसून, अहमदाबादच्या गिरण्यांचीं धुराडीं मोजत होते. (तीं धुराडीं ८५ कीं ८४ असल्याचें त्यांनीं मला सांगितलें!) ह्या मनोऱ्याच्या जोडीचा दुसरा मनोराही हलत होता, परंतु आतां त्याचा

वरचा भाग उरलेला नाहीं. तो बहुधा धरणीकंपांत मोडून पडला असावा.

## पितळ व दगडावरील कोरीव काम

पितळ आणि दगड ह्यांवरील कोरीव कामाचे उत्तमोत्तम नमुने पाहायचे असतील, तर गांवाबाहेरील संत शाहआलमचा रोजा पाहावा. ह्याच्या प्रवेशद्वारावरील पितळी नक्षीकाम पाहातच राहावें, इतकें सुंदर आहे. ह्याचे मनोरेही कलाकुसरीनें परिपूर्ण असून, ते ९० फूट उंच आहेत. भूमितीच्या वेगवेगळ्या आकृत्यांनीं ह्या रोजाच्या भिंती शृंगारलेल्या असून, प्रत्येक आकृति स्वतंत्र आहे. ह्या सगळ्या जाळ्या दगडांत कोरलेल्या आहेत. त्यांचें वैविध्य पाहिलें, कीं मन आश्चर्यानें थक्क होतें.

## जैन मंदिरांतून कारागिरी कमी

अशा तऱ्हेच्या किती तरी मुस्लिम इमारती ह्या शहरांत आहेत. तीन दरवाजा आहे, भद्रचा किल्ला आहे, राणी रूपमतीची मशीद आहे, शेख हसन मुहंमद चिश्तीची मशीद आहे, राणी सिप्रीची मशीद व रोजा आहे, बीबी अचुत कुकीची मशीद व रोजा आहे, सिद्दी बशीरची मशीद आहे, पण सगळ्यांची नांवनिशी देणेंही शक्य नाहीं. त्याखेरीज एक दोन मंदिरेंही उल्लेखनीय आहेत. पैकीं १८५० सालीं बांधण्यांत आलेलें स्वामी नारायणाचें मंदिर अवाढव्य असलें, तरी कलाकुसरीच्या दृष्टीनें सामान्य वाटतें. दुसरें जैन मंदिर असून 'हठीसिंहनु देहरुं' नांवानें तें प्रसिद्ध आहे. शेठ हठीसिंह नांवाच्या गृहस्थांनीं १८४८ सालीं दहा लाख रुपये खर्चून तें बांधलेलें आहे. येथेंही पुष्कळच कोरीव काम केलेलें आहे, पण मशिदींवरील कोरीव कामांतील नाजूकपणा व विविधत्व येथें पाहायला मिळत नाहीं. पुष्कळ जैन मंदिरांत आढळणारा भपकेबाजपणा येथेंही दिसतो. कारागिरींतही एक प्रकारचा संयम असावा लागतो, त्याचा अभाव येथें चांगलाच जाणवतो.

## हौजे कुतुब किंवा कांकरिया तलाव

अहमदाबादमधील हवा खाण्याच्या ठिकाणांपैकीं हौजे कुतुब किंवा कांकरिया तलाव हें एक अत्यंत मनोहर ठिकाण आहे. सुलतान कुतुबुद्दीन अहमदशहानें इ. स. १४५१ च्या सुमारास हा तलाव बांधला. हिंदुस्थानांतील अशा प्रकारच्या बांधलेल्या सर्वांत मोठ्या तलावांमध्यें ह्याची गणना होते. प्रत्येक बाजू १९० फूट लांबीची, अशा ३४ समान बाजूंचा हा तलाव बनलेला आहे. ह्यानें ७२ एकर जमीन व्यापलेली आहे. तलावाच्या मधोमध नगीना-वाडी नांवाचा एक बगीचा असून तेथपर्यंत जाण्यास दगडी पूल आहे. येथेंही कलाकुसर भरपूर पाहायला मिळते. पूर्वीं ह्या तळ्यांत असंख्य मगरी होत्या. त्यामुळें आंत उतरणें धोक्याचें असे. आतां त्या मगरींचा नाश करून, तलावाची सफाई करण्यांत आलेली आहे. येथें बोटिंगची छान सोय आहे.

असाच दुसरा एक तलाव येथें आहे. त्याचें नांव चंडोला तलाव. हा गांवाबाहेर असून सहलीसाठीं येथें नेहमीं लोक येत असतात. ह्याचें सौंदर्य नैसर्गिक असून, तें कांकरियापेक्षां किंचित्‌ही कमी नाहीं.

## ओपन एअर थिएटर

येथील जुन्या गोष्टींप्रमाणें कांहीं नवीन गोष्टीही उल्लेखनीय आहेत. त्यांपैकीं ‘ ओपन एअर थिएटर ’ किंवा ‘ खुलें नाट्यगृह ’ हें एक आहे. ह्याला सात दारें असून, सुमारें चार हजार लोक एका वेळीं बसूं शकतील, एवढें तें मोठें आहे. जमिनीवर हिरवळ असल्यामुळें खुर्च्यांची गरज भासत नाहीं. शिवाय प्रेक्षक बसण्याची जागा उतरती असल्यामुळें, पुढें बसलेल्यांचा मागच्या लोकांना त्रास होण्याची भीति असत नाहीं. हें थिएटर अगदीं मामुली भाडें घेऊन कार्यक्रमास देण्यांत येतें.

## नवजीवन कार्यालय : नवी इमारत

महात्माजींचा साबरमती आश्रम, साबरमती नदीवरील गांधीपूल, पटेल पूल, वगैरे गोष्टीही प्रेक्षणीय आहेत. नवजीवन कार्यालयासाठीं

नुकतीच सात लाख रुपये खर्चून बांधलेली इमारतही पाहाण्यासारखी आहे. गांधीजींचें व गांधीजींविषयींचें साहित्य प्रसिद्ध करणारी भारतांतील सर्वांत मोठी संस्था म्हणून नवजीवनची प्रसिद्धि आहे. तिच्यातर्फे आतांपर्यंत गुजराती, हिंदी, इंग्रजी व मराठी ह्या भाषांत शेकडों पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. संस्थेचा स्वतःचा मोठा छापखाना असून, तो आतां ह्या नव्या इमारतींत आलेला आहे. कंपोजिंग खात्यांतला प्रकाश व स्वच्छता पाहून मनाला मोठी प्रसन्नता वाटते, तर सरदार वल्लभभाई पटेल ह्यांना मिळालेलीं मानपत्रें व भेटी ह्यांचा संग्रह पाहिला, कीं मन थक्क होतें. लाखों रुपये किंमतीच्या त्या वस्तु पाहात असतां, भारताच्या त्या कणखर नेत्याची मूर्ति डोळ्यांसमोर येते.

## वसंत-रजब-तलाव-स्मारक

अहमदाबादच्या हिंदु-मुस्लिम दंग्यांत स्वतःचें बलिदान करणारे देशभक्त वसंतराव हेगिष्टे आणि रजबअली लाखाणी ह्या हुतात्म्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बांधण्यांत आलेला पोहण्याचा तलाव अहमदाबादचें एक नवें आकर्षण म्हटलें पाहिजे. ह्या तलावांत अद्ययावत् सुखसोयी असून, रात्रींच्या वेळीं पाण्याखालून प्रकाश येण्याचीही व्यवस्था केलेली आहे. हुतात्म्यांच्या स्मृतीसाठीं एखादें दगडी स्मारक, स्तंभ, वगैरे उभारण्यापेक्षां अशा तऱ्हेची सर्वांना उपयोगी पडेल अशी गोष्ट करण्यांत, अहमदाबादच्या लोकांनीं औचित्य आणि व्यवहार साधलेला नाहीं, असें कोण म्हणेल ?

## ‘मजूर महाजन’ ची इमारत

अहमदाबाद कापडाच्या गिरण्यांचें शहर म्हणून प्रसिद्ध आहे. ह्यामुळें येथें मजुरांची एखादी संस्था असणें स्वाभाविकच आहे. येथील ‘मजूर महाजन’ मजुरांची प्रातिनिधिक संस्था असून, तिची इमारत मोठी छानदार आहे. गिरणीचे मालक व मजूर ह्यांच्यांतील मतभेद शांततेच्या मार्गानें दूर करण्याचा प्रयत्न ही संस्था करते. गिरणीमालकही

समंजस असल्यामुळें, वारंवार संप, हरताळ, वगैरे करण्याची पाळी येथील मजुरांवर येत नाहीं. महाराष्ट्रीय लोकांची वस्तीही येथें खूप आहे. ह्यामुळें मराठी माणसाला अहमदाबाद फारसें परकें किंवा अपरिचित वाटत नाहीं.

# आपला प्रेमळ शेजारी : सौराष्ट्र

चांगल्या गोष्टींचा चांगला परिणाम दिसून यायला देखील, विशिष्ट परिस्थिति विद्यमान असावी लागते. एखाद्या पौष्टिक पदार्थाचा किंवा शक्तिवर्धक औषधाचा परिणाम पाहायचा असेल, तर तो पदार्थ किंवा तें औषध नुकत्याच आजारांतून उठलेल्या व्यक्तीला दिलें पाहिजे. चांगल्या धडधाकट माणसावर त्याचा प्रभाव सहजासहजीं दिसून येणार नाहीं.

स्वातंत्र्याची गोष्टही अशीच आहे. आपल्या ह्या महादेशाला दीडशें वर्षांच्या गुलामीनंतर जें स्वातंत्र्य मिळालें आहे, त्याचा उत्कृष्ट परिणाम पाहायचा असेल, तर आधींच प्रगत असलेल्या प्रदेशांकडे न जातां, त्यांतल्या त्यांत मागासलेल्या प्रदेशांत गेलें पाहिजे. अशा एका प्रदेशांत मी नुकताच हिंडून आलों आणि युगानुयुगें सुप्त स्थितींत पडलेल्या येथील जनतेमध्यें स्वातंत्र्यानें कसें चैतन्य निर्माण केलें आहे, तें मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलें.

हा प्रदेश म्हणजे आपला शेजारी सौराष्ट्र होय. ह्या प्रदेशाचें सौराष्ट्र हें नांव जरी अत्यंत पुरातन असलें, तरी परवां-परवांपर्यंत त्याला काठियावाड किंवा काठेवाड असेंच म्हणण्यांत येत होतें. हें एखादें अखंड राज्य नव्हतें, तर दोनशेंदोन लहान मोठ्या संस्थानांचें विचित्र कडबोळें होतें. तीं संस्थानें तरी कसलीं ? बडोदा किंवा म्हैसूर ह्यांसारखीं पुढारलेलीं संस्थानें, काठेवाडांत नव्हतीं. भावनगर, राजकोट, गोंडल

ह्यांसारखीं चार-दोन त्यांतल्या त्यांत बरीं संस्थानें वगळलीं, तर बाकीचीं संस्थानें मध्ययुगांत वावरणारींच होतीं. त्या सर्वांना भारताच्या महासागरांत विलीन करून, भारताशीं एकजीव बनविण्याचें कार्य, भारताच्या त्या पोलादी महापुरुषानें – सरदार वल्लभभाई पटेल ह्यांनीं – मोठ्या चातुर्यानें केलें आणि १५ फेब्रुवारी, १९४८ रोजीं नव्या सौराष्ट्र प्रदेशाचा जन्म झाला. तेव्हांपासून ह्या छोट्याशा प्रदेशानें प्रगतीच्या दिशेनें जणूं घोडदौड चालविली आहे. ती पाहिली, कीं स्वातंत्र्याची संजीवनी लोकांमध्यें कसा उत्साह निर्माण करते, ह्याचा प्रत्यय येतो.

सौराष्ट्रांत हिंडत असतां, मला एकसारखी महाराष्ट्राची आणि त्यांतही रत्नागिरी ज़िल्ह्याची आठवण येत होती. तोच समुद्र किनारा, तीच नापीक नि खडकाळ जमीन आणि तेच काटक नि कणखर लोक. रत्नागिरीसारख्या डोंगरांच्या रांगा येथें नाहींत, पण गिरनार, पालीताणा, वगैरे लहान मोठे डोंगर खूप आहेत.

त्यापेक्षांही एक फार मोठें साम्य मला तेथें आढळलें. कोंकणच्या भरड जमिनींतून हिमालयासारखी प्रचंड कामगिरी करून दाखविणारीं माणसें जशीं निर्माण झालीं, तशींच सौराष्ट्राच्या नापीक जमिनींतून जागतिक नि राष्ट्रीय कीर्तीचे पुरुष उदयाला आले. गुर्जर साहित्यांतील जणूं ज्ञानेश्वरच, असा संत नरसी महेता सौराष्ट्रांतच जन्मला होता. जुनागडमधील नरसी महेतांचें मंदिर पाहातांना माझ्या महाराष्ट्रीय मनासमोर देहू-आळंदीचीं मंदिरें उभीं राहिलीं असल्यास काय आश्चर्य ? संतवर कबिरांनीं सांगून ठेविलें आहे :

**जाति न पूछो साधुकी, पूछि लीजिये ग्यान ।**

**मोल करो तलवारका, पडा रहन दो म्यान ॥**

आतां आपल्या देशांतून जातींचें उच्चाटन होऊं लागलें आहे, तेव्हां तो प्रश्नच उरलेला नाहीं, म्हणून मी ‘ जाति ’ ह्याऐवजीं ‘ प्रांत ’ किंवा ‘ भाषा ’ हा शब्द योजून हा दोहा म्हटला. कोणत्याही भाषेंतला आणि प्रांतांतला संत, महात्मा, साहित्यिक, कलाकार असला, तरी तो

माझ्याच भारतांतला आहे, माझाच आहे, ही भावना आतां उदयास येऊं लागली आहे. तिचा प्रत्यय मला सौराष्ट्रांत हिंडतांना पदोपदीं आला.

आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती सौराष्ट्रांतलेच होते. मोरवीजवळच्या त्यांच्या टंकारा गांवीं त्यांचें स्मारक होऊं घातलेलें आहे. विश्ववंद्य महात्मा गांधी तर सौराष्ट्राच्या भूमींतच लहानाचे मोठे झाले. राजकोटला असलेलें त्यांचें घर मीं पाहिलें आणि त्यांच्या भगिनींचें दर्शन घेतलें, तेव्हां माझ्या अंतःकरणांत भावनांनीं अगदीं गर्दी करून सोडली होती. पोरबंदरला ज्या घरांत बापूजींचा जन्म झाला, ती जागा आतां राष्ट्रीय स्मारक म्हणून सुरक्षित ठेवण्यांत आलेली आहे आणि तेथेंच कीर्तिमंदिर नांवाची एक भव्य इमारत बांधण्यांत आलेली आहे.

त्याखेरीज हरिजनांचे सेवक व मित्र कैलासवासी ठक्कर बाप्पा, प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. नानाभाई भट्ट, गुर्जर जनतेचे लाडके कवि कलापी, लोकसाहित्याचे अनन्य उपासक स्वर्गीय झवेरचंद मेघाणी, वगैरे डझनावारी नांवें सांगतां येतील. पाकिस्तानचे निर्माते पैगंबरवासी महम्मद अली जिना हे देखील सौराष्ट्राचेच निवासी होते आणि जेथें गांधीजींचा जन्म झाला, त्याच पोरबंदरजवळील पानेली गांवीं जिनांचाही जन्म झाला होता. हा योगायोग मजेशीर नाहीं, असें कोण म्हणेल ?

सौराष्ट्राची जमीन नापीक आहे, जवळ जवळ माळरानच म्हणायला हरकत नाहीं. शिवाय तेथल्या नद्याही अगदीं मामुली. त्यामुळें शेतीसाठीं पाण्याची टंचाईही भरपूर आहे, पण निसर्गावर मात करायचा सौराष्ट्रीय जनतेनें जणूं विडाच उचललेला आहे. नदी कितीही लहान असली, तरी तिला अडवायची, बांध घालायचा आणि तिचें पाणी सर्वत्र खेळवून सगळीकडे नंदनवन फुलवायचें, असा निश्चय तेथल्या जनतेनें केला आहे. त्याप्रमाणें १६ नद्यांवरील कामाला सुरुवात होऊन कांहीं कामें पुरींही झालीं आहेत. मी गेलों त्या वेळीं पालीताण्याजवळील

शत्रुंजी नदीवरील धरणाचा पाया घालण्यासाठीं भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू तेथें आलेले होते. केवळ शंभर मैल लांबी असलेल्या ह्या नदीवर साडेचार कोटि रुपये खर्चून बांधण्यांत यायच्या धरणामुळें एक लाख एकर जमिनीला पाणी मिळणार आहे. दुसऱ्या पंचवार्षीय योजनेच्या शेवटीं २२ कोटि, ८५ लाख रुपये खर्च करून अंमलांत येणाऱ्या धरण-योजनांमुळें सव्वापांच लाख एकर जमीन हिरवीगार होईल. हें भविष्याचें चित्र किती मनोहर दिसेल बरें!

एका बाबतींत सौराष्ट्र नि महाराष्ट्र ह्यांत मोठा फरक आहे. सौराष्ट्रांतला शेतकरी किंवा मजूर मराठी शेतकऱ्यापेक्षां अंगापिंडानें चांगला भरदार नि मजबूत आहे. मेर, रबारी, मियाणा, काठी, वगैरे वेगवेगळ्या जमातींतील लोकांचे पोषाखही मोठे रंगीबेरंगी नि रुबाबदार असतात. लंगोटी लावलेला अर्धनग्न शेतकरी किंवा गुराखी मला सौराष्ट्रांत कोठेंच दिसला नाहीं. सौराष्ट्रांतला सामान्य शेतकरी जितके कपडे वापरतो, तितके आपल्याकडल्या फारच थोड्या शेतकऱ्यांच्या अंगावर दिसतात.

सौराष्ट्रीय लोक खाण्यापिण्याच्या बाबतींत चांगले चोखंदळ आहेत. दूध, तूप नि तेल ह्यांची रेलचेल त्यांच्या जेवण्यांत असते. ह्याचा परिणाम म्हणूनच कीं काय, येथील लोकांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची तुकतुकी नि उल्हास दिसतो. केवळ पुरुषांच्याच नव्हे, तर बायकांच्या चेहऱ्यांवरही जीवनाविषयींचा आनंद ओसंडत असलेला पाहायला मिळतो. मोरवीजवळच्या एका खेड्यांत समाजविकास योजनेतर्फें चाललेला स्त्रियांचा रात्रींचा वर्ग पाहायची संधि मला मिळाली होती. दहा वर्षांच्या मुलीपासून पंचवीस-तीस वर्षांच्या बाईपर्यंत सर्व वयाच्या स्त्रिया त्या वर्गांत होत्या. अर्थात् बहुतेक विवाहित होत्या, हें सांगायला नकोच. नवीन-नवीन गोष्टी शिकण्याचा त्यांचा उत्साह नि मोकळेपणा पाहून मी तर थक्कच झालों. पांच-सात वर्षांपूर्वीं ह्याच स्त्रिया घराच्या चार भिंतींत कोंडून पडलेल्या होत्या आणि शाळेचें नांव घ्यायची

हिंमत त्यांच्यांत नव्हती, असें कोणीं सांगितलें, तर त्यावर आपला विश्वास बसणार नाहीं. दिवसभर शेतांत राबून येणाऱ्या स्त्रियांमध्यें शिक्षणाबद्दलचा इतका उत्साह असूं शकतो, ह्या गोष्टीवर स्वतः माझासुद्धा तोंपर्यंत विश्वास बसला नव्हता. स्वातंत्र्याचें वारें आतां कोठवर जाऊन पोंचलें आहे, ह्याचें जणूं तें प्रात्यक्षिकच होतें.

## आणि प्रेक्षणीय स्थळें ?

बावीस हजार चौरस मैलांच्या त्या छोटेखानी राज्यांत प्रेक्षणीय स्थळांचीही अगदीं रेलचेल आहे. सौराष्ट्राचीं वैशिष्ट्यें कोणतीं, ह्याविषयीं पुराणांत एक श्लोक आहे, तो असा :

**सौराष्ट्रे पंचरत्नानि नदी नारी तुरंगमाः ।**
**चतुर्थं सोमनाथश्च पंचमं हरिदर्शनम् ॥**

अर्थात् ह्यांतल्या सर्वच गोष्टी शब्दशः खऱ्या आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. येथल्या नद्या फारच सामान्य आहेत नि घोडेही विशेष मोठे आढळले नाहींत. आपल्याकडल्या भीमथडी तट्टांसारखींच घोडीं दिसलीं. स्त्रियांच्या विषयीं कांहीं बोलणें आधुनिक काळांत असभ्यतेचें लक्षण गणलें जातें, म्हणून त्याविषयीं कांहीं मत न देणेंच योग्य. राहातां राहिलीं दोन स्थळें. एक सोमनाथ नि दुसरी द्वारका. ह्यांपैकीं सोमनाथ हें भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून, त्याला ऐतिहासिक महत्त्वही खूप आलेलें आहे. सोमनाथच्या मंदिराचा विनाश हा हिंदु समाजाच्या ऱ्हासाचा श्रीगणेशा समजण्यास हरकत नाहीं. मात्र सोमनाथची पुनः स्थापना, ही जातीय किंवा धार्मिक दृष्टीची नसून, तिला एक लोकशाहीची महान् पार्श्वभूमि लाभलेली आहे. वेरावळ स्टेशनपासून सोमनाथपर्यंत मला घेऊन गेलेला टांगेवाला मुसलमान होता. त्याला मीं विचारलें, “ काय रे, सोमनाथचं देऊळ पुनः बांधायला सुरुवात झाली, तेव्हां तुम्हां मुसलमानांना मोठं दुःख झालं असेल नाहीं ? ” त्यावर त्यानें दिलेलें उत्तर मोठें लक्षांत घेण्यासारखें होतें. तो म्हणाला, “ यांत दुःख होण्याचं काय कारण ? हिंदूंचंच देऊळ होतं.

तें त्यांनीं परत घेतलं." ह्याचा अर्थ असा, कीं लोकशाहीचा नि सहिष्णुतेचा परिणाम त्या सामान्य टांगेवाल्याच्या मनावरही झाला होता. अर्थात् त्यांत त्याची धंदेवाईक वृत्ति मुळींच नसेल, असें म्हणतां येणार नाहीं. मीं त्याला विचारलें, "हा सोमनाथ मंदिराचा भाग जुनागडच्या नवाबाच्या ताब्यांत होता, तेव्हां तुम्ही सुखांत होतां, कीं आतां आहांत?" तो म्हणाला, "साहेब, तेव्हां आम्हांला भाडं मिळणंही मोठं मुष्किलीचं होई. आतां इतकीं माणसं इकडे येत असतात, कीं आम्हांला ओली कोरडी कां होईना, भाकरी खायला मिळते."

द्वारका तर काय बोलून चालून हिंदूंचें मोठें तीर्थक्षेत्रच. द्वारकेचें श्रीकृष्णाचें मंदिर मोठें भव्य आहे आणि तें अगदीं समुद्रकांठावर असल्यामुळें तेथली नैसर्गिक शोभाही अगदीं अवर्णनीय आहे. द्वारकेला गेल्याबरोबर लहानपणीं वाचलेल्या श्रीकृष्णाच्या कथा एकामागोमाग आठवूं लागल्या आणि थोडा वेळ मन पुराणकाळांत तल्लीन होऊन गेलें. पण श्रीकृष्णाच्या मंदिराच्या शिखराशीं स्पर्धा करणारीं सिमेंट फॅक्टऱ्यांचीं धुराडीं डोळ्यांसमोर येतांच, तें मन एकदम विसाव्या शतकांत आलें. सौराष्ट्रांत सिमेंट, पॉटरी, मीठ, वगैरे वस्तूंचे लहान-मोठे कारखाने आहेत आणि विजेचा पुरवठा जसजसा वाढत जाईल, तसतशी येथली कारखानदारी जोरानें फोफावणार, ह्यांत मुळींच शंका नाहीं.

सोमनाथ-द्वारकेप्रमाणेंच पालीताण्याजवळील शत्रुंजय टेकडी आणि जुनागडजवळील गिरनार पर्वत, हीं स्थानेंही अवश्यमेव पाहाण्यासारखीं आहेत. शत्रुंजय टेकडीवर केवळ जैनधर्मीयांचींच मंदिरें आहेत, तर गिरनारवर जैन व हिंदु ह्या दोन्ही धर्मांचीं देवळें आहेत. त्यांत अबूच्या पहाडावरील देवळांप्रमाणें कलाकुसर नसली, तरी त्यांची जागा इतकी उत्कृष्ट आहे, कीं केवळ तेवढ्यावरच माणूस खूष होतो. गिरनारवरून सभोवतालचें दृश्य इतकें मनोहर दिसतें, कीं तें पाहाण्यांत मन तल्लीन होऊन जातें आणि ३,६०० फूट उंच चढून गेल्याच्या

श्रमाचा परिहार होतो. सामान्य माणूस आपण होऊन अशा अवघड डोंगरावर चढणार नाहीं, तेथून दिसणारी सृष्टिशोभा पाहाणार नाहीं, निसर्गाचा खजिना लुटणार नाहीं, हें आधींच हेरून, आमच्या पूर्वजांनीं त्या ठिकाणीं देवळें बांधलीं नि त्या देवळांतल्या देवांचें दर्शन घेणें, अत्यावश्यक करून ठेवलें.

माझ्या मनावर जर सगळ्यांत कोणत्या गोष्टीचा ठसा विशेष उमटला असेल, तर तो सौराष्ट्रीय लोकांच्या वृत्तीचा नि वागण्याचा. गुजराती माणूस म्हटला, कीं त्याला रुपये-पैशांखेरीज दुसरी गोष्टच सुचत नाहीं, असा आपला समज झालेला असतो. ह्याला मी तरी कसा अपवाद असणार ? पण सौराष्ट्रांत पाऊल टाकतांच माझा भ्रमनिरास झाला. सौराष्ट्रांतही मोठमोठे व्यापारी आहेत आणि ते भारतांतच नव्हे, तर सिलोन, फिलिपाइन्स, आफ्रिका, वगैरे दूरदूरच्या भूभागांत जाऊन खोऱ्यांनीं पैसाही कमावतात, पण त्यांच्या ठिकाणीं विद्येची नि कलेचीही तितकीच आवड आहे. सध्या सौराष्ट्रांत दोन मोठे व्यापारी आहेत. आपण मिळविलेला पैसा शिक्षणापायीं नि त्यांतही स्त्रीशिक्षणापायीं खर्च व्हावा, ह्यांत त्यांना धन्यता वाटते. त्यांनीं दान केलेली रक्कम दोन-तीन कोटीपर्यंत गेलेली आहे, हें जेव्हां मीं ऐकलें, तेव्हां माझें मस्तक आनंदानें नि आदरानें आपोआप लवलें. स्वातंत्र्य आल्यापासून उठल्यासुटल्या सरकारच्या मदतीवर अवलंबून राहाण्याकडे आपला कल होऊं लागला आहे. अशा वेळीं स्वतःच्या पदराला खार लावून, समाजसेवा करणारे धनिक पुढें येतात, हें पाहून कोणाला आनंद वाटणार नाहीं ? महाराष्ट्रांत चालणारी विद्येची उपासना, संगीताचा नि चित्रकलेचा अभ्यास, वगैरे गोष्टींबद्दल सौराष्ट्रांतील लोकांच्या मनांत किती आदराची भावना आहे हें मीं पाहिलें, तेव्हां आपण करीत असलेल्या ज्ञानतपस्येचें महत्त्व नव्यानें माझ्या लक्षांत आलें.

येथील लोकांचें आतिथ्य ? त्याचा विसर तर मला कधींच पडणार नाहीं. मी जेथें जेथें गेलों, तेथें तेथें मला इतकें प्रेम मिळालें, कीं त्या

भाराखालीं मी दडपून गेलों. वस्तुतः भाषावार प्रांतरचनेच्या कटकटी चालू असतांनाच मी सौराष्ट्रांत फिरत होतों, पण महाराष्ट्राबद्दल किंचित्‌ही कटुतेची भावना मला कोठें आढळली नाहीं. कवि काय, कलावंत काय, शिक्षक काय नि सामान्य कारकून काय, सगळेजण इतक्या प्रेमळपणानें वागले, कीं त्यांच्याशीं आपली फार जुनी ओळख आहे, असें मला वाटूं लागलें. नैसर्गिक रीत्याच त्या प्रदेशाबद्दल आत्मीयता निर्माण झाली. सौराष्ट्रीय माणूस हा स्वभावानें मोठा दिलदार नि प्रेमळ आहे. जुन्या बंधनांच्या कवचांतून तो नुकताच बाहेर पडतो आहे, त्यामुळें थोडा बावरल्यासारखा अवश्य दिसतो, पण निसर्गाच्या सान्निध्यांत वाढलेलें त्याचें मन नि शरीर जीवनशक्तींनीं जणूं रसरसलेलें आहे. क्षुद्रपणा त्याला माहीत नाहीं. त्याचें तन गिरनार पर्वतासारखें कणखर नि मन पोरबंदरच्या समुद्रासारखें विशाल आहे. सौराष्ट्रांत फिरत असतां तेथील निसर्ग अधिक विलोभनीय आहे, कीं माणूस अधिक विलोभनीय आहे, अशी शंका मला वारंवार येई. असा उमदा शेजारी लाभल्याबद्दल कोणाला आनंद होणार नाहीं ?

# सौराष्ट्राचें पुणें : भावनगर

## सौराष्ट्राचें पुणें

महाराष्ट्रांत पुण्याचें, उत्तर प्रदेशांत काशीचें, गुजरातेंत बडोद्याचें, तामिळनाडांत मदुरेचें जें स्थान, तेंच सौराष्ट्रांत भावनगरचें मानलें जातें. सौराष्ट्राची राजकीय राजधानी जरी राजकोट असली, तरी त्याची सांस्कृतिक राजधानी भावनगरच होती व आहे. विद्या आणि कला ह्यांचें तें फार पूर्वीपासून माहेरघर आहे. राजकोटवर श्रीमंतांचा आणि राजेरजवाड्यांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. पूर्वी केवळ राजपुत्रांनाच

प्रवेश देणारें राजकुमार कॉलेज तेथें आहे, पण भावनगर हें मुख्यतः मध्यमवर्गीय, पांढरपेशा समाजाचा प्रभाव असलेलें शहर आहे. तेथील लोकांच्या स्वभावाचेंही पुण्याच्या लोकांच्या स्वभावाशीं खूपच साम्य आढळतें. व्यापार-उदीम करून पैसा मिळविण्यापेक्षां विद्या व कला ह्यांच्यांत प्रावीण्य मिळवावें, राजकारण खेळावें, साहित्य, काव्य, वगैरेंचा आस्वाद घ्यावा, इकडे त्यांची प्रवृत्ति अधिक दिसते. ह्या शहरांत महाराष्ट्रीय लोकांची संख्याही खूप मोठी आहे. नुसत्या मराठी पांढरपेशा लोकांचीच घरें शंभरांहून अधिक असतील. त्याखेरीज मजूर, वगैरेही पुष्कळ आहेत.

## निसर्गसुंदर ' बोर तलाव '

भावनगरच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांत भर घालणारा, शहराच्या बाहेर दोन-तीन मैलांवर असलेला ' बोर तलाव ' किंवा ' गौरीशंकर सरोवर ' हें स्थान निसर्गसौंदर्याच्या दृष्टीनें विशेष प्रेक्षणीय आहे. ह्याचें वैशिष्ट्य असें, कीं हें एका छोट्याशा टेकडीवर असून, टेकडी चढून वर जाईपर्यंत त्याचें अस्तित्व लक्षांत येत नाहीं. टेकडी चढून वर गेलें, कीं एखाद्या जादूगारानें नजरबंदी करून, सुंदर दृश्य उपस्थित करावें, तसा भास होतो आणि एक छोटेंसें मनोहर सरोवर आपल्या समोर अचानक उभें राहातें. ह्याच्या कांठावरच भावनगरच्या राजाची क्लबची इमारत आहे. तिचें दृश्यही छान दिसतें. एक शंकराचें देऊळ असून, भाविक लोक तेथें ऐपतीप्रमाणें कांहीं-ना-कांहीं ठेवीत असतात.

## गांवांतील तख्तेश्वर मंदिर

येथील लवण संशोधन संस्था, ( Salt Research Institute ), सर भावसिंहजी पॉलिटेक्निक इन्स्टिटयूट, गंगाजलिया मंदिर, वगैरे अनेक गोष्टी पाहाण्यासारख्या आहेत, पण मला जें सर्वांत अधिक आवडलें, तें म्हणजे तख्तेश्वर-मंदिर होय. हें मंदिर एका छोट्याशा कृत्रिम टेकडीवर बांधलेलें आहे. देऊळ शुभ्र संग-मरवरी दगडांचें असून, आंत महादेवाची पिंडी आहे. तख्तसिंह नांवाच्या राजानें

स्वतःचें नांव अजरामर करण्याच्या इराद्यानें तख्त (सिंहासन) ह्या फारसी शब्दाशीं ईश्वराचा समास करून, नवीन देवाची निर्मिति केली आहे. येथून भावनगर शहराची शोभा मात्र फारच छान दिसते.

## शामळदास कॉलेज

येथील शामळदास कॉलेज सौराष्ट्रांतील अत्यंत जुन्या कॉलेजांपैकीं एक आहे. १८८७ सालीं महात्मा गांधी मॅट्रिक झाल्यानंतर एक वर्षभर ह्या कॉलेजांत शिकत होते. त्या दृष्टीनें ह्या कॉलेजला एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झालेलें आहे.

## गांधी-मंदिर

सुमारें चौदा लाख रुपये खर्च करून गांधी-मंदिर नांवाची एक इमारत व संस्था उभारण्याचें कार्य येथें चालू आहे. आम्ही गेलों त्या वेळीं त्यापैकीं खादी एम्पोरियम् हा भाग तयार झाला होता आणि पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांच्या हस्तें त्याचें उद्घाटन झालें, त्या वेळीं मी तेथें होतों. ही इमारत अगदीं अद्ययावत् असून, मोठी प्रेक्षणीय आहे. येथें गांधी-साहित्याची व अन्य आनुषंगिक ग्रंथांची एक मोठी लायब्ररी बनणार आहे. गांधीवादी विचारसरणीचें अध्ययन व संशोधन करण्याच्या उद्देशानें हें केंद्र स्थापन करण्यांत आलेलें आहे. खादी व ग्रामोद्योगाच्या वस्तूंचें एक कायमचें प्रदर्शन, विक्रीकेन्द्र, वगैरे विभागही येथें राहाणार आहेत.

## 'सप्तकला'चें कार्य

येथील मुक्कामांत 'शिशुविहार' ह्या संस्थेतर्फे रात्रीच्या वेळीं ओपन एअर थिएटरांत झालेला 'सप्तकला' ह्या संस्थेचा कार्यक्रम पाहाण्याची संधि मला मिळाली. त्या निमित्तानें ह्या दोन्ही संस्थांची माहिती मिळवितां आली. ती उद्बोधक असल्यामुळें येथें देत आहें. 'शिशुविहार' हें जरी लहान मुलांच्या संस्थेचें नांव असलें, तरी त्यांत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचा समावेश होतो. क्रीडांगण, वाचनालय,

व्यायामशाळा, राष्ट्रभाषा-प्रचार, प्रौढ-शिक्षण ( साक्षरता-प्रसार ), वगैरे अनेक कामें ह्या संस्थेतर्फे केलीं जातात. उघड्या नाट्यमंदिराची छोटीशी इमारत व तिच्या बाजूच्या खोल्या, ह्या श्रमदानानें बांधण्यांत आलेल्या आहेत आणि हें श्रमदान केवळ शहरी पांढरपेशा लोकांनीं केलेलें नसून, बंदरावर काम करणाऱ्या मजुरांनीं रात्रीच्या वेळीं, मोठ्या हौशीनें केलेलें आहे. येथील शिस्त मोठी वाखाणण्यासारखी दिसली.

दुसरी संस्था म्हणजे ' सप्तकळा. ' ह्या संस्थेचे संचालक श्री. जगदीश वीराणी हे नुकतेच हृदयविकारानें निधन पावले. ते मोठे हरहुन्नरी होते. गायन, वादन, नृत्य, अभिनय, चित्र, शिल्प व फोटोग्राफी इतक्या सात कला ते स्वतःच शिकवीत असत. ह्या सात कलांमुळेंच संस्थेचें नांव त्यांनीं ' सप्तकळा ' असें ठेवलें होतें. सौराष्ट्र सरकारनें ह्या संस्थेला मान्यता दिलेली आहे. श्री. वीराणी हे कविही होते आणि लोकगीतांच्या स्वरांचा उपयोग आपल्या भावगीतांत ते करीत असत. मॅंडोलिन वाजविण्यांत ते विशेष कुशल असल्याचें मला आढळलें. महाराष्ट्राच्या तुलनेनें सौराष्ट्रांत संगीत-साधना पुष्कळच कमी आहे. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न ही संस्था करीत आहे.

## कलावंतांचें माहेरघर

भावनगर हें पूर्वीपासून कलोपासनेचें एक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. येथील अनेक कलावंतांनीं सौराष्ट्राबाहेर जाऊन उत्तम नांव कमावलें आहे. येथील रहिवासी श्री. यशवंतराय पुरोहित हे सध्या मुंबईला असून, ते अखिल भारतीय कीर्तीचे गायक आहेत. श्री. हरिभाई मोहनलाल शर्मा हे उत्कृष्ट व्हायोलिनवादक म्हणून प्रसिद्ध आहेत. श्री. हरिभाई त्रिवेदी हे मान्यता पावलेले शिक्षणतज्ज्ञ असून, ते ' घरशाळा ' नांवाचें मासिक चालवीत असतात. श्री. झवेरचंद्र मेघाणी हे प्रसिद्ध कथालेखक व लोकसाहित्यतज्ज्ञ येथलेच होते. प्रो. विजयराय वैद्य, श्री. मुकुंद पाराशर्य, श्री. नाथालाल दवे, वगैरे साहित्यिक व कवि येथीलच आहेत. परंतु सर्वांत महत्त्वाचा भाग चित्रकारांचा आहे.

श्री. सोमालाल शाह हे प्रसिद्ध चित्रकार येथेंच राहातात. ते पशुपक्ष्यांचीं व ग्रामीण जनतेचीं चित्रें रेखाटण्यांत सिद्धहस्त आहेत. त्यांचे शिष्य श्री. विनायक पंड्या हे मुंबईंत व श्री. मार्कंड भट्ट बडोद्यांत कलाविद्यालयांत मोठ्या हुद्द्यावर काम करीत असतात. श्री. रविशंकर रावळ, श्री. वनराज माळी, श्री. खोडीदास परमार, वगैरे चित्रकारही अत्यंत प्रसिद्ध आहेत. ह्या सर्व कलावंतांमुळें ह्या शहरांत कलेचें एक सुंदर वातावरण निर्माण झालेलें दिसतें.

# जैनांची मंदिरनगरी : शत्रुंजय

## मंदिराच्या प्रेमांतून कलाकृति

भारतामध्यें जैन लोकांइतकें मंदिराचें प्रेम, किंबहुना वेड, इतर जमातींत क्वचितच पाहायला मिळतें. ह्या प्रेमांतून अबू किंवा हळेबीडसारख्या अप्रतिम कलाकृति जरी थोड्याच निर्माण होत असल्या, तरी भारतीय शिल्पकलेच्या विकासामध्यें ह्या मंदिरांचें फार मोटें स्थान आहे, हें कबूल करावें लागेल. जैनांचीं अनेक तीर्थक्षेत्रें पर्वतांवर व टेकड्यांवर वसलेलीं आहेत आणि ह्या टेकड्या-पर्वतांचें स्वतःचें एक सौंदर्य असतें. ह्यामुळें जेथें मंदिरांमध्यें कांहीं वैशिष्ट्य नसेल, तेथें डोंगरांवरून दिसणाऱ्या सुंदर दृश्यांची मेजवानी तरी आपल्या डोळ्यांना हटकून चाखायला मिळते. भारतामध्यें गिरनार, अबू, शत्रुंजय, संमेत शिखर व तरिंग हे पांच डोंगर जैन लोकांनीं पवित्र मानलेले आहेत. त्यापैकीं शत्रुंजय व गिरनार ह्या स्थानांना भेट देण्याची संधि मला नुकतीच मिळाली आणि डोंगर चढून वर जातांना झालेले श्रम क्षणांत विसरून जाण्याइतका मोह वरून दिसणाऱ्या दृश्यांनीं माझ्या मनाला पाडला एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या वैशिष्ट्याची कल्पना येईल.

भारतांत डोंगरांना तुटवडा नाहीं, पण त्यांपैकीं सर्वोत्कृष्ट डोंगर निवडणें ह्या गोष्टीलाही महत्त्व आहेच. ह्या बाबतींतील सर्व श्रेय जैनधर्मीयांना दिलेंच पाहिजे.

## तीस मैल जायला रेल्वेला चार तास

'शत्रुंजय' हा शुद्ध उच्चार झाला. इतकी संस्कृतनिष्ठा सामान्य लोकांना कोठली! त्यांनीं त्याचीं रूपें 'शेत्रुंजय', 'शेत्रुंजा', 'छेत्रुंजा', अशीं केलीं आहेत. ह्यामुळें टांगेवाला 'छत्रुंजा' असेंच म्हणतो. हा शत्रुंजय डोंगर पालीताणा शहराच्या दक्षिणेस एक मैलावर आहे. पालीताणा हें शहर भावनगरपासून अवघें तीस मैल आहे. अर्थात् भावनगरला जातांना वाटेंत सिहोर नांवाचें जें जंक्शन् लागतें, तेथूनही पालीताण्याला जातां येतें आणि मुख्य रेल्वेमार्गावरील सोनगढ स्टेशनपासूनही मोटारीनें जातां येतें. मी आधीं भावनगरला गेलों होतों, म्हणून तेथूनच पालीताण्याला गेलों. मात्र ह्या भागांतील वाहतुकीचीं साधनें, विशेषतः रेल्वे, इतकीं अव्यवस्थित आहेत, कीं ह्या तीस मैलांच्या प्रवासासाठीं मला पहाटेपासून रात्रीपर्यंतचा संबंध दिवस खर्च करावा लागला. गाडी इतकी हळू चालते व वाटेंत इतका वेळ थांबते, कीं तीस मैल जायला तिला चार तास लागतात.

## शत्रुंजय डोंगर

पालीताण्यापासून शत्रुंजयाच्या पायथ्यापर्यंत टांगे मिळतात. पायथ्याशीं पोंचल्यानंतर सुमारें दोन हजार फूट (१९७७ फूट) उंचीचा डोंगर समोर दिसूं लागतो. त्याच्यावर झाडेंझुडपें मुळींच दिसत नाहींत. क्वचितच एखादें बाभळीचें झाड असलें, तर असायचें. असा हा खडकाळ डोंगर जैनांनीं कां पसंत केला असावा, अशी शंका मनांत येते, पण वर जाऊन पाहिल्यानंतर ही शंका आपोआप विरघळून जाते.

## सहा हजार अरुंद पायऱ्यांची चढण

मीं सकाळीं पावणे अकरा वाजतां, ऐन उन्हांत, डोंगर चढण्यास सुरुवात केली. उन्हाचा खूप त्रास होईल, असें वाटलें होतें, परंतु

वेळेच्या अभावीं मला त्याच वेळीं डोंगर चढणें भाग होतें. ह्या डोंगरावर चढण्यासाठीं नुकत्याच नवीन पायऱ्या बांधण्यांत आलेल्या आहेत. ह्या पायऱ्यांची उंची पुरी साडेपांच इंचही नाहीं. त्यामुळें वृद्ध व अशक्त लोकांना वर चढण्यास मुळींच त्रास होत नाहीं. अशा सुमारें सहा हजार पायऱ्या आहेत, पण त्या फारच पसरलेल्या असल्यामुळें, त्या मानानें उंचीचा त्रास होत नाहीं.

मी गेलों तेव्हां चातुर्मासाचे दिवस होते. त्या दिवसांत जैन लोक यात्रा करीत नाहींत. ह्यामुळें वर चढणारे फारसे कोणी नव्हते. डोंगरावर असणाऱ्या एका पेढींतील कारकून रोजचें टपाल घेऊन वर चालला होता. त्याची सोबत मला मिळाली. त्यानें एक-दोन ठिकाणीं मधले रस्ते (जुने) दाखविले, त्यामुळें पायऱ्यांचा त्रास थोडा चुकला.

ऐन दुपारची वेळ असली, तरी थंडगार वारें झुळझुळ वाहात होतें. ह्यामुळें उन्हाचा त्रास फारसा झाला नाहीं, म्हणजे जाणवला नाहीं. मध्यें एक-दोन ठिकाणीं थंड पाणी प्यायला मिळालें, त्यामुळें उरलेली चढण उत्साहानें चढून गेलों.

## मुसलमान वाटाड्याचा सर्वत्र संचार

माझा वाटाड्या एक मुसलमान छोकरा होता. त्याचें नांव अकबरशाह अलीशाह. काळासांवळा नि मोठा हुशार पोऱ्या होता. हरिजनांना आपल्या मंदिरांत प्रवेश न करूं देणारे जैन, ह्या मुसलमानाला आपल्या देवळांतून कसें हिंडूं देतात, ह्याबद्दल मला वाटलेलें आश्चर्य, मीं त्याच्याजवळ व्यक्त करतांच तो म्हणाला, “साहेब, मी दर्ग्याच्या सेवेला राहिलोंय्. मी मांसमच्छर खात नाहीं, म्हणून मला जैनांच्या मंदिरांत जातां येतं.”

म्हणजे मांसमच्छर खाणें हें पवित्र नाहीं, अशी कल्पना मुसलमानांतही रूढ आहे तर!

## पहिलें नमन अंगार शाह पिराला

शत्रुंजय डोंगरावर चढतांच प्रथम अंगार शाह पिराचा दर्गा लागतो. येथून खालच्या पालीताणा शहराचें व आसमंतांतील प्रदेशाचे दृश्य फारच सुंदर दिसतें. विशेषतः सपाट मैदानांतून एखाद्या रजत प्रवाहाप्रमाणें वाहाणारी शत्रुंजी नदी तर मनाला मोहूनच टाकते.

## पिरानें अल्लाउद्दिनाला परतावलें

ह्या अंगार शाह पिरासंबंधींची दंतकथा मोठी उद्बोधक आहे. असें सांगतात, कीं अल्लाउद्दीन खिलजीनें शत्रुंजयावरील जैन मंदिरें उध्वस्त करण्यासाठीं ह्या डोंगरावर चढाई केली होती. त्या वेळीं येथील मुस्लिम साधूनें त्याला निरोप पाठविला, " क्या दीन, क्या जैन, सब एक हैं ! तुम इन मंदिरोंको मत तोडो ! मैं इनका रखवाला हूँ ! " ( दीन म्हणजे धर्म, इस्लाम ) पण धर्मांध अल्लाउद्दिनानें त्या महात्म्याचें म्हणणें ऐकलें नाहीं आणि आपलें सैन्य डोंगरावर चढविण्यास सुरुवात केली. त्याबरोबर पिरानें वरून फौजेवर अग्निवर्षाव केला. निखाऱ्यांच्या त्या माऱ्यापुढें अल्लाउद्दीनची फौज टिकाव धरूं शकली नाहीं आणि अशा प्रकारें शत्रुंजयाचें रक्षण झालें. तेव्हांपासून ह्या पिराला ' अंगार शाह पीर ' असें संबोधण्यांत येऊं लागलें.

## लाकडी पाळणे व अवयवांचा ढीग

मुस्लीम पीर व त्यांचे दर्गे ह्यांनीं आमच्या जनजीवनांत किती खोलवर प्रवेश केला आहे, ह्याची प्रचीति येथेंही येते. ह्या पिरावर चांदीचे अनेक लहान-लहान पाळणे चढविलेले दिसत होते. लाकडी पाळण्यांची संख्या तर अगणित होती. शेजारची एक खोलीच अशा छोट्या लाकडी पाळण्यांनीं भरली आहे. त्यासंबंधीं चौकशी करतां असें कळलें, कीं ज्यांना मुलें होत नाहींत असे स्त्री-पुरुष येथें येऊन, पिराला नवस मागून घेतात आणि मूल झाल्यानंतर त्याला एक पाळणा वाहातात. कोणी लाकडी, तर कोणी सोन्या-चांदीचा. तसेंच ज्यांचे

हात-पाय अधू असतात, तेही लोक नवस मागून घेतात आणि गुण आल्यानंतर लाकडाचे हात-पाय करून पिराला वाहातात. असे शेकडों हातपाय येथें पडलेले दिसले.

ह्या भागांत मोर खूप आहेत. ह्यामुळें मोरपिसांचेच झाडू सगळ्या देवळांतून पाहायला मिळतात.

## जिकडे पाहावें तिकडे देवळेंच देवळें

अंगार शाह पीर पाहून झाल्यानंतर प्रत्यक्ष शत्रुंजयाच्या मंदिरनगरींत आपण प्रवेश करतों. जिकडे पाहावें तिकडे देवळेंच देवळें दिसतात. ह्याचें कारण जैनांचें मंदिरवेड हें तर आहेच, पण दुसरें कारण, म्हणजे शत्रुंजय डोंगरावर देऊळ बांधणें, हें अत्यंत मोठें पुण्यकार्य समजलें जातें. ह्यामुळें ज्याला ज्याला शक्य असेल, तो तो आपल्या नांवाचें एक देऊळ येथें बांधतो. ह्या ठिकाणीं सुमारें नऊशें (८६३) देवळें आहेत. ह्यावरून देवळांची किती गर्दी झाली असेल, ह्याची कल्पना येईल. ह्यांपैकीं कांहीं देवळें ११ व्या शतकांतील आहेत, असें सांगण्यांत येतें, परंतु त्यांत फारसें तथ्य नाहीं, कारण १४ व्या-१५ व्या शतकांतील मुस्लिम आक्रमकांनीं येथील बहुतेक मंदिरें धुळीस मिळविलीं होतीं. ह्यामुळें हीं मंदिरें १६ व्या शतकापासूनचीं आहेत, असें समजण्यास हरकत नाहीं.

येथील मंदिरांमध्यें कला किंवा सौंदर्य ह्यांचा मात्र अभावच जाणवतो. आपल्या ऐश्वर्याचें प्रदर्शन करण्याच्या भरांत, आपण कलेची हानि करीत आहोंत, ह्याची कल्पनाही येथें देवळें बांधणाऱ्या शेठजींना येत नसावी, असें दिसतें. कलारसिकाला वाटतें, 'काय हा पैशाचा अपव्यय!'

## मोती शाह शेठनी टूक

पूर्वीं ह्या डोंगराचे दोन भाग पडलेले होते. मध्यें एक खिंड होती. तिला 'कृतासन गाळा' असें म्हणत. ह्या खिंडीमध्यें वरून पाहिल्यास हत्तीही चिमणीएवढा बारीक दिसे, असें म्हणतात. डोंगरावर नवीन

देऊळ बांधण्यास जागा शिल्लक उरली नाहीं, तेव्हां ह्या खिंडीचा उपयोग करण्याचें एका मोठ्या धनिकानें ठरविलें. त्याचें नांव मोती शाह. त्यानें आपल्या दिवाणजीला सांगितलें, "आ गाळाने तमे पाणाथी न भरी शको, तो नाणाथी भरी दो." (ही खिंड दगडांनीं भरतां आली नाहीं, तर नाण्यांनीं भरून टाका.) त्याप्रमाणें अक्षरशः लाखों रुपये खर्च करून ही खिंड भरण्यांत आली. हें काम करीत असतां १२ हजार रुपयांची नुसती दोरीच लागली, असें अकबर शाह सांगत होता. त्यांत अतिशयोक्ति नसावी. आतां त्या ठिकाणीं मोती शाहची ट्रूक (ट्रूक म्हणजे शिखर) आहे आणि दोन्ही डोंगर एकमेकांना जोडले गेले आहेत.

## तुम्ही पापी कीं पुण्यवान पाहातां येतें

आपण पुण्यवान् आहोंत कीं नाहीं, हें तपासून घेण्याची सोयही येथें करण्यांत आलेली आहे. उभ्या सांडणीची (उंटीण) एक दगडी मूर्ति आहे. तिच्या पायांखालून जो जाईल, तो पुण्यवान् असें समजलें जातें. पापी माणसाला त्या लहानशा जागेंतून पलीकडे जातां येत नाहीं. मीं त्या सांडणीच्या पोटाखालून सहज पलीकडे गेलों आणि अकबर शाहाला विचारलें, "काय रे, तुझासुद्धा ह्या जादूवर विश्वास आहे काय?" तो नुसता हसला.

## चौमुखजीचें भव्य मंदिर

येथें महत्त्वाचीं अशीं चार-पांच देवळें आहेत. त्यांतील आदिस्वरदेवाचें देऊळ सर्वांत मोठें असून, त्याच्यासमोर पुंडरीक आहे. शांतिनाथाचें देऊळ सुरेख असून, देवळाजवळ उत्तम कलाकुसर पाहायला मिळते. त्याखेरीज आदिनाथ, कुमारपाल, विमल शाह, संप्रीतीराजा, वगैरे अनेक तीर्थंकरांचीं देवळें तेथें आहेत. आदिस्वराच्या देवळांत हिरेमाणकांचा खूप मोठा संग्रह आहे. तो विशिष्ट प्रसंगीं पाहायला मिळतो. चौमुखजीचें मंदिर माझ्या विशेष ध्यानांत राहिलें,

कारण तेथील मूर्तीला चार तोंडें असून, तीं चांगलीं मोठीं आहेत. चार बाजूंस चार प्रवेशद्वारें असून, प्रत्येक बाजूस देवाचें तोंड येतें. ह्या मंदिराचा सभामंडपही चांगला प्रशस्त आहे.

अशा प्रकारें बराच वेळ फिरत, मीं मुख्य मुख्य मंदिरें पाहिलीं आणि ऊन्ह असतांनाच खालीं उतरलों. चढतांना सुमारें सव्वा तास लागला होता, तर उतरतांना एक तास लागला. मात्र उतरण्यापूर्वीं पुनः एकदा अंगार शाह पिराजवळून खालीं दिसणाऱ्या मनोहर प्रदेशाचें डोळे भरून दर्शन घेतल्याशिवाय मी राहिलों नाहीं. शत्रुंजयावरील देवळांचीं चित्रें पुसून जातील, पण शत्रुंजय नदीची रजतधारा मात्र कधींच स्मृतिपटावरून पुसली जाणार नाहीं.

# जय सोमनाथ

## प्रभास पाटण : सर्वांत जुनें स्थान

सोमनाथला जायचें म्हणजे वेरावळ बंदरापर्यंत जावें लागतें. जुनागडहून ५१ मैल (आगगाडीनें) आहे हें ठिकाण. मी दुपारीं १२ ला निघून (१०–५५ ची गाडी १२ ला सुटली.) २–१५ ला वेरावळला पोंचलों. येथून ३ मैलांवरच प्रभास पाटण (किंवा पट्टन) ऊर्फ सोमनाथ पाटण ऊर्फ देव पाटण आहे. संध्याकाळीं ७–३५ ला पोरबंदरकडे जाणारी गाडी होती. म्हणजे तब्बल ५ तास मला पूर्ण मोकळे होते. एवढ्या वेळांत सोमनाथचें इतिहासप्रसिद्ध मंदिर आणि इतर स्थानें पाहून घेणें शक्य होतें. म्हणून गांवांत ज्या गृहस्थांकडे उतरायचें ठरलें होतें, त्यांना मी त्यांच्याकडे येणार नसल्याचें कळविलें आणि सरळ टांगा करून प्रभासला गेलों. मी २–३० ला टांग्यांत बसलों आणि ६ ला उतरलों. म्हणजे मीं ३॥ तास टांगा ताब्यडला आणि

त्याबद्दल भाडें किती दिलें ? दोन रुपये ! हें भाडें कमी आहे, ह्याची मला जाणीव होती, पण माझ्याजवळचे पैसे संपत आले होते आणि टांगेवाल्याच्या दृष्टीनें हे पैसेही जास्तच होते, कारण त्याला इतर दोन तीन सवाऱ्या मिळाल्या असत्या, तर त्यानें माझ्याकडून एक-दीड रुपयापेक्षां जास्त भाडें घेतलें नसतें.

## टांगेवाल्याशीं गप्पा

टांग्यांत मी एकटाच असल्यामुळें, सहजच टांगेवाल्याशीं गप्पा-गोष्टी सुरू केल्या. पूर्वीं हा भाग नबाबाच्या ताब्यांत होता. त्या वेळीं येथें येणाऱ्या व जाणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूला दर माणशीं आठ आणे कर द्यावा लागे. तरीही उतारूंची संख्या कांहीं कमी नसे. नबाबाचें राज्य असल्यामुळें मुसलमानांचा वरचष्मा बराच असणार. हा टांगेवाला मुसलमानच होता. त्याचें नांव हाशम हबीब मलेक ! मीं त्याला विचारलें, " नबाबाच्या राज्यांत तुम्ही जास्त सुखी असाल नाहीं ? " तो म्हणाला, " आम्हां गरिबांना कसलं आलंय् सुख, साहेब ? चैन केली बड्या लोकांनीं ? आम्हांला तर आजच्या इतकीसुद्धा आझादी नव्हती ! "

येथें मुसलमानांची वस्ती खूप आहे, पण ते सारे दारिद्र्य व निरक्षरता ह्यांनीं गांजलेले आहेत. टांगेवाले बहुतेक सगळे मुसलमानच आहेत, पण ते आपापसांत चुरस करून, स्वतःचें नुकसान करून घेतात.

" इथें असे हालांत दिवस काढण्यापेक्षां तुम्ही पाकिस्तानांत कां जात नाहीं ? " मीं विचारलें.

" पुष्कळ लोक गेले होते पाकिस्तानांत, पण त्यांना तिथली हवा मानवली नाहीं. अगदीं मरतुकडे होऊन परत आले. नि आमच्यासारख्या अडाण्यांनीं तिथं जाऊन हमालीच करायची कीं नाहीं ? आम्हांला कोणी राज्य देणार आहेत थोडंच ? त्यापेक्षां ही ओळखीची धूळच बरी ! " तो हसत हसत म्हणाला.

खरोखरीच धुळीनें आमचें सर्वांग भरलें होतें. वेरावळपासून प्रभासपर्यंत कॉंक्रीटचा रस्ता तयार होत असल्यामुळें, आम्हांला शेतांतून

व मैदानांतून टांगा न्यावा लागत होता. भरधाव पळणारे टांगे आमच्यापुढें जात होते व जातां जातां धुळीचा अबीर-गुलाल आमच्या अंगावर उधळीत होते. कॉंक्रीटचा रस्ता तयार झाल्यानंतर प्रवाशांची किती सुखसोय होईल, ह्या कल्पनेनें मीं हाशमला विचारलें, " काय रे, नवा रस्ता तयार झाला, म्हणजे तुमचे टांगे वायुवेगानं धावायला लागतील नाहीं ? "

" कसचं आलंय साहेब ! आमचे टांगे तरी टिकतील कीं नाहीं खुदा जाणे ! लोक म्हणतात, आतां बसगाड्या सुरू होतील. तसं झालं, कीं आमच्या पोटावर पाय आलेच ! " तो दुःखानें म्हणाला.

एकाच चांगल्या गोष्टीचा किती विचित्र परिणाम होतो वेगवेगळ्या लोकांवर ! आमच्या देशानें समाजवादाकडे किती जोरानें प्रगति चालविली आहे ह्याची प्रचीति ह्या हाशम टांगेवाल्याला कधीं काळीं येईल काय, ह्या विचारांत मी गढून गेलों असतांच, आमचा टांगा प्रभास गांवांत पोंचला आणि त्या अरुंद व गलिच्छ बोळांतून वाट काढीत त्रिवेणी संगमावर जाऊन पोंचला. गांवांत शिरतांच एक तरुण भटजी माझ्यामागें लागला, परंतु मला धार्मिक कृत्यें करायचीं नाहींत, एवढेंच नव्हे, तर तुझ्यासारख्यानें आतां हा कालग्रस्त धंदा सोडून, एखादा स्वाभिमानी व कालानुरूप धंदा शोधून काढावा, असें त्याला सांगून, मीं त्याला वाटेला लावलें.

## संगमावर

मला जरी त्रिवेणी-संगमावर स्नान करायचें नव्हतें, तरी प्रथम मी संगमावरच गेलों. ह्याचें कारण मला नदी व समुद्र ह्यांचें विलक्षण आकर्षण आहे, पण प्रत्यक्ष संगम पाहिल्यावर चांगलाच विरस झाला माझा. कोठें तो गंगा-यमुनांचा प्रयागचा प्रचंड त्रिवेणी-संगम नि कोठें ह्या छोट्याशा ओढ्यांसारख्या हिरण्या व कपिला नद्या ! (अर्थात् नेहमींप्रमाणें सरस्वती ही गुप्तच आहे !) येथून समुद्र जवळच

असल्यामुळें, नद्यांचें पाणी खारट आहे, हें सांगणें नलगे ! येथील नद्या एकदमच समुद्राला मिळतात. तेथें लोक भाविकपणें स्नान करतात.

## देहोत्सर्ग

ह्या संगमावरून जरा पुढें गेलें, कीं हिरण्या नदीच्या कांठीं देहोत्सर्ग नांवाचें ठिकाण येतें. ह्या ठिकाणीं श्रीकृष्णाच्या पार्थिव शरिराला अग्नि देण्यांत आला होता. पूर्वीं येथें मोठा अश्वत्थ-वृक्ष होता असें म्हणतात, पण हल्लीं नुकतेंच तीन वर्षांपूर्वीं लावलेलें पिंपळाचें रोप तेथें आहे. त्याचीं कोवळीं कोवळीं पानें छान दिसतात. येथें येणाऱ्या यात्रेकरूंनीं ह्या झाडाला पाणी घातलें, कीं पुण्याची जोडणी झाली, म्हणून पाण्याची सोयही करून ठेवण्यांत आलेली आहे.

## सूर्य नसलेलें सूर्यमंदिर

संगमाच्या समोरच्या बाजूस सूर्यमंदिर आहे. मंदिराची बांधणी, वगैरे चांगली आहे आणि एके काळीं त्याच्यावर कारागिरी व नक्षी असावी, असें दिसतें. पण सध्या तरी तें अगदीं ओकें ओकें दिसतें. देवळांत मूर्ति नाहींच. मीं जितकीं सूर्यमंदिरें पाहिलीं, तीं सर्व मूर्तिविनाच होतीं. ह्यामुळें मनांत विचार आला, सगळ्या सूर्यमंदिरांतल्या मूर्तींना झालंय् तरी काय ? कीं ज्या मंदिरांत मूर्ति नाहीं त्यांनाच सूर्यमंदिर म्हणण्यांत येऊं लागलें ? येथें भिंतीवर सूर्याची वेडीवाकडी आकृति काढण्यांत आलेली आहे. देऊळ जरा उंचावर असल्यामुळें येथून समुद्राचा, वगैरे देखावा छान दिसतो.

सोमनाथ हें भारतांतील प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक स्थान समजलें जातें. त्यामुळें गझनीच्या महमुदानें जरी सोमनाथची मूर्ति फोडून टाकली, तरी स्थानमाहात्म्य कायम टिकविण्यासाठीं दुसरें एखादें सोमनाथचें देऊळ येथें बांधणें भागच होतें. त्याप्रमाणें मराठी साम्राज्याच्या उत्कर्षकाळांत पुण्यश्लोका अहल्यादेवी होळकर ह्यांनीं जुन्या सोमनाथजवळच एक मोठें देऊळ बांधलें. ह्यांतील मुख्य

महादेवाची पिंडी खालीं भुयारांत असून, वरच्या बाजूस मामुली पिंडी आहे. हेतु हा, कीं मुसलमानांचा हल्ला झाला, तर तो वरच्या महादेवावर व्हावा आणि खालचा महादेव शिल्लक राहावा. अर्थात् एकदा देवळांत शिरल्यानंतर त्यांना भुयार दिसणार नाहीं ही कल्पना, म्हणजे भोळसटपणाच म्हटला पाहिजे. भुयारांतील शिवलिंग मात्र चांगलें भव्य आहे. त्याची शाळुंका दोन फूट उंचीची, गंडकी शिळेची, अगदीं काळी कुळकुळीत व गुळगुळीत अशी आहे. ह्यामुळें तिच्याकडे पाहात राहावेंसें वाटतें.

## जुना सोमनाथ : नवें मंदिर

येथून जवळच इतिहासप्रसिद्ध सोमनाथचें नवें मंदिर बांधण्याचें काम सुरु आहे. § वस्तुतः ह्या सोमनाथचा इतिहास हिंदु समाजाच्या आणि एकूण मूर्तिपूजकांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा आहे. हिंदु समाजानें आपल्यांतील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय भेद कायम ठेवल्यामुळेंच मुसलमानांपुढें त्याचा निभाव लागला नाहीं, पण हे भेद नष्ट करण्याची सद्बुद्धि अजूनही ह्या समाजाला सुचत नाहीं. हीच गोष्ट मूर्तिपूजेची व मंदिरांतून लाखों रुपयांचें जडजवाहीर जमा करण्याची. वैयक्तिक मोक्षसाधनेसाठीं मूर्तिपूजेची गरज ज्याला भासेल, त्यानें स्वतःच्या घरांत मूर्ति स्थापन करून, तिची वाटेल तेवढी पूजा-अर्चा करावी, पण सार्वजनिक पैशाचा दुरुपयोग करून कोट्यवधि रुपयांचीं मंदिरें बांधण्यांत आज काय स्वारस्य राहिलें आहे, ह्याचा प्रत्येकानें विचार केला पाहिजे. सोमनाथ हें जागृत स्थान समजलें जातें, पण गझनीचा महमूद ( इ. स. १०२४ ), उलगखान ( १२९७ ), बहादुरशाह ( १३१८ ), ह्यांनीं आणि इतरांनीं १३९५, १५११ व १५२० सालीं पुनः पुनः त्याच्यावर स्वाऱ्या करून तें उध्वस्त केलें आणि अखेर १७०६ सालीं औरंगजेबानें

§ आतां हें मंदिर बांधून पूर्ण झालें आहे.

तेथें मशीदच बांधून टाकली! कै. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या प्रेरणेनें सध्या येथें एक प्रचंड मंदिर बांधलें जात आहे. मी गेलों त्या वेळीं तळमजला पुरा होण्याच्या बेतास आला होता. कोणार्कप्रमाणें देवळाच्या कोपऱ्याकोपऱ्यांतून सुंदर कलापूर्ण (स्त्रियांचीं) चित्रें कोरलीं जात आहेत.

यादव लोक द्वारकेला येण्यापूर्वी प्रभासपट्टण हें एकच स्थान सौराष्ट्रामध्यें विशेष प्रसिद्ध होतें. ह्यावरून हें श्रीकृष्णाच्याही पूर्वीपासून विद्यमान असावें, असें दिसतें. स्कंदपुराणामध्यें 'प्रभास खंड' नांवाचा एक स्वतंत्र अध्यायच आहे. त्यांत असें लिहिलें आहे, कीं सोमनाथचें मंदिर प्रथम सोमराजानें बांधलें, त्या वेळीं तें सोन्याचें होतें. नंतर रावणानें तें चांदीचे बांधलें. त्यानंतर कृष्णानें तें लाकडी बांधलें आणि सरतेशेवटीं अनहिलपुरच्या भीमदेव व कुमारपाल ह्या राजांनीं तें दगडाचें बांधलें.

## पौराणिक कथा

सोमनाथसंबंधींची पौराणिक कथाही मजेदार आहे, ती अशी: पूर्वीं ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्षप्रजापति ह्यानें आपल्या साठ मुलींपैकीं सत्तावीस मुली सोमराजाला म्हणजे चंद्राला दिल्या. त्यांपैकीं फक्त रोहिणीवरच तो जास्त प्रेम ठेवूं लागला. हें इतर मुलींस (नक्षत्रांस) सहन न होऊन, त्यांनीं त्याबद्दल आपल्या पित्याजवळ गाऱ्हाणें नेलें, तेव्हां दक्षानें चंद्राला सर्वजणींवर सारखें प्रेम करण्याविषयीं उपदेश केला, पण प्रेम काय असें उपदेशानें करतां येतें? चंद्रानें तें साफ नाकारलें. त्याबरोबर दक्षप्रजापतीनें त्याला शाप दिला, "जा, तूं ह्यापुढें क्षयरोगानें ग्रस्त होशील!" त्या भल्या गृहस्थाला कोणीं तरी विचारायला हवें होतें, "स्वतःच्या जांवयाला क्षयी होण्याचा शाप देऊन, तूं आपल्या मुलींचं काय कल्याण साधलंस!" पण सगळींच माणसें त्या वेळीं प्राथमिक अवस्थेंत होतीं, त्यामुळें त्यांचे राग, लोभ, द्वेष अत्यंत तीव्र होते, म्हणून दक्षाची समजूत घालण्यांतही कांहीं अर्थ

नव्हता. अखेर चंद्राला क्षय झालाच, तेव्हां तो ब्रह्मदेवाला शरण गेला. ब्रह्मदेवानें त्याला सल्ला दिला, कीं तूं प्रभासक्षेत्रीं शिवलिंग स्थापन करून, त्याचें ध्यान कर, म्हणजे शंकर प्रसन्न होऊन, तुला शापमुक्त करतील. त्याप्रमाणें चंद्रानें सहा महिने तपश्चर्या करतांच त्यास प्रत्यक्ष शंकरानें दर्शन देऊन सांगितलें, " जरी दक्षाचा शाप नष्ट होण्यासारखा नाहीं, तरी माझ्या कृपेनें तूं महिन्यांतून कांहीं दिवस चांगला नि कांहीं दिवस रोगग्रस्त राहाशील. " हा वर मिळतांच चंद्रानें हर्षयुक्त होऊन, आपण स्थापिलेल्या लिंगांत पूर्णांशानें राहाण्याबद्दल शंकरास प्रार्थना केली. ती शंकरानें मान्य करून तो त्या लिंगांत अन्तर्धान पावला.

कच्छ-काठेवाडांतील हवा कोरडी असून, तेथें क्षयी लोकही बरे होतात, असें म्हणतात. ह्या वस्तुस्थितीचा ह्या गोष्टीशींही कांहीं संबंध असेल.

ह्या ऐतिहासिक व पौराणिक गोष्टी सोडल्या, तरी एक सुंदर समुद्रकिनारा ह्या दृष्टीनें सोमनाथचें महत्त्व अपूर्व समजलें पाहिजे. येथील समुद्रकिनारा पश्चिम भारतांतील एक अत्यंत मनोहर किनारा समजला जातो.

## भालुका तीर्थ

येथून जवळच भालुका तीर्थ नांवाचें एक स्थान आहे. ह्याच ठिकाणीं जरा नांवाच्या भिल्लानें मृगाचा डोळा ( किंवा तोंड ) समजून मारलेला बाण श्रीकृष्णाच्या डाव्या पायाच्या अंगठ्याला लागून, त्याला मृत्यु आला होता. श्रीकृष्णाचें मरण डाव्या पायाच्या अंगठ्यांत आहे, ही गोष्ट फक्त अभिमन्यूला माहीत होती. कारण तो सुभद्रेच्या पोटांत असतां कृष्ण-सुभद्रेच्या चाललेल्या गोष्टी त्यानें ऐकल्या होत्या. आपल्या ह्या भाच्यापासून आपल्याला पुढें-मागें धोका राहूं नये, म्हणून श्रीकृष्णानें त्याला चक्रव्यूहांत अडकवून ठार मारविलें होतें, ह्याचें स्मरण येथें आल्यानंतर होणें साहजिकच होतें. ह्या ठिकाणीं श्रीकृष्णाची एक मूर्ति

असून, ती नेहमींप्रमाणें उभी नसून, कृष्ण लोडाला टेकून बसलेला आहे व त्याचा उजवा पाय डाव्या गुडघ्यावर टेकलेला आहे. मूर्ति सामान्यच आहे, पण घटनेचें चित्रण करणारी आहे.

ह्याच्या समोर एक कुंड असून, त्याला पद्मकुंड असें म्हणतात. ह्या कुंडांत श्रीकृष्णानें आपल्या पायाचें रक्त धुतलें होतें, असें म्हणतात. ह्यामुळें भाविक लोक ह्या कुंडांतही स्नान करतात.

ह्याखेरीज इतरही अनेक लहान-मोठीं देवळें व तीर्थस्थानें ह्या ठिकाणीं आहेत. येथील मुसलमानांची मशीदही प्रेक्षणीय आहे, असें टांगेवाला सांगत होता, पण मला गाडी गांठायची होती, पोटांत कांहीं नसल्यामुळें, झालेल्या धावपळीमुळेंच थकवा आला होता आणि एकाच वेळीं पुष्कळ गोष्टी पाहिल्यामुळें मनालाही शीण आला होता, म्हणून अंगठ्याएवढ्या जाडीचा एक ऊस विकत घेऊन, तो खात खात, मी टांग्यांतून वेरावळला परत आलों आणि धर्मशाळेंतील सामान घेऊन सरळ स्टेशनवर गेलों.

# घेला सोमनाथ

## ‘घेला’ शब्दानें केलेला गैरसमज

सौराष्ट्रांतील ग्रामपंचायती व विकासकामें पाहाण्यासाठीं आम्ही शिक्षक व विद्यार्थी १९५८ च्या डिसेंबर महिन्यांत गेलों होतों. त्या वेळीं आमच्या कार्यक्रमांत श्री घेला सोमनाथ-दर्शन हा एक भाग होता. जेव्हां मीं प्रथमच हें नांव ऐकलें, तेव्हां मला त्याचा नीटसा अर्थबोध झाला नाहीं. गुजरातींत ‘घेलु’ किंवा ‘घेलो’ म्हणजे वेडा. आतां सोमनाथला हें विशेषण कां लावण्यांत आलें असावें ? त्याच्या हातून कांहीं वेडेपणा झाला होता, कीं भक्तांनीं केवळ कौतुकानें आपल्या

देवाला हें नांव दिलें होतें? परंतु प्रत्यक्ष देवस्थानाजवळ जातांच हा गैरसमज दूर झाला. तेथें 'घेला' नांवाची एक नदी आहे. त्या नदीवरून हें विचित्र नांव पडलेलें आहे. अर्थात् हा गैरसमज दूर झाल्यामुळें आमच्यांतील भक्तगणांना आनंदच झाला, हें काय सांगायला हवें?

## वैराण प्रदेशांतील रमणीय स्थान

राजकोटहून जसदण छत्तीस मैल व जसदणहून घेला सोमनाथ चौदा मैल. येथून बोटाद-जसदण रेल्वे लाईनही जवळच आहे, परंतु हा सारा प्रदेश अत्यंत वैराण आहे. जिकडे पाहावें तिकडे ओसाड माळ, अधूनमधून रानबोरींचीं कांटेरी झुडपें दिसतात, परंतु त्यामुळें त्या प्रदेशाचा वैराणपणा जणूं जास्तच डोळ्यांत खुपतो. ह्या भागाला पूर्वी 'पांचाळ' असें म्हणत. कोणत्या तरी सस्यशामल प्रदेशांतून आलेली एक नववधू ह्या पांचाळ प्रदेशाचें वर्णन करतांना म्हणते;

आवळ, बावळ ने बोरडी
नहि पाणानो पार।
वाळु विना सुई रहे
देवको आ पांचाळ ॥

[ तरवड, बाभळ नि रानबोरी ह्यांच्याखेरीज येथें दुसरें झाड दिसत नाहीं. जिकडेतिकडे दगडधोंडेच पसरलेले आहेत. दारिद्र्य इतकें, कीं दोन वेळ जेवायलाही मिळत नाहीं. रात्रीं न जेवतांच झोपीं जावें लागतें. असा आहे हा देवाचा लाडका पांचाळ देश! ]

ह्या वर्णनाची प्रचीति ह्या प्रदेशांतून फिरतांना पदोपदीं येते.

परंतु ज्या घेला नदीच्या कांठावर हें इतिहासप्रसिद्ध मंदिर आहे, तिच्या जवळ जाऊन पोंचलें, कीं सारें दृश्य बदलतें. झुळझुळ वाहाणारें स्वच्छ थंड पाणी, कांठावरची हिरवीगार झाडी आणि संग-मरवरासारख्या दिसणाऱ्या पांढऱ्याशुभ्र दगडाचें मोहक मंदिर, ह्या सर्वांच्या दर्शनानें मन कसें प्रसन्न होऊन जातें. पूर्वी ह्या देवळाची स्थिति काय असेल, त्याची कल्पना आतां येणें शक्य नाहीं. कारण सोमनाथच्या श्रीमंत

भक्तांनीं १९४६ सालीं ३५ हजार रुपये खर्च करून, मंदिराचा जो जीर्णोद्धार केला आहे, त्यामुळें तें सर्वस्वीं नवीनच बनलें आहे. मुख्य गाभाऱ्यासमोरील १६ खांबी भव्य व प्रशस्त दगडी मंडप कोणाचेंही मन मोहून टाकील व नास्तिकाच्या मनांतही क्षणभर तेथें बसून विसावा घेण्याची इच्छा निर्माण करील, असा आहे. ह्या मंदिरांत नक्षीकाम जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल आणि तें नाहीं हेंच बरें. शंकरासारख्या वीतराग बैराग्याला नक्षी व कलाकौशल्य हवें कशाला ?

सभोवतीं चांगल्या प्रशस्त ओवऱ्या बांधलेल्या असल्यामुळें परगांवच्या भक्तांना चार दिवस निवान्तपणें राहातां येण्याचीही सोय झालेली आहे.

## सोरटी सोमनाथ येथें कसा आला ?

प्रभास क्षेत्रांचा सुप्रसिद्ध सोरटी सोमनाथ तो हाच, असें सांगितलें जातें. तर मग तो मूळ सोमनाथ येथें कसा व कां आला ? ह्या बाबतींत अशी एक दंतकथा प्रचलित आहे, कीं गुजरातमधील एका रजपूत राजाची राणी सती मीनलदेवी हिनें मुसलमानी आक्रमणापासून मूर्तीची रक्षा व्हावी, म्हणून ती आधींच येथें आणून ठेवली होती. म्हणजे गझनीच्या सुल्तान महमुदानें सोमनाथची जी मूर्ति फोडून कोट्यवधि रुपयांचें जडजवाहीर लुटलें, ती खरी मूर्ति नव्हती. त्या वेळीं सोमनाथची खरी मूर्ति इकडे घेला नदीच्या कांठीं होती.

सोरटी सोमनाथप्रमाणें येथील महादेवाची मूर्ति (शाळुंका व पिंडी) ही खूपच मोठी आहे. शाळुंका पितळेनें मढविलेली असून, पिंडी कवेंत मावेल, इतकी मोठी आहे. पिंडी काळ्याशार दगडाची असून, तिच्यावर शुभ्र गंधानें 'ॐ' अक्षर लिहिलेलें असतें. त्यामुळें ती विशेष आकर्षक वाटते. पुजाऱ्याची सोय असल्यामुळें पूजा-अर्चा व्यवस्थित होते आणि मंदिर एका बाजूला पडलेलें असूनही त्याची आबाळ होत नाहीं.

## टेकडीवरील मीनल देवीचें मंदिर

घेला सोमनाथच्या दारांतच एक लहानशी टेकडी असून, तिच्यावर सोमनाथला येथें घेऊन येणाऱ्या सती मीनल देवीचें पांढरेंशुभ्र देऊळ आहे. देऊळ अगदीं छोटें असून, मोठें सुबक दिसतें. वर जाण्यासाठीं पायऱ्या असल्यामुळें पांच मिनिटांत वर चढून जातां येतें. वरून सभोवतालचें दृश्य मोठें मजेदार दिसतें. सहारा वाळवंटांतील ओॲसिसप्रमाणें अधून-मधून दिसणारीं लहान-लहान गांवें चटकन् मन वेधून घेतात.

मीनल देवीनें किंवा दुसऱ्या कोणींतरी सोरटी सोमनाथचें ज्योतिर्लिंग खरोखरीच येथें आणलें असेल काय ? कीं झालेला पराभव कबूल न करण्याकरतां व भक्तमनाचें समाधान करण्याकरतां नंतरच्या काळामध्यें एखाद्या राजानें किंवा धनिकानें हें देऊळ बांधलें असेल ? हिंदु मन तर असेंच मानण्याचा प्रयत्न आणि अट्टाहास करणार, कीं गझनीच्या महमुदाला खऱ्या सोमनाथची मूर्ति फोडायला मिळालीच नाहीं.

तें कसेंही असो, ज्या कोणीं हें देऊळ येथें बांधलें असेल, त्यानें चांगलीच रसिकता दाखविली आहे, ह्यांत शंका नाहीं. ह्या प्रदेशांत ह्या स्थानाहून अधिक रमणीय स्थान त्याला मिळणें शक्यच नव्हतें.

घेला सोमनाथचा निरोप घेतांना माझ्या मनांत विचार आला, येथें जर हें मंदिर नसतें, तर एवढा मोठा ओसाड व वैराण प्रदेश ओलांडून, येथें कोण आलें असतें ? आणि मग येथील ही झुळझुळ वाहाणारी घेला नदी, तिच्या कांठची रम्य वनश्री आणि ही टुमदार टेकडी कोणीं पाहिली असती ? अघ्रातकुसुमाप्रमाणें हें सारें निसर्गसौंदर्य अनुपभुक्तच राहिलें नसतें काय ? त्या दृष्टीनें पाहिल्यास, ही सोमनाथची कृपाच नव्हे काय ?

# गांधीजींच्या जन्मभूमींत

## महात्माजींच्या आत्मकथेंत उल्लेख

पोरबंदर म्हणजेच सुदामपुरी, ही गोष्ट महात्मा गांधींची आत्मकथा वाचीत असतां, मला लहानपणीं कळली होती. सुदामा हा भारतांतील लाखों करोडों अर्धपोटी लोकांचा प्रतिनिधि. त्याच्या गांवांत गरीब जनतेला दरिद्री-नारायण समजून, जीवेंभावें तिची सेवा करणारे कर्मवीर गांधी जन्माला यावेत, हा योगायोग कांहीं औरच म्हटला पाहिजे. द्वारकाधीश श्रीकृष्णासाठीं स्वतःच्या प्रेमाची खूण म्हणून पोह्यांची पुरचुंडी लपवून नेणाऱ्या कृश-शरीर सुदामदेवाबद्दल भारतीय मुलांना नेहमींच एक अद्भुत आकर्षण वाटत असतें. तेव्हां सुदामपुरीला जातांना व तेथें गेल्यानंतर कृष्ण-सुदामा भेटीची कथा मनांत ताजी झाली नसती, तरच आश्चर्य. अर्थात् सुदाम्याच्या नगरीपेक्षां गांधीजींची जन्मभूमि ह्या नात्यानेंच आधुनिक जग पोरबंदरला अधिक ओळखतें. कालान्तरानें सुदाम्याची स्मृति कदाचित् पुसूनही जाईल, पण गांधीजींची जन्मभूमि ह्या नात्यानें त्या स्थानाला लाभलेलें महत्त्व, कमी होण्याऐवजीं दिवसेंदिवस वाढतच जाणार, ह्यांत शंका नाहीं.

पोरबंदरला जायचें म्हणजे राजकोटहून आगगाडीनें जेतलसरला जाऊन, तेथें गाडी बदलायची व थेट पोरबंदरला पोंचायचें, पण मी प्रथम सोमनाथचें दर्शन घेण्यासाठीं वेरावळला गेलों होतों, त्यामुळें तेथून रात्रीं निघून पोरबंदरला पोंचलों. गांवांत प्रवेश करतांच एक गोष्ट चटकन् आपल्या लक्षांत येते ती अशी, कीं हें शहर व्यवस्थित आखलेलें व मोठें प्रशस्त आहे. इतर शहरांच्या मानानें येथें स्वच्छताही थोडी जास्त दिसते आणि प्रथमदर्शनीं आपला जो ग्रह

होतो, तो कांहीं अगदींच चुकीचा नसतो. मोरवी व पोरबंदर हीं सौराष्ट्रांतील दोन शहरें सौंदर्याच्या बाबतींत बरींच प्रख्यात आहेत. पोरबंदरचा समुद्रकिनाराही मोठा प्रेक्षणीय आहे. एके काळीं ह्या बंदरांतून अरबस्तान, आफ्रिका व इराण ह्या प्रदेशांशीं खूप मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत असे.

## मराठी लेखकाची भरपूर प्रशंसा

सुदामपुरीमध्यें सुदाम्याचें मंदिर असलेंच पाहिजे. त्याप्रमाणें तें येथें आहेही. त्यांतील जुना भाग फार थोडा उरलेला आहे. देवळासमोरील सुंदर प्रशस्त मंडप तर अगदीं अलीकडे बांधलेला असावा, असें दिसतें. त्या मानानें भक्तांची गर्दी मात्र तेथें फार कमी दिसली.

सोन्या-चांदीच्या सिगरेटच्या डब्या, लिपस्टिकच्या डब्या, आरसे, वगैरे वस्तु तयार करणारा एक वैशिष्ट्यपूर्ण कारखाना — विश्वकर्मा एंजिनिअरिंग वर्क्स — येथें आहे. माझे मित्र प्रसिद्ध गुर्जर कवि श्री. रतिलाल छाया मला त्या कारखान्यांत घेऊन गेले. मला त्या शोभेच्या वस्तूंचें कांहीं आकर्षण नव्हतें, पण त्या कारखान्याचे मालक श्री. गोविंदभाई गज्जर मोठे मजेदार गृहस्थ वाटले. मला पाहातांच ते म्हणाले, “ म्हणजे हे ‘ आमची मुंबई ’ वालेच गृहस्थ कीं नाहीं ? ” आणि त्यांनीं संयुक्त महाराष्ट्रवाद्यांवर हल्ला चढविला. श्री. छाया ह्यांनीं त्यांना कसेंबसें सांभाळून घेतलें, पण नंतर ते मला म्हणाले, “ तुम्ही कांहींही म्हणा, तुमच्या वि. स. खांडेकरांसारखा लेखक मला अजून कांहीं कुणी भेटलेला नाहीं. आतांपर्यंत मीं फक्त त्यांचींच पुस्तकं वाचलीं आहेत. त्यांच्यापुढें आमचे गुजराती लेखक अगदींच फुसके वाटतात. ” श्री. गज्जर मोठे कल्पक नि बाणेदार आहेत. नवनवीन कल्पना काढीत असतात. युरोप-अमेरिकेंत ज्या गोष्टी तयार होणार नाहींत, त्या आपण कराव्यात, अशी त्यांची जिद्द असते. पाकिस्तानी पंतप्रधानांनीं मागवलेल्या सिगरेट केसवर जम्मू-काश्मीरचा भाग पाकिस्तानांत घालावा लागेल, म्हणून त्यांनीं भरपूर पैसे मिळत असतांही, कलावंतानें

सत्याशीं इमान राखलें पाहिजे, ह्या मुद्द्यावर ती डबी बनविण्याचें नाकारलें. आतां राजेरजवाडे नाहींसे झाल्यामुळें त्यांच्या कारखान्याला काम मिळेनासें झालें आहे. ह्यामुळेंच त्यांतील कामगारांची संख्या खूपच कमी झाली आहे.

## कीर्तिमंदिर

पोरबंदरचें मुख्य प्रेक्षणीय स्थान म्हणजे कीर्तिमंदिर ! महात्मा गांधी ज्या घरांत जन्माला आले, त्या घराचें जुनें स्वरूप न बदलतां, त्याच्या समोरच, त्याला जोडून, एक भव्य इमारत उभारण्यांत आलेली आहे. हेंच तें कीर्तिमंदिर. गांधीजींच्या मृत्युसमयीं त्यांचें वय ७९ वर्षांचें होतें, म्हणून ह्या इमारतीची एकूण उंची एकूणऐंशीं फूट ठेवण्यांत आलेली आहे. मध्यें प्रशस्त चौक असून, त्याच्या भोवतीं मोठमोठ्या खोल्या बांधण्यांत आलेल्या आहेत. गांधीजींचा जन्म ज्या ठिकाणीं झाला होता, ती खोली अत्यंत काळोखी असली पाहिजे, कारण आपल्या देशांत तशी पद्धतच होती व ती अजूनही खेडोपाडीं रूढ आहे, पण आतां तेथें खिडक्या, वगैरे पाडून भरपूर प्रकाश करण्यांत आलेला आहे. ह्या घरांतील जिने मात्र चांगली अद्दल घडविणारे आहेत. इतके उतरते, कीं नीट लक्ष ठेवलें नाहीं, तर वरच्या पायरीवरून एकदम जमिनीवरच. अरुंदही तसेच !

## गांधीजींच्या निवासस्थानीं इमारत

आपल्याकडे एखादें सार्वजनिक काम करायचें, म्हणजे वर्गणी काढा, सरकारी-निमसरकारी संस्थांकडे भीक मागा, एकमेकांवर दोषारोप करा, तेव्हां कोठें कांहींतरी काम दिसूं लागायचें, पण व्यापारी समाजामध्यें अशी कृपणता दिसून येत नाहीं. निदान गांधीजींच्या कीर्तिमंदिराच्या बाबतींत तरी वर्गणीचा प्रश्न उपस्थित झाला नाहीं. श्री. नानजी कालिदास नांवाच्या स्थानिक कोट्यधीश व्यापारी गृहस्थांनीं ह्या इमारतीसाठीं लागणारा सर्व खर्च [ साडेचार लाख रुपये ] स्वतः केला आणि ती इमारत मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत देऊन टाकली.

श्री. वल्लभभाई पटेल ह्यांनीं नुसती इच्छा प्रदर्शित केली आणि श्री. नानजीभाईंनीं ती ताबडतोब पुरी केली. अर्थात् त्यांच्या दृष्टीनें ही रक्कम अगदींच क्षुल्लक होती. त्यांनीं सौराष्ट्रामध्यें स्त्री-शिक्षणाच्या प्रसारासाठीं लक्षावधि रुपये खर्च केले आहेत. युगांडा ( पूर्व आफ्रिका ) येथें त्यांचे उसाचे अनेक मळे व स्वतःची रेल्वे असून ‘ उसांच्या मळ्यांचा राजा ’ ( शुगरकेन किंग ) ह्या नांवानें ते प्रसिद्ध आहेत. पोरबंदरला ‘ आर्यकन्या गुरुकुल ’ नांवाची एक संस्था त्यांनीं स्थापन केलेली असून, भारतीय आदर्शांप्रमाणें मुलींना शिक्षण देण्याचा प्रयत्न तेथें केला जातो. स्वतः श्री. नानजी कालिदास ह्यांच्या कन्याच त्या संस्थेचें संचालन करीत असतात. त्याखेरीज सौराष्ट्रामध्यें ठिकठिकाणीं मुलींच्या शाळांना व वसतिगृहांना ह्या गृहस्थांनीं सढळ हातानें मदत केलेली आहे. पैशाचा असा सदुपयोग क्वचित् पाहायला मिळतो.

ह्या कीर्तिमंदिराचें आणखी एक वैशिष्ट्य, म्हणजे ह्या इमारतीचा आराखडा ( प्लॅन ) तयार करण्यापासून, तों संपूर्ण इमारत उभी करण्यापर्यंतचें सगळें काम श्री. पुरुषोत्तम डाबी नांवाच्या एका स्थानिक स्थपतींनीं केलेलें असून, त्यांचें शिक्षण फक्त प्राथमिक चार इयत्तांपर्यंत झालेलें आहे. आजच्या काळीं प्रत्येक ठिकाणीं पदवीचा पावलोपावलीं उदोउदो होत असतां, एवढें मोठें काम एका अशिक्षित कारागिरानें करून दाखवावें, ही कौतुकाची गोष्ट नाहीं, असें कोण म्हणेल ? देशांतीलच नव्हे, तर परदेशांतील लोकही जें स्थान पाहायला येणार, तें सुंदर व आकर्षक बनविण्याच्या कामीं श्री. डाबी ह्यांनीं चांगलेंच यश मिळविलें आहे.

## विधायक कार्याचें केंद्र

महात्माजींच्या पत्नी कै. कस्तुरबा गांधी ह्यांचें ( माहेरचें ) घरही गांधीजींच्या घरापासून जवळच आहे. परंतु त्या दोहोंच्या मध्यें इतर घरें असल्यामुळें लोकांना चांगलाच वळसा घालावा लागतो. आतां सौराष्ट्र सरकारनें मधलीं दोन घरें ताब्यांत घेतलीं आहेत आणि दोन्ही

मुख्य घरांना जोडणारा रस्ता तयार करणें, हिरवळ तयार करणें, वगैरे कामासाठीं गांधीस्मारक निधीनें दीड लाख रुपये मंजूर केले आहेत. ही सुधारणा अमलांत आली, म्हणजे कीर्तिमंदिराची शोभा खूपच खुलून दिसेल, ह्यांत शंका नाहीं.

कीर्तिमंदिर ठराविक चाकोरींतील स्मारकाप्रमाणें मूर्तिपूजेचें ठिकाण बनूं नये, ह्यासाठीं येथें विधायक कार्याचें केंद्र ठेवण्यांत आलेलें आहे. सूत कातण्याची सोय येथें आहे. लहान मुलांसाठीं व मोठ्या माणसांसाठीं वेगवेगळीं पुस्तकालयें आहेत. गांधीजींच्या जीवनांतील ठळक ठळक गोष्टी दाखवणारीं छायाचित्रें अत्यंत व्यवस्थितपणें मांडून ठेवण्यांत आलेलीं आहेत. त्यांत आपल्याला सहसा पाहायला न मिळणारीं अशींही अनेक चित्रें आहेत.

पोरबंदर पूर्वींपासूनच साहित्यिक व कलावंत ह्यांचें आगर समजलें जातें. हार्मोनियमपटु श्री. द्वारकेशलालजी महाराज येथलेच. सध्या मुंबईत राहात असलेले आजचे प्रथितयश गुर्जर कथालेखक श्री. गुलाबदास ब्रोकर पोरबंदरचेच. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मधील एक विभागप्रमुख श्री. जगन्नाथ अहिवासी, ग्रामीण जीवनाचीं चित्रें रंगविणारे, पोर्ट्रेट-पेंटर श्री. नारायण खेर, प्रसिद्ध कलासमीक्षक श्री. डी. जी. व्यास आणि पोरबंदरचे महाराजा व नगर-रचना-तज्ज्ञ श्री. नटवरसिंहजी ही मंडळी पोरबंदरचीच.

आतां सौराष्ट्राचें विलीनीकरण गुजरातमध्यें झालें आहे, तरीही प्रत्येक गांवाला व शहराला आपापल्या मोठ्या लोकांबद्दल अभिमान वाटतच असतो. श्री. रतिलाल छाया ह्यांनीं मला पोरबंदरच्या कलावंतांसंबंधीं माहिती सांगितली, तेव्हां त्यांच्या चेहऱ्यावरही असाच अभिमान झळकत होता. अर्थात् ते स्वतः कांहीं कमी प्रतिभाशाली नाहींत. गुजरातींतील उत्कृष्ट कवि म्हणून त्यांची ख्याति आहे आणि आपल्या कविता ते सुंदर गाऊनही दाखवितात !

# सौराष्ट्राची राजधानी : राजकोट

राजकोट ही सौराष्ट्राची राजधानी. पूर्वी ही राजकोट संस्थानाची राजधानी होती आणि काठेवाड (सौराष्ट्र) च्या पोलिटिकल एजंटची मुख्य कचेरी येथेंच असे. त्यामुळें ह्या शहराला पूर्वीपासूनच महत्त्व प्राप्त झालेलें होतें. सामान्यतः सौराष्ट्राच्या मध्यभागीं हें येत असल्यामुळें सर्वांना तें सोईचेंही असे. ह्याखेरीज ह्या शहराला एक लोकशाही परंपराही आहे. १९२० सालीं येथील राजे श्रीलखजीराज ह्यांनीं आपल्या संस्थानांत विधिमंडळ निर्माण केलें. तेव्हांपासून संस्थानी स्वातंत्र्याच्या चळवळींत ह्या शहराला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें. १९४७ पर्यंत ब्रिटिश सत्ताधाऱ्यांचें काठेवाडांतील मुख्य कार्यालय येथेंच होतें. त्यामुळें नवीन सौराष्ट्र जन्माला आल्यानंतर ह्या शहराला त्याची राजधानी बनण्याचें भाग्य लाभलें असल्यास आश्चर्य नाहीं.

## गांधीजींच्या वडिलांचा वाडा

संस्थानी जमान्यापासून राजधानी बनण्याची संधि राजकोटला मिळत गेल्यामुळें येथें मोठमोठे राजवाडे, उद्यानें, सरकारी कचेऱ्या, वगैरे असणें स्वाभाविकच आहे. येथील वॅटसन म्यूझियम, आजी नदीवरील धरण, प्रसिद्ध क्रिकेटपटु रणजीतसिंहजी जेथें शिकत होते तें 'राजकुमार कॉलेज', § प्रद्युम्न पार्क, ज्युबिली गार्डन्स, तलाव, झवेरी बाजार, रेसकोर्स, रामकृष्ण आश्रमची सुंदर लायब्ररी, वगैरे ठिकाणें अवश्य पाहाण्यासारखीं आहेत. रेसकोर्सवर सध्या घोड्यांच्या 'रेसेस' चालत नाहींत, पण सकाळ-संध्याकाळ फिरायला जाण्याचें एक उत्तम ठिकाण,

§ पूर्वी ह्या कॉलेजांत फक्त राजपुत्रांनाच प्रवेश मिळे. आतां इतरांनाही प्रवेश मिळूं शकतो.

ह्या दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे. (मी तेथें असतांना पंडित जवाहरलाल नेहरू ह्यांचा दौरा सौराष्ट्रांत सुरू होता. त्या वेळीं ह्या रेसकोर्सवर एक बालकांचा मेळावा भरलेला होता. तेथें जवाहरलालजींच्या भाषणाच्या वेळीं मी गेलों होतों.) परंतु ह्या गोष्टी बहुतेक सगळ्या मोठ्या शहरांतून पाहायला मिळतातच. तेव्हां त्यांत मला विशेष असें कांहीं वाटलें नाहीं.

माझ्या दृष्टीनें राजकोटचें आकर्षण वेगळेंच होतें. तें म्हणजे तेथील कबा गांधींचें घर किंवा वाडा. (कबा गांधीनो डेलो) कबा गांधी म्हणजे महात्माजींचे पिताजी. पोरबंदरची दिवाणगिरी सोडल्यानंतर ते राजकोट संस्थानचे दिवाण झाले होते. त्यामुळें गांधीजींचा जन्म पोरबंदरला झाला असला, तरी त्यांचें बालपण व शालेय शिक्षण राजकोटलाच झालेलें होतें. ज्या आल्फ्रेड हायस्कुलांत ते शिकत होते, तेंही पाहाण्यासारखें आहे. ह्या वाड्यांत गांधीजी लहानपणीं राहात असल्यामुळें, त्याला एखाद्या स्मारकासारखें किंवा तीर्थस्थानासारखें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. देशांतील व विशेषतः परदेशांतील जे लोक राजकोटला जातात, ते प्रथम गांधीजींचा हा वाडा पाहातात. वाडा जुन्या पद्धतीचा, जाडजूड दरवाजा (दिंडीसह) असलेला व चांगला मजबूत आहे. तो गांवांत इतर घरांच्या घोळक्यांतच आहे आणि तसें त्याचें वैशिष्ट्य असें कांहींच नाहीं. त्यामुळें तो शोधून काढतांना आम्हांला थोडा त्रास झाला. तरी त्याच्या बाहेरच्या बाजूस ‘श्रीपुतळीबा उद्योग मंदिर’ ह्या नांवाची पाटी असल्यामुळें, फार चौकशी करीत बसावें लागलें नाहीं. पुतळीबा हें गांधीजींच्या आईचें नांव. सध्या येथें सूत-कताई, वगैरे विधायक कार्य चालू असतें. विशेषतः स्त्रियांनीं त्याचा फायदा घ्यावा, ह्या दृष्टीनें प्रयत्न चालू असतात.

आम्ही वाडा पाहायला गेलों, तेव्हां गांधीजींहून सात वर्षांनीं मोठ्या असलेल्या त्यांच्या भगिनी तेथें राहात असल्याचें आम्हांला कळलें.

म्हणून थोडा वेळ थांबून त्यांची भेट घेतली. त्यांच्या व गांधीजींच्या चेहऱ्यांत खूपच साम्य दिसलें. ' मोहन ' च्या लहानपणच्या गोष्टी त्या अजूनही मोठ्या रसाळपणें सांगतात. राजकोट रेडियोवरूनही त्यांचा कार्यक्रम झालेला होता.

## राष्ट्रीय शाळा

गांधीजींचें विधायक कार्य मोठ्या उत्साहानें चालविणारी एक संस्था येथें असून, तिच्यांत फार कर्तबगार मंडळी काम करीत असतात. ह्या संस्थेचें नांव ' राष्ट्रीय शाळा ' असें असून, श्री. पुरुषोत्तम गांधी तिचें संचालन करीत असतात. गांधीजींचे नातू श्री. कनु गांधी, त्यांच्या पत्नी श्रीमति आभा गांधी, वगैरे मंडळी त्यांना मदत करतात. येथें खादीकाम, तेलघाणी, बालमंदिर, संगीत महाविद्यालय, वगैरे अनेक विभाग आहेत. ह्यांपैकीं कांहीं विभागांतून महाराष्ट्रीय शिक्षक काम करीत असतात. गांधीजींनीं राजकोटला जो प्रख्यात उपवास केलेला होता, तो ह्या राष्ट्रीय शाळेंतच केला होता. ज्या खोलींत त्या वेळीं ते राहात असत, ती चांगली सुरक्षित ठेवलेली असून, त्या उपवासाच्या वेळचीं छायाचित्रें तेथें लावलेलीं आहेत.

# जीर्ण दुर्ग : जुनागड

एखादें स्थान आधीं ज्या गोष्टीसाठीं प्रसिद्ध असतें ती गोष्ट कालान्तरानें विस्मृतीच्या गर्तेत लुप्त होऊन जाते आणि नव्याच गोष्टीचें आवरण त्या स्थानाभोवतीं पसरूं लागतें. जुनागडच्या बाबतींतही ही गोष्ट विशेषेंकरून अनुभवास येते.

वस्तुतः जुनागड ही सौराष्ट्राच्या प्राचीनतम राजधान्यांपैकीं एक. सौराष्ट्रांतील सर्वांत उंच डोंगराच्या — गिरनार पर्वताच्या —

पायथ्याशीं वसलेल्या ह्या नगरानें आतांपर्यंत अनेक नांवें धारण केलीं आहेत. प्रारंभीं त्याला मणिपूर असें म्हणत असत. त्यानंतर त्याला चंद्रकेतुपूर नांव मिळालें. त्यानंतर रेवतनगर व नंतर गिरिनगर. हळूहळू त्याला जीर्णदुर्ग असें संबोधण्यांत येऊं लागलें. त्याचेंच भाषान्तर होऊन जुनागड हें नांव त्याला प्राप्त झालें, पण एवढ्यावर त्याची नामकरणप्रक्रिया संपली नाहीं. इ. स. १४७० सालीं गुजरातच्या सुलतान मुहंमद बेगडा ह्यानें हें शहर जिंकून त्याला मुस्तफाबाद असें नांव दिलें, पण तें नांव कालाच्या प्रवाहांत वाहून गेलें आणि पूर्वीचें जुनागड हेंच नांव कायम राहिलें.

## पाकिस्तानी प्रचारानें प्रसिद्धि

हिंदु व जैन लोकांचीं मंदिरें असलेला सुप्रसिद्ध गिरनार पर्वत येथून जवळच आहे. सम्राट् अशोक, रुद्रदामन आणि स्कंदगुप्त ह्यांनीं कोरलेले शिलालेख येथें आहेत, सबंध आशिया खंडांत सिंहांचें एकमेव निवासस्थान असलेलें गीरचें जंगल येथेंच आहे, परंतु अलीकडे जुनागडला जी प्रसिद्धि भारतांत व जगांत मिळालेली आहे, तिचें कारण मात्र पाकिस्तानी प्रचार हेंच होय. हिंदुस्थानच्या फाळणीच्या वेळीं जुनागडचा नबाब मोहबतखान ह्यानें आपलें राज्य पाकिस्तानला जोडलें गेल्याचें जाहीर केलें. ही गोष्ट अर्थातच जुनागडच्या प्रजेला मान्य नव्हती. म्हणून तिनें नबाबाविरुद्ध बंड केलें. ‘आरजी हुकूमत’ (तात्पुरतें प्रतिसरकार) स्थापन केली आणि जुनागडवर चाल केली. त्याबरोबर नबाबसाहेब कराचीला पळून गेले आणि अशा प्रकारें १७४८ सालीं प्रस्थापित झालेली बाबी घराण्याची नबाबी सत्ता बरोबर दोनशें वर्षांनीं कायमची नष्ट झाली. सध्या हे नबाबसाहेब पाकिस्तानांत काय करतात म्हणून मीं चौकशी केली, तेव्हां त्यांनीं बरोबर नेलेली संपत्ति संपल्यामुळें ते कराचीला एक हॉटेल चालवीत आहेत, असें मला कळलें ! दुर्दैव बिचाऱ्यांचें ! जनतेच्या इच्छा-आकांक्षा ओळखून ते हिंदुस्थानांत राहिले असते, तर इतक्या लवकर त्यांच्यावर अशी पाळी

आली नसती, ही गोष्ट कदाचित् त्यांनाही आतां पटली असावी, पण पाकिस्तान मात्र अजूनही आपल्या हिंदविरोधी प्रचारामध्यें जुनागड व मानवदार संस्थानांचा उपयोग करीत असतें. हीं संस्थानें पाकिस्तानांत सामील झालेलीं असतांही हिंदुस्थाननें तीं आपल्या ताब्यांत घेतलीं आहेत, असा पाकिस्तानचा आरोप आहे. फाळणीनंतर नबाबाच्या मुसलमान गुंडांनीं कांहीं दिवसपर्यंत तेथील जनतेला खूपच त्रास दिला होता. आतां मात्र तेथें नबाबी सत्तेचा मागमूसही उरलेला नसून, तेथील मुस्लिम प्रजा गुण्यागोविंदानें नांदत असल्याचें मला दिसलें.

## उपरकोटमधील प्रेक्षणीय गोष्टी

गिरनारच्या पायथ्याशीं वसलेलें हें शहर मोठें मनोरम आहे. येथील रस्त्यांना उतार असल्यामुळें स्वच्छता भरपूर आढळते. शहरांतील घरांचीं व दुकानांचींही दारें जुन्या काळच्या कोट-किल्ल्यांच्या दारांसारखीं जाडजूड व मजबूत आहेत. त्यावरून येथील जनतेला नबाबाच्या कारकीर्दीत सुरक्षितता वाटत नसावी, असा सहज अंदाज करतां येतो. शहरामध्यें अनेक राजवाडे, मकबरे, देवळें, वगैरे असून, तेथील शिल्प व स्थापत्य प्रेक्षणीय आहे. कांहीं महालांतून आतां सरकारी कचेऱ्या व शिक्षणसंस्था चाललेल्या आहेत. स्वामी नारायण मंदिराच्या छतावर ( आंतील बाजूस ) काढलेलीं जुन्या पद्धतीचीं चित्रें फारच सुंदर आहेत.

परंतु जुनागडला पाहाण्याचें मुख्य स्थान म्हणजे उपरकोट किंवा वरचा किल्ला हें होय. शहराच्या वरच्या बाजूस हा असून, त्याचा तट अजून पुष्कळच चांगल्या स्थितींत आहे. हा किल्ला ग्रहरिपु नांवाच्या चूडासमा राजानें बांधला होता.

पूर्वीं ह्या किल्ल्यांत प्रवेश मिळविण्यासाठीं सरकारांतून पास काढावा लागे, पण आतां दरवाजावर नुसतीं नांवें लिहून घेऊन, प्रवेश देण्यांत येतो. हा किल्ला भुईकोटच आहे. म्हणजे त्यांत प्रवेश करण्यासाठीं वर चढून जावें लागत नाहीं. आंत मात्र सर्वत्र जंगल वाढलेलें आहे.

किल्ल्यांत प्रवेश करतांना दाराशींच मारुती व गणपति ह्यांच्या दोन मोठ्या मूर्ति आहेत. त्यांपैकीं मारुतीची मूर्ति मला जरा नवीन वाटली. मारुतीच्या एका हातांत गदा असून, दुसऱ्या हातांत एका स्त्रीच्या झिंज्या पकडलेल्या आहेत. मला त्याचा कांहींच अर्थ कळेना. म्हणून माझ्याबरोबर आलेल्या गौरीभाई व तनाभाई ह्या मित्रांना मीं त्यासंबंधीं विचारलें. तेव्हां त्यांनीं एक मजेशीर दंतकथा सांगितली, ती अशी :

पनोती नांवाची एक राक्षसीण होती. मारुतीचे पराक्रम ऐकून त्याच्याशीं आपलें लग्न व्हावें, अशी इच्छा तिच्या मनांत उत्पन्न झाली. म्हणून ती त्याच्याकडे गेली आणि त्याला तिनें मागणी घातली. पण मारुती पडला बाल-ब्रह्मचारी. त्यानें तिच्या मागणीला विनयपूर्वक नकार दिला. त्याबरोबर ती खवळली आणि तिनें मारुतीवर हल्ला केला. अर्थात् मारुतीही कांहीं बेसावध नव्हताच. त्यानें तिचा हल्ला परतवून तिला पायदळीं तुडविलें व तिच्या झिंज्या उपटून तिला पराभूत केलें. तेव्हांपासून ही पनोती वाईट ग्रहांच्या रूपानें साऱ्या पुरुष जातीला छळत असते, अशी इकडे समजूत आहे. अर्थात् त्या वेळीं हनुमानाची उपासना केली, म्हणजे मात्र पनोतीचें कांहीं चालत नाहीं. (पनोती शब्दाचा गुजराती जोडणी कोशांतील अर्थ 'शनीची दशा, वाईट स्थिति' असा आहे) अशा प्रकारच्या मारुतीच्या बऱ्याच मूर्ति ह्या भागांत मला पाहायला मिळाल्या.

## दोन विहिरी व दोन तोफा

अडी चडी ने नवघण कुवो ।
जे न जुए ई जीवतो मुवो ॥

(अडीचडी व नवघण ह्या विहिरी ज्यानें पाहिल्या नाहींत, तो जिवंत असून मेल्यासारखाच आहे.)

उपरकोटमधील सर्वांत लक्षांत राहाण्यासारखीं स्थळें म्हणजे दोन प्रचंड विहिरी होत. इतक्या खोल, मोठ्या व पक्क्या बांधलेल्या विहिरी क्वचितच पाहायला मिळतात. ह्यांतील एका विहिरीचें नांव 'अडीचडी

वाव ' असून, दुसरीचें नांव ' नवघण कुवो ' असें आहे. ( अडीचडी म्हणजे चढायला अत्यंत त्रासदायक. वाव म्हणजे विहीर. ) अडीचडी विहीर खूप खोल असून, तिच्या पायऱ्या सरळ पाण्यापर्यंत जाऊन पोंचलेल्या आहेत. ही विहीर चूडासमा राजांच्या दासींनीं बांधली, असें सांगतात. वरून पाण्याकडे पाहातांना डोळे फिरतात. ' नवघण कुवो ' ही विहीर अडीचडीपेक्षांही मोठी आणि शानदार आहे. अडीचडी आतां ढासळूं लागलेली आहे, तर नवघण कुवो अजून उत्कृष्ट स्थितींत आहे. नवघण हें राजाचें नांव असून, त्यानें ही विहीर बांधल्यामुळें, तिला तें नांव देण्यांत आलेलें आहे. हिच्या पायऱ्या शेवटपर्यंत सरळ नसून, वळणें घेत गेल्या आहेत. ह्यामुळें मध्यें मध्यें चांगली विस्तृत जागा आहे. ह्या दोन्ही विहिरींच्या पायऱ्या दोनशेंपेक्षांही अधिक असाव्यात, असें वरून पाहातां मला वाटलें.

विहिरींनंतर पाहायची गोष्ट म्हणजे दोन मोठ्या तोफा. ह्यांपैकीं एकीचें नांव ' कडानाल ' असून दुसरीचें ' नीलम ' किंवा ' लीलम ' आहे. ह्यांपैकीं नीलम तोफ १७ फूट लांब असून, तिचें वैशिष्ट्य म्हणजे, सुलतान मुहंमदाच्या आज्ञेवरून, मलिक इयाझ नांवाच्या सरदारानें, दीवच्या पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांचा पराभव करून, ती मिळवून आणलेली आहे. ही तोफ तुर्की लोकांनीं तयार केलेली असून, ती दीवमध्यें टाकून ते गेले होते. अर्थात् ज्यांनीं विजापूरची मुलुख मैदान ( मलिका-ए-मैदान ) तोफ पाहिली असेल, त्यांना ह्या ' नीलम ' चें विशेष कौतुक वाटणार नाहीं.

उपरकोटमध्यें बौद्ध गुंफांचे अनेक भग्नावशेष पाहायला मिळतात. ते इतस्ततः इतके विखुरले आहेत, कीं एका दमांत सगळे पाहाणें शक्य होत नाहीं. अर्थात् त्यांत कांहीं प्रेक्षणीय असें उरलेलेंही नाहीं. इ. स. ३०० च्या सुमारास बांधलेला एक बौद्ध विहार येथें होता. त्यांतील कांहीं भाग दोन मजली, तीन मजलीही होता. सर्व किल्लाभर सीताफळाच्या झाडांचें जणूं जंगल उगवलेलें आहे. आम्ही गेलों त्या

वेळीं सीताफळें पिकूं लागलेलीं होतीं. भटक्या जातीचे वाटणारे कांहीं लोक हीं सीताफळें गोळा करीत होते. झाडावरच पिकलेलीं सीताफळें मिळालीं, कीं तीं खात खात, पाडास आलेलीं सीताफळें तोडण्याचा त्यांचा कार्यक्रम चालू होता. तो पाहून क्षणभर आम्हांला त्यांचा हेवा वाटला, पण आमच्याजवळ वायां घालविण्याइतका वेळ नव्हता, म्हणून आम्ही तसेच पुढें निघालों.

## 'नरसी मेहतानो चोरो'

जुनागडचें महत्त्व आणखी एका दृष्टीनें आहे. ती म्हणजे प्रसिद्ध गुर्जर संत व कवि नरसिंह मेहता ह्यांची ही जन्मभूमि व कर्मभूमि आहे. मराठींत ज्ञानेश्वरांचें जें स्थान आहे, तेंच गुजरातींत नरसिंह (किंवा नरसी) मेहता ह्यांचें आहे. गांवामध्यें नरसी मेहतांचें देऊळ आहे. त्याला 'नरसी मेहतानो चोरो' असें म्हणतात. चोरो म्हणजे मोठा ओटा, सर्वांनीं एकत्र जमायची गांवांतील जागा, चावडी, (पोलीसचौकी). देऊळ सामान्यच असून त्यांत नरसी मेहता व त्यांचें उपास्य दैवत श्रीकृष्ण ह्यांच्या मूर्ति आहेत.

## रूपायतन

जुनागडचें आणखी एक आकर्षण म्हणजे 'रूपायतन' ही संस्था होय. येथून निघणाऱ्या 'प्यारा बापू' ह्या गुजराती मासिकाबद्दल आणि ह्या संस्थेबद्दल मीं पूर्वी बरेंच ऐकलें होतें. ह्यामुळें वेळांत वेळ काढून ह्या संस्थेंत अवश्य जायचें असें मीं ठरविलें होतें. त्यांतच राजकोटला असतांना ह्या संस्थेचे संचालक श्री. नवीन गांधी मला तेथील राष्ट्रीय शाळेंत भेटले होते. त्यांनीं 'रूपायतन' मध्यें वस्तीलाच यायचें मला निमंत्रण दिलें होतें. म्हणून गिरनारला जातांना वाटेंत उतरून मी तेथें गेलों.

गिरनारच्या पायथ्याशींच (जुनागडपासून सुमारें दोन मैलांवर) ही संस्था आहे. मुख्य रस्त्यापासून सुमारें पाऊण मैल आंत जावें लागतें.

आम्ही सायंकाळच्या सुमारास तेथें पोंचलों. आपण एखाद्या निर्जन जंगलांतच आलों आहोंत, असा आम्हांला भास झाला. वस्तुतः तें जंगल नसून, एक फार मोठी आंबराई आहे, परंतु अनेक वर्षें तिच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें तेथें जंगल वाढल्याचा भास होतो.

'रूपायतन' संस्था तशी अगदीं लहान आहे. दोन-चारच छोटेखानी इमारती तेथें आहेत. श्री. नवीन गांधी व धीरज गांधी हे भाऊ ती संस्था चालवीत असतात. त्यांच्यावर 'शांतिनिकेतन' आणि 'सेवाग्राम' ह्या दोन्ही संस्थांचे संस्कार झालेले आहेत आणि गांधी व टागोर ह्यांच्या तत्त्वांचा व जीवनप्रणालींचा समन्वय साधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. गांधीजींनीं जीं तत्त्वें आचरण्यांत आणण्याचा उपदेश केला, त्यांवर कलेचें पुट कसें चढवितां येईल, ह्याचा विचार त्या ठिकाणीं चालतो. 'प्यारा बापू' नांवाचें गुजराती मासिक तेथून प्रसिद्ध होतें. त्यांचा छोटासा छापखानाही तेथेंच आहे. हातकागद तयार करणें, दीपक, खेळणीं, भांडीं, वगैरे मातीच्या कलापूर्ण वस्तु बनविणें, मातीच्या व शाडूच्या मूर्ति तयार करणें, वगैरे कामें तेथें चालतात. गांवांतील देवळांमध्यें सुंदर व कलापूर्ण अशा मूर्ति भग्न अवस्थेंत इतस्ततः पडलेल्या असतात. त्या मूर्ति आणून त्यांच्या आधारें नवीन उत्कृष्ट मूर्ति बनवायची नवी कल्पना तेथें अमलांत आलेली पाहून मला गंमत वाटली.

ही जागा मोठी शांत व रम्य आहे. तेथील एकान्त मनाला उदास करणारा नसून, अंतर्मुख बनविणारा आहे. अर्थात् शहरांतील सुखसोयी तेथें नसल्यामुळें, विद्यार्थी मात्र फारसे तेथें टिकत नाहींत, असें समजतें.

येथून गिरनार पर्वत अगदीं समोरच आहे. त्याच्याकडे तासन् तास पाहात राहिलें, तरी मनाला थकवा असा येत नाहीं. त्या पर्वताकडे बोट दाखवून श्री. नवीन गांधी मला म्हणाले, "तुम्हांला एक गंमत दाखवतों. ह्या गिरनारचा आकार मोठा मजेदार आहे. ह्याचा वरचा

भाग टागोरांच्या चेहऱ्यासारखा आहे. त्यांची ती लांबसडक दाढी, भव्य कपाळ नि चिंचोळं नाक .... हुबेहूब तसं दिसतंय् कीं नाहीं ... ? त्याचा खालचा भाग गांधीजींच्या चेहऱ्यासारखा आहे, असं नाहीं तुम्हांला वाटत ? " मलाही क्षणभर तसा भास झाला, पण तो फार वेळ टिकला नाहीं. मी हसून म्हणालों, " ही कल्पना मनांत वागवून अनेक दिवसपर्यंत मी ह्या डोंगराकडे पाहात राहिलों, तर मलाही तसं वाटूं लागेल खरं. "

श्री. नवीन गांधीही हसले आणि म्हणाले, " बरोबर आहे तुमचं म्हणणं ! गांधी-टागोरांचा ध्यास घेतल्यामुळें आम्हांला तसं वाटत असावं. कांहीं लोकांना ह्या डोंगरामध्यें श्री. अरविंदबाबूंचाही भास होतो. "

आम्हांला अंधार पडण्यापूर्वी गिरनारवर पोंचायचें होतें, म्हणून ' रूपायतन ' च्या मोहांत जास्त वेळ न गुरफटतां, अतृप्त मनानें आम्हीं त्या आंबराईचा निरोप घेतला.

# सृष्टिसौंदर्याचें दर्शन घडविणारा गिरनार

## उंचो गढ गिरनार, वादळथी वातो करे !

### ( उंच गिरनार गड ढगांशीं गप्पा मारतो )

लहानपणीं भूगोल शिकतांना, गिरनारच्या जंगलांत सिंह आढळतात' असें पाठ केलें होतें, ह्यामुळें जेव्हां गिरनारला जाण्याचा माझा कार्यक्रम ठरला, तेव्हां आपण सिंहांच्या घरांत जाणार, असा माझा समज झाला. तो फारसा खोटाही नव्हता, कारण एके काळीं गिरनारच्या परिसरांतही सिंह राहात होते. आतां फक्त गीरच्या जंगलांतच सिंह पाहायला मिळतात. हें गीरचें जंगल ५७६ चौरस मैल विस्ताराचें असून, तेथेंही सिंहाच्या शिकारीला बंदी असल्यामुळेंच, सिंह टिकून राहिले आहेत.

नाहीं तर सबंध आशियांत औषधालाही सिंह मिळाला नसता. १९५० सालीं ह्या सिंहांची शिरगणति घेतली असतां, त्यांची संख्या २५३ भरली होती. गीरचें जंगल जसें सिंहांसाठीं प्रसिद्ध आहे, तसेंच दुधाळ गायी-म्हशींसाठींही हा भाग प्रख्यात आहे. गीर जातीच्या गायी आतां आपल्या महाराष्ट्रांतही मोठ्या प्रमाणांत येऊं लागल्या आहेत. सदर गीरचें जंगल जुनागडपासून जवळच आहे आणि गिरनार तर जुनागडच्या शेजारींच आहे. गिरनार हें जंगल नसून, तो डोंगर आहे, एवढें ज्ञान ह्या प्रवासामुळें झालें.

गिरनार शब्दाची व्युत्पत्ति शोधतां शोधतां असें समजलें, कीं गिरनार हा हिमालयाचा मुलगा व पार्वतीचा मोठा भाऊ. शंकर-पार्वतीच्या लग्नांत त्यानें देवांची बडदास्त फार उत्कृष्ट ठेवल्यामुळें, प्रसन्न होऊन, भगवान विष्णूंनीं त्याला वर दिला, “ तूं ह्यापुढें सर्व पर्वतांमध्यें साक्षात् नारायण होशील. तुझ्या ठिकाणीं सर्व देव-देवता निवास करतील. ” तेव्हांपासून त्याचें नांव ‘ गिरिनारायण ’ पडलें व त्याचा अपभ्रंश ‘ गिरनार ’ असा झाला. ज्या जुनागड शहराजवळ हा पर्वत आहे, त्याचें प्राचीन नांव मणिपूर असें होतें. त्यानंतर त्याला चंद्रकेतुपूर, रैवतनगर आणि गिरिनगर अशीं नांवें मिळालीं. ह्या गिरिनगरवरूनही गिरनार शब्द बनला असल्याची शक्यता आहे.

## गिरनार सौराष्ट्रांत कसा ?

आतां हे हिमालयपुत्र पश्चिमेस कसे आले, म्हणून कोणी विचारील, तर त्याचें उत्तरही तयार आहे.

त्याचें असें झालें. पूर्वीं पर्वतांना पंख असत व ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं उडून जात. ह्यामुळें असंख्य प्राण्यांचा नाश होई. म्हणून ब्रह्मानें इंद्राला अशी आज्ञा केली, कीं सगळ्या पर्वतांचे पंख कापून टाक. ही बातमी गिरनारला कळतांच, तो हिमालयांतून उडून सौराष्ट्राजवळच्या समुद्रांत बुडी मारून बसला. पुढें पार्वतीला सगळी हकीकत कळली आणि तिनें शंकराला व विष्णूला आपल्या भावाचा

शोध करण्यास पाठविलें. त्यांनीं जाऊन समुद्राची स्तुति केली, तेव्हां समुद्र प्रसन्न होऊन, पांच योजनें दूर गेला. अशा प्रकारें गिरनार सौराष्ट्राच्या किनाऱ्यावर राहिला. महाकवि माघ ह्यानें आपल्या 'शिशुपालवध' ह्या महाकाव्यांत ह्या पर्वताचा 'रैवत' ह्या नांवानें उल्लेख केलेला आहे. ह्यूएन्त्संगही येथील बौद्धविहाराचें दर्शन घेण्यास आला होता. त्यानें ह्या पर्वताचें नांव उज्जयंत असें दिलें आहे.

## अशोकाचे शिलालेख

जुनागड शहरापासून गिरनारचा पायथा सुमारें दोन अडीच मैल आहे. तेथें जाण्यास टांगे व बसेस मिळतात. तळाशीं पोंचण्यापूर्वींच दोन महत्त्वाचीं स्थळें वाटेंत लागतात. त्यांपैकीं एक ऐतिहासिक असून, दुसरें धार्मिक आहे. ऐतिहासिक स्थळ म्हणजे सम्राट अशोकाचे शिलालेख असलेला खडक होय. वस्तुतः ह्या खडकावर अशोक (इ. स. पू. २५०), रुद्रदामन (इ. स. १५०) व स्कंदगुप्त (इ. स. ४५४) ह्या तिघांचे आलेख आहेत. परंतु अशोक विशेष प्रख्यात असल्यामुळें, त्याच्या नांवानें हे लेख प्रसिद्ध आहेत. ह्यांतील अशोकाचा लेख पालींत असून, इतर दोन संस्कृतमध्यें आहेत.

शिलालेख हा एखाद्या स्तंभावर किंवा शिळेवर असायचा, अशी माझी कल्पना, पण येथील लेख जमिनींतील एका खडकावर कोरलेले आहेत. एखादा लहानसा दगडी उंचवटा असावा, असा तो खडक दिसतो. ह्याचा दगडही काळा कणखर नसून, लालसर ग्रॅनाईट आहे. शेकडों वर्षेंपर्यंत हे शिलालेख जंगलांतच अज्ञात स्थितींत पडून होते. इ. स. १८२२ सालीं कर्नल टॉड ह्यांनीं त्यांच्यावर प्रकाश पाडला. आतां ह्या शिळेवर इमारत बांधून तिच्या संरक्षणाची व्यवस्था केलेली आहे. ज्या अर्थीं सुमारें हजार वर्षांच्या काळांत ह्यावर तीन लेख कोरण्यांत आले, त्या अर्थीं तो काळ ह्या भागांत चांगल्या भरभराटीचा असावा, असें समजण्यास हरकत नाहीं. ह्या खडकाच्या ईशान्य भागावर अशोकाच्या चौदा धर्माज्ञा कोरलेल्या असून, माथ्यावर

रुद्रदामनाचा लेख खोदलेला आहे व पश्चिमेच्या बाजूस स्कंदगुप्ताच्या गव्हर्नराच्या आज्ञा आहेत.

## दामोदर कुंडाचें वैशिष्ट्य

अशोकाचे शिलालेख पाहून जरा पुढें गेलें, कीं रस्त्याच्या कडेलाच दामोदर कुंड लागतें. ह्याच्या कांठीं दामोदराचें म्हणजे श्रीकृष्णाचें देऊळ आहे.

हें कुंड चांगलें विस्तृत असून, त्याचें दृश्य मोठें मनोहर आहे. आम्ही तेथें गेलों, तेव्हां सकाळची वेळ होती आणि कांहीं भाविक लोक स्नान करीत होते व भटजी आपल्या चोपड्या सरसावून, तेथें पूर्वीं येऊन गेलेल्या त्यांच्या पूर्वजांचीं नांवें वाचून दाखवीत होते. ह्या कुंडाचा आकार नदीसारखाच आहे आणि जुनागडचे व आसपासचे मृत देह येथें भस्मीभूत होण्यासाठीं येत असतात. ह्या कुंडाचें वैशिष्ट्य म्हणजे ह्याच्या पाण्यांत मानवाचीं हाडें विरघळून जातात. ह्यामुळें त्याचें नांव विलीयक असेंही पडलें आहे. नाशिक व त्रिवेणीप्रमाणें येथेंही कित्येक लोक आपल्या मृत नातेवाइकांच्या अस्थी आणून विसर्जित करतात. पूर्वीं एकदा ब्रह्मानें ह्या जागीं यज्ञ केला होता. त्या वेळीं येथें गंगा, यमुना, सरस्वती, वगैरे सर्व पवित्र नद्या आणि देव गोळा झाले होते. त्याची स्मृति म्हणून हें कुंड राहिलें व म्हणून तें फार पवित्र आहे, असें समजलें जातें.

प्रसिद्ध वैष्णव संत नरसी मेहता ह्या कुंडांत स्नान करण्यासाठीं येत असत, म्हणून त्यांच्या मूर्तीचीही स्थापना येथें एका लहानशा देवळांत करण्यांत आलेली आहे.

ह्याच्या शेजारींच रेवतीकुंड नांवाचें दुसरें एक कुंड असून, तें खूप खोल व चारी बाजूंनीं पायऱ्या असलेलें, असें आहे.

## गिरनारची चढण

दामोदर कुंडावरून पुढें गेलें, कीं मुचकुंद, महादेव, भवनाथ, लम्बे हनुमान, वगैरे देवांचीं लहान मोठीं देवळें आहेत. वेळ फार

थोडा आणि गिरनारवर चढण्याची विशेष उत्सुकता, ह्यांमुळें त्या देवळांचें आम्हीं दुरूनच दर्शन घेतलें. रात्रीं गिरनारवर वस्तीला राहायचें आणि सकाळीं लवकर उठून परत यायचें, असें आम्हीं ठरविलें होतें, कारण डोंगर चढायला सर्वांत सोयीची वेळ म्हणजे पहाट किंवा सायंकाळ ! आम्हीं सुमारें ५ वाजतां गिरनार चढायला सुरुवात केली. ह्या वेळीं ऊन्ह बरेंच कडक होतें, परंतु गिरनारची निम्मी चढण चढून जाईपर्यंत, रस्त्याच्या दोन्ही बाजूंस चांगली दाट झाडी असल्यामुळें, आम्हांला उन्हाचा मुळींच त्रास झाला नाहीं. गिरनारची उंची आहे ३६७० फूट, पण चढण मात्र खूपच त्रासदायक वाटली. वस्तुतः अगदीं तळापासून शिखरापर्यंत प्रशस्त पायऱ्या आहेत, ह्यामुळें प्रारंभीं चढतांना मोठी गंमत वाटते, परंतु शेवटीं शेवटीं भयंकर थकवा वाटूं लागतो. सुमारें चार हजार पायऱ्या आहेत. शत्रुंजय ( पालीताणा ) पर्वताच्या पायऱ्याही जवळ जवळ इतक्याच आहेत, परंतु त्यांची उंची फारच कमी असल्यामुळें वृद्धांना त्या सोयीच्या आहेत. गिरनारच्या पायऱ्या उलट चांगल्याच उंच असून, जुन्या पद्धतीच्या जिन्यांप्रमाणें त्या एकावर एक ठेवल्यासारख्या वाटतात. २५०० पायऱ्या चढून गेल्यावर 'माळीनी परब' नांवाची एक पाणपोई लागते. तेथें थोडा वेळ थांबून, थंडगार पाणी पिऊन आणि ताजेतवाने होऊन आम्ही पुढें चालूं लागलों.

## प्रचंड शिळांची भिंत

आतां हिरवागार गिरनार संपून, वृक्षविहीन डोंगर सुरू झाला. डाव्या बाजूस इतक्या प्रचंड शिळांची भिंत दिसत होती, कीं वर पाहिल्यास घेरी यावी. शंभर-दीडशें फूट उंचीच्या त्या शिळा तुटलेल्या कड्याप्रमाणें दिसत होत्या आणि जरा पुढें गेलें, कीं आपला मार्गच बंद होणार, अशी भीति मनांत उत्पन्न होत होती. पण कसबी मानवानें ह्या शिळांच्या कडेकडेनेंच नागमोडी वळणानें रस्ता वरपर्यंत नेला आहे. आतां सूर्यास्त झाला होता, त्यामुळें उन्हाचा त्रास होण्याची

भीति उरली नाहीं. तसेंच झाडी संपून, मोठमोठ्या शिळांचा भाग सुरू झाल्यामुळें, अंधाराचीही भीति नव्हती. आतां वरचा किल्ल्यासारखा भाग जवळ दिसत होता, तर खालचें जुनागड शहर अंधुक होऊं लागलें होतें. जिकडे तिकडे दाट झाडी पसरलेली होती. ह्याच जंगलांत एके काळीं वनराज स्वैर विहार करीत असत, ही कल्पना मनांत येतांच, क्षणभर थरारल्यासारखें झालें.

## उपरकोटमधील जैन मंदिरें

गिरनारचा मुख्य भाग किल्ल्यासारखा असून, त्याची तटबंदीही करण्यांत आलेली आहे. ह्या भागांत डोंगर-पर्वतांचा उपयोग धार्मिक स्थळें ह्या दृष्टीनेंच केला जातो. नाहींतर किल्ला ह्या दृष्टीनें गिरनारला सिंहगड किंवा रायगड ह्या किल्ल्यांपेक्षां मुळींच कमी महत्त्व मिळालें नसतें. मी सिंहगडावर अनेक वेळां चढलों आहें, पण गिरनारवर चढतांना जितका थकवा मला आला, तितका सिंहगडावर चढतांना कधींच आला नव्हता. ह्यावरून गिरनारच्या चढणीची कल्पना येईल.

आम्ही किल्ल्यांत पोंचलों, तेव्हां सात वाजले होते. ती नोव्हेंबरची ५ तारीख व आश्विन कृष्ण षष्ठी होती. अंधार चांगलाच पडला होता. अजून ५०० फूट चढाई बाकी उरली होती, परंतु शिखरावर राहाण्याची कांहीं सोय नव्हती, म्हणून आम्ही तेथेंच धर्मशाळेंत रात्र काढून, सकाळीं वर जाऊन येण्याचें ठरविलें. ह्या भागाला उपरकोट किंवा कोट ( गड ) असें म्हणतात. येथें जैनांचीं खूप मोठीं व श्रीमंत मंदिरें आहेत. सर्वांत मोठें व महत्त्वाचें मंदिर जैनांचे बाविसावे तीर्थंकर नेमीनाथस्वामींचें असून, तें बाराव्या शतकांत बांधलेलें असावें, असें म्हणतात. नेमीनाथस्वामींची मूर्ति काळ्या संग-मरवराची असून, तिच्या अंगावर लाखों रुपयांचें जडजवाहीर असतें. सर्वसंगपरित्याग करून संन्यासी बनलेल्या ह्या आपल्या तीर्थंकराला हिऱ्यामोत्यांनीं मढवून व त्यासाठीं कडी-कुलुपांत बंदिस्त करून,

जैन-धर्मीय लोक काळावर आणि आपल्या धर्मसंस्थापकांवर जणूं सूडच उगवीत आहेत, असें वाटल्यावांचून राहात नाहीं.

इ. स. ११७७ सालीं तेजपाल व वस्तुपाल ह्यांनीं बांधलेलें एकोणिसावे तीर्थंकर मल्लीनाथ ह्याचें देऊळही प्रेक्षणीय आहे.

## गिरनारची परिक्रमा

देव-दिवाळीपासून ( दिवाळीनंतर दहा दिवसांनीं ) गिरनार पर्वताच्या प्रदक्षिणेची यात्रा सुरू होते. हिला गिरनारची परिक्रमा असें म्हणतात.

कार्तिक शुक्ल एकादशीला भवनाथाच्या मंदिरापासून ही सुरू होते आणि कार्तिक पौर्णिमेच्या दिवशीं भवनाथाच्या मंदिराजवळ येऊन ती संपते. ह्या दिवसांत येथें चांगलीच कडाक्याची थंडी असते, तरीही सुमारें वीस-पंचवीस हजार यात्रेकरू ह्या वेळीं तेथें जमतात आणि जय गिरनार ! जय अंबे ! ! जय भवनाथ ! ! ! अशा गर्जना, घोषणा करीत सबंध गिरनारला प्रदक्षिणा घालतात. ह्या वेळीं खूपच मोठी जत्रा येथें भरते. लोकगीतें ऐकायला मिळतात. लोकनृत्यें पाहायला मिळतात आणि एक प्रकारें ग्रामीण सौराष्ट्राचें दर्शनच येथें घडतें.

ह्या जैन मंदिरांच्या जरा वरच्या बाजूस जटाशंकर धर्मशाळा आहे. धर्मशाळेच्या बाहेर पाण्याचें सुंदर कुंड आहे. आम्हीं ह्या धर्मशाळेंत रात्र घालवायचें ठरविलें. तेथें तीन-चार प्रशस्त खोल्या आहेत. परंतु त्या दिवशीं परगांवांहून बरींच शाळकरी मुलें गिरनार पाहायला आलीं होतीं आणि इतरही कांहीं यात्रेकरू होते. ह्यामुळें आम्हांला खोली न मिळतां, व्हरांड्यांतच झोपावें लागलें. तेथें अगदीं अल्प भाड्यानें गाद्या व रजया मिळतात. ह्यामुळें अंथरण्या-पांघरण्याची चांगली व्यवस्था झाली. जवळच एक हॉटेल आहे. तेथें पुरी-भाजी खाऊन आम्ही झोपीं गेलों.

## मुख्य मंदिर जगदंबेचें

उपरकोटपासून सुमारें ५०० फूट वर असलेलें अंबाबाईचें देऊळ हिंदूंच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

नवविवाहित वधूवरें ह्या देवीच्या दर्शनाला येत असतात. हिला अंबाजी असें म्हणतात. (उत्तरेकडे 'जी' हा आदरार्थी शब्द पुरुषांप्रमाणें स्त्रियांनाही लावण्यांत येतो. ह्यामुळें अंबाजी म्हणजे अंबादेवी.)

आपला भाऊ गिरनार ह्याच्या संरक्षणासाठीं पार्वती स्वतः येथें येऊन राहिली. तीच ही अंबा. आम्ही पहाटेच वर चढून गेलों. त्या वेळीं आरती चाललेली होती. येथें देवीची नेहमींसारखी मूर्ति नसून शेंदूर फासलेल्या दगडाला दोन चांदीचे डोळे लावून, मूर्ति बनविलेली आहे. ह्यावरून हें दैवत कदाचित् फार पुरातन व आदिवासींचें असावें, असें मला वाटलें.

येथें आलें म्हणजे गिरनारची उंची संपते. येथून गिरनारची मागची बाजू दिसते आणि एक नवेंच अद्भुत दृश्य नजरेसमोर उभें राहातें. जवळ जवळ गिरनारइतकीच उंची असलेलीं तीन चार डोंगर-शिखरें एका मोठ्या पर्वतांतून कोरून काढल्याप्रमाणें रेखीव आकारांत दिसूं लागतात. संबंध गिरनार चढून येईपर्यंत ह्या गिरिशिखरांचा मागमूसही लागत नाहीं. ह्यामुळें एखाद्या जादूनें तर ही नवी सृष्टि आपल्या समोर उभी राहिली नसेल ना, असा क्षणभर भास होतो. सूर्योदयाची वेळ होती. मागून येणाऱ्या सूर्यप्रकाशाच्या प्रभावामुळें एखाद्या मोठ्या कागदावर रेखाचित्र काढावें, तसे ते डोंगर दिसत होते. ह्या शिखरांना टुंक असें म्हणतात. तेथें गोरखनाथाची टुंक, दत्तात्रेयाची टुंक व कालीमातेची टुंक अशीं तीन शिखरें दिसतात. शेवटचें शिखर अत्यंत अवघड असून, तेथें बहुधा कोणी जात नाहीं. दत्तात्रेयाच्या शिखरापर्यंत बरेच लोक जाऊन येतात, पण त्यासाठीं खालीं उतरून पुनः वर चढावें लागतें. आम्ही अगदीं थकून गेलों होतों व वेळही फार थोडा होता, म्हणून आम्हीं त्या शिखराचें दुरूनच दर्शन घेतलें आणि जड मनानें परत फिरलों.

# द्वारिका

## मूळ द्वारकेच्या मार्गानें द्वारकेला

वस्तुतः द्वारकेला जायचें म्हणजे राजकोट किंवा जामनगरवरून सरळ आगगाडीनें प्रवास करायचा; परंतु माझ्या कार्यक्रमांत प्रथम पोरबंदरला जाऊन, तेथून द्वारकेला जायचें ठरलें होतें. त्याप्रमाणें मी पोरबंदरला गेलों खरा, पण तेथून द्वारकेला जायचें म्हणजे चांगलाच द्राविडी प्राणायाम आहे, असें मला आढळून आलें. केवळ ७२ मैलांच्या प्रवासाला तब्बल बारा तास लागले. प्रथम जामनगरला मोटारनें जाऊन, तेथें गाडी पकडावी असें ठरलें होतें, पण मोटारची पोंचण्याची वेळ आणि गाडी सुटण्याची वेळ ह्यांच्यांत फक्त १५ मिनिटांचेंच अंतर होतें आणि सौराष्ट्रांतील मोटार-रस्ते इतके वाईट आहेत, कीं गाड्या ठरलेल्या वेळीं पोंचतील, असा मुळींच भरवंसा नसतो. म्हणून ह्या बेभरंवशी मार्गानें न जातां मियाणी–भाटिया मार्गानें जायचें ठरविलें. ह्या मार्गानें गाडी सुटण्याच्या वेळांत ५ तासांचा अवधि मिळत होता.

ह्या रस्त्यानें जाण्यांत एक फायदा झाला. द्वारकेला जातांना श्रीकृष्ण वाटेंत जेथें थांबला होता, ती मूळ द्वारका ( वीसावाडा ) पाहायला मिळाली. गांव सामान्य खेडेंच आहे आणि मंदिरही विशेष प्रेक्षणीय नाहीं, पण धार्मिक दृष्ट्या ह्याला महत्त्व आहे. त्यामुळें मोटार येथें थांबते आणि सगळे लोक उतरून देवाचें दर्शन घेऊन पुढें जातात. खांचखळग्यांतून धक्के खात आल्यामुळें थोडा वेळ मोटारीला ( आणि उतारूंच्या शरिरांनाही ) विश्रांति मिळते, हेंही चांगलेंच म्हणतां येईल. येथील कृष्णाच्या देवळासमोर असलेल्या शंकराच्या देवळांत महादेवाची शाळुंका जमिनीपासून दोन-अडीच फूट उंचावर आहे – जी सामान्यतः जमिनीच्या पातळींत असते. एवढेंच एक वैशिष्ट्य पाहायला मिळालें.

## डोंगरावरील ‘ हर्षद माता ’

मूळ द्वारकेप्रमाणेंच आणखी एक महत्त्वाचें स्थान ह्या रस्त्यानें गेल्यामुळें पाहायला मिळालें. तें म्हणजे ‘ हर्षद माता ’ किंवा ‘ हरसिद्धि माता ’ ह्या देवीचें डोंगरावरील देऊळ. मियाणीपर्यंत मोटारनें येऊन होडीनें एक खाडी ओलांडली, कीं समोर दिसते. ती हर्षद मातेची टेकडी. पलीकडे दुसरी मोटार येते. तिच्यांतून भाटिया स्टेशनपर्यंत जायचें असतें. ह्या देवीबद्दल लोकांमध्यें इतकी अलोट भक्ति आहे, कीं प्रत्येक उतारू तिचें दर्शन घेतल्याशिवाय मोटारींत बसत नाहीं. अर्थात् टेकडीवरील देवळांत देवी नाहीं, ती खालींच मोठ्या प्रशस्त देवळांत आहे, पण टेकडी लहान असल्यामुळें, फार थोड्या वेळांत आम्ही वर जाऊन आसपासची शोभा पाहून आलों. एका बाजूला अरबी समुद्र आणि दुसऱ्या बाजूला खरखीत सौराष्ट्रीय मैदान हीं क्षितिजापर्यंत पसरलेलीं दिसतात. सकाळची वेळ असल्यामुळें उन्हाचा त्रास मात्र झाला नाहीं.

## स्वतःचा ‘ निर्वंश ’ इच्छिणारा भक्त

खाडीच्या कांठावरील देवीचें देऊळ मोठें मनोहर आहे, ह्यांत शंकाच नाहीं, पण ह्या देवळासंबंधींची दंतकथा मला त्यापेक्षांही मजेदार वाटली. भारतीय मन येथून तेथून सर्वत्र कसें सारखेंच भाबडें आहे, ह्याचाही प्रत्यय आला. ही दंतकथा अशी :

ह्या टेकडीवरील देवळांत हरसिद्धि मातेची मूर्ति होती, त्या वेळची गोष्ट. देवीच्या नजरेच्या कक्षेंत येणारें जहाज ताबडतोब बुडून जाई. ह्यामुळें जहाजांना किनाऱ्यापासून खूप दूर अंतरावरून जावें लागे.

[illegible]व्या शतकांत जगडुशाह नांवाचा एक मोठा कच्छी व्यापारी [illegible]ऊन गेला. तो आपलीं सात गलबतें मालानें भरून घेऊन चालला होता. हरसिद्धीच्या दृष्टिक्षेपांत येतांच सहा गलबतें एकामागून एक बुडून गेलीं. शेवटच्या गलबतांत स्वतः जगडुशाह होता. त्यानें देवीची

प्रार्थना केली. त्यामुळें त्याचें जहाज तरलें. पुढें टेकडीवर जाऊन त्यानें तीन दिवस व तीन रात्री देवीची आराधना केली. चौथ्या दिवशीं सकाळीं देवी प्रसन्न झाली व तिनें त्याला वर मागण्यास सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, "हे माते, ह्या टेकडीच्या पायथ्याशीं पूर्वेच्या बाजूला मी एक नवीन देऊळ बांधतों. त्यांत तूं येऊन राहा नि माझीं बुडालेलीं गलबतं मला परत जशींच्या तशीं आणून दे." देवी म्हणाली, "तथास्तु. ह्यापुढें गलबतं बुडणार नाहींत. मात्र ह्या कोयला टेकडीसमोर येतांच प्रत्येक गलबतांतील लोकांनीं एकेक नारळ माझ्याकडे फेकला पाहिजे." [ त्याप्रमाणें आजही जहाजवाले व उतारू समुद्रांतून जातांना देवीकडे नारळ फेकतात, असें म्हणतात. ]

ही गोष्ट एवढ्यावरच संपत नाहीं. हिची खरी गंमत पुढेंच आहे. देवीनें जहाजें न बुडविण्याचें आश्वासन दिलें असलें, तरी तिनें डोंगरावरून खालीं उतरलेंच पाहिजे, असा आग्रह जगडुशाहनें धरला. (तो हुशार व्यापारी असल्यामुळें, राजकारणी लोकांप्रमाणें देव-देवतांच्या नुसत्या शाब्दिक आश्वासनावर विसंबून राहूं नये, हें तो चांगलें ओळखून असावा!) तेव्हां देवी म्हणाली, "मी तुझ्या नव्या मंदिरांत अवश्य येईन, पण त्यासाठीं माझी एक अट आहे. ती अशी, कीं प्रत्येक पायरीगणिक तूं मला एक बळी दिला पाहिजेस." जगडु वाण्यानें तें मान्य केलें. त्यानें मंदिर बांधलें. सुमारें दोनशें पायऱ्या तयार झाल्या. दर पावलास रेडा, बोकड, वगैरे पशूंचे बळी घेत देवी उतरूं लागली, पण चार पायऱ्या राहिल्या असतां सगळे बळी संपून गेले. त्याबरोबर देवी थांबली. हें पाहातांच जगडुशाहचा मुलगा माणेकचंद पुढें झाला. त्यानें आपलें बलिदान केलें. त्याच्या मागोमाग त्याच्या दोन आयांनींही देवीच्या चरणांवर आपले प्राण समर्पित केले. शेवटच्या पायरीवर जगडुशाहनें स्वतःचें बलिदान दिलें. त्याच्या पाठीवर पाय देऊन देवी सिंहासनावर विराजमान झाली आणि चौघांनाही जिवंत करून म्हणाली, "माझ्या मुलांनो, तुमच्या भक्तीवर

मी प्रसन्न झाल्यें आहें. आतां तुम्ही वर मागा." जगडूनें सर्वांच्या वतीनें दोन वर मागितले. तो म्हणाला, "माते, पहिल्या वरानें तूं वरून खालीं येण्यासाठीं जितके बळी घेतलेस, त्या सर्व प्राण्यांना जिवंत कर. दुसरा वर असा, कीं माझा निर्वंश होवो." देवीनें 'तथास्तु' म्हणून सर्व प्राण्यांना जिवंत केलें, पण जगडूनें स्वतःचा निर्वंश व्हावा असा वर कां मागितला, तें तिला कळलें नाहीं, म्हणून त्याला तिनें कारण विचारलें. त्यावर जगडुशाह म्हणाला, "मी जगाच्या कल्याणासाठीं एवढी धडपड करून जें नांव कमावलंय्, त्याला कलंक लावणारा कुलांगार माझ्या कुळांत निपजूं नये, म्हणून मीं हा वर मागून घेतला आहे." देवी हसली ! माणूस जिवंतपणीं नांव मिळविण्यासाठीं वाटेल तें करण्यास प्रवृत्त होतो, पण मेल्यानंतरही आपलें नांव निष्कलंक राहावें, म्हणून स्वतःचा निर्वंश इच्छिणारा महात्मा बहुधा तिलाही हाच एकटा आढळला असावा !

## गोड्या पाण्याची टंचाई

हर्षदपासून भाटियापर्यंतचा २४ मैलांचा मोटार प्रवास निर्विघ्नपणें पार पडला. भाटिया स्टेशनवर सुमारें ६ तास पडून राहावें लागलें. तो वेळ फारच कंटाळवाणा गेला. आतां आम्ही द्वारकेपासून फक्त २७ मैलांवर होतों. गोड्या पाण्याचें दुर्भिक्ष येथूनच जाणवूं लागलें. रात्रीं ७ ला द्वारकेला पोंचलों. कल्याणराय जोषी नांवाच्या एका विद्वान् निवृत्त हेडमास्तरांकडे माझी उतरण्याची सोय करण्यांत आली होती. त्यांच्या घरीं दुसरे पाहुणे येणार होते, म्हणूण त्यांनीं जवळच्याच 'सागर भुवन' नांवाच्या खारवा (कोळी) लोकांनीं बांधलेल्या धर्मशाळेंत माझी व्यवस्था केली. धर्मशाळा चांगली स्वच्छ होती. तेथील आडाचें पाणी मात्र फारच खारट होतें. कपड्यांना लावलेला साबण कोठल्या कोठें जिरून गेला आणि अंग चिकट झालें. अगदीं समुद्रस्नान केल्यासारखें वाटलें. ह्या गांवांत गोड्या पाण्याची टंचाईच आहे. येथील लोक पावसाचें पाणी तळघराच्या टाक्यांत सांठवितात

आणि वर्षभर तें पिण्यासाठीं वापरतात. ह्यामुळें येथें पिण्याच्या पाण्याला पैसे पडतात.

## रणछोडरायाचें अवाढव्य मंदिर

द्वारकेच्या कृष्णाला रणछोडजी म्हणतात, कारण जरासंधाशीं युद्ध करायचें टाळून त्यानें रणभूमि सोडून द्वारकेला पलायन केलें होतें. येथील रणछोडजीचें मंदिर खूप मोठें आणि भव्य आहे. हें देऊळ श्रीकृष्णाचा नातू वज्रनाथ ह्यानें एका रात्रींत बांधून काढलें, असें भाविक लोक समजतात. इ. स. १४६० सालीं मुहंमद बेगडानें ह्या मंदिराचा वरचा भाग उध्वस्त करून टाकला. त्याचें कारण काय ? तर आपल्या बायकोच्या माहेरीं, (म्हणजेच आपल्या सासुरवाडीला) सिंधला जात असतां त्याला समुद्रांतून ह्या मंदिराचें उंच शिखर दिसे. तें पाहून त्याचें पित्त खवळलें आणि त्यानें तेवढा भाग पाडून टाकला. मंदिराच्या आवारांत पुरले गेलेले हे अवशेष आतां वर काढण्यांत आलेले आहेत. त्यावरून हा भाग सुंदर काळ्या भोर दगडाचा असून, त्यावर मनोहर नक्षीकाम केलेलें होतें, असें दिसून येतें. वस्तुतः गझनीच्या मुहंमदानेंच ह्या मंदिराचा निकाल लावला असता, पण त्या वेळीं हें मंदिर फारच लहान असावें, त्यामुळें त्याच्याकडे त्याचें लक्ष गेलें नसावें. पुढें १८५८ सालीं येथील शूर वाघेर लोकांच्या बंडाळीचा बीमोड करण्यासाठीं इंग्रजांनीं द्वारिकेचीं बहुतेक मंदिरें पाडून टाकलीं. हीं मंदिरें बडोद्याचे राजे खंडेराव गायकवाड ह्यांनीं बांधून काढलीं, कारण द्वारका हें स्थान गायकवाडांच्या ताब्यांतील होतें. मंदिराचें जोतें ९० फूट लांब व २० फूट रुंद असून, मंदिराची एकूण उंची १७० फूट आहे. मंदिराचा मुख्य भागच मुळीं १०० फूट उंच असून, त्याचे पांच मजले आहेत. सभामंडप चांगला भक्कम असून, त्याला ६० खांब आहेत. परंतु हे खांब फार जवळ जवळ असल्यामुळें मंडप प्रशस्त वाटत नाहीं.

श्रीकृष्णाची मूर्ति काळ्या दगडाची असून ती चार फूट उंच आहे. लाखों रुपये किंमतीचें जडजवाहीर ह्या मूर्तीवर घातलेलें असतें. मंदिर

भव्य असलें, तरी त्यावर कलाकुसर मात्र फारशी दिसत नाहीं. ( अर्थात् दक्षिणेकडील मंदिरांच्या तुलनेनें ! ) येथील हत्तींना व माणसांनाही पंख लावलेले दिसतात, त्यावरून येथें असीरियन शिल्पकलेचा प्रभाव जाणवतो.

येथें गोमती नदी समुद्राला मिळते. तिच्या कांठावरच हें मंदिर आहे. नदी व समुद्र ह्यांच्या संगमामुळें येथें विशेष पावित्र्याचा निवास मानला जातो.

## श्रीमत् शंकराचार्यांचा शारदा मठ

श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं स्थापिलेल्या चार मठांपैकीं द्वारकेचा शारदा मठ कृष्णाच्या मंदिरांत नदीकडील बाजूनें शिरतांना डाव्या बाजूस आहे. सध्या तेथें एक संस्कृत पाठशाळा चालते, पण मी गेलों त्या वेळीं मठाला कुलूप होतें. त्याबद्दल चौकशी करतां असें समजलें, कीं मठांत हरिजन प्रवेश करतील, ह्या भीतीनें त्याला टाळें ठोकण्यांत आलेलें आहे. ज्या शंकराचार्यांनीं " **इतश्च न शूद्रस्याधिकारः ।...... श्रवणप्रतिषेधस्तावत् ' अथास्य वेदमुपशृण्वतस्त्रपुजतुभ्यां श्रोत्रप्रपूरणम् ' इति ।...... भवति च वेदोच्चारणे जिह्वाच्छेदो धारणे शरीरभेद इति ।...... ' न शूद्राय मतिं दद्यात् ' इति ।** " ( ब्रह्मसूत्र शांकरभाष्य, अध्याय १।३।३८ )

**अर्थ :** आणि म्हणूनच शूद्राला ( ब्रह्मज्ञानाचा ) अधिकार नाहीं. श्रवणप्रतिषेध असा : ' त्यानें वेदवाक्य ऐकलें, तर त्याचे कान लाखेनें आणि शिशानें भरावेत '...आणि त्यानें वेदोच्चारण केलें असतां त्याचा जिह्वाच्छेद करावा, ( वेद मंत्राचें ) धारण केलें असतां ठार मारावें ... ' शूद्राला मति देऊं नये.'—असा आदेश हजार वर्षांपूर्वी देऊन ठेवला आहे, त्यांचे शिष्य सामाजिक समतेच्या विसाव्या शतकांतही त्या आदेशाचें अंधबुद्धीनें पालन न करतील तरच आश्चर्य !

ह्या मुख्य मंदिराखेरीज इतर अनेक मंदिरें येथें आहेत. दुर्वास ऋषि, त्रिविक्रम ( टीकम ), कुशेश्वर, साँवलिया, संगमनारायण, वगैरे अनेक देवळें भक्तगणांना आकर्षित करीत असतात. नरसी मेहता ह्यांची हुंडी ज्या शामळशा शेठाच्या रूपानें भगवान् कृष्णानें स्वीकारली होती, त्याचेंही एक मंदिर येथें आहे. येथून वीस मैलांवर कच्छच्या खाडींत ओखा बंदराजवळ बेट द्वारका आहे. तेथील मंदिरें पुष्कळच आधुनिक असलीं, तरी भक्त आणि निसर्गप्रेमी ह्या दोघांच्याही दृष्टीनें ह्या स्थळाचें आकर्षण आहे. श्रीकृष्ण सहलीसाठीं ह्या बेटावर जात असत. येथें सत्यभामा, जांबुवंती, रुक्मिणी, राधा, वगैरे कृष्णाच्या राण्यांचे मोठमोठे महाल आहेत.

## ओखा सिमेंट फॅक्टरी

सौराष्ट्रांतील अनेक मोठ्या सिमेंट फॅक्टऱ्यांपैकीं एक द्वारकेला स्टेशनजवळच आहे. तेथील महाराष्ट्रीय मित्रांना भेटण्यासाठीं म्हणून मी तेथें गेलों. श्री. शांताराम वैद्य ह्या उत्साही गृहस्थांनीं मजबरोबर हिंडून सारा कारखाना मला दाखविला. रेती, माती व जिप्सम ह्यांच्या संयोगानें येथें सिमेंट तयार होत असतें. मराठी नोकरांची संख्या त्या मानानें कमी दिसली.

ओखा बंदर आणि द्वारिका ह्यांच्या दरम्यान मीठापूर येथें टाटा केमिकल वर्क्स असून, त्यांत तीन हजार कामगार आहेत. तेथें औषधें, केमिकल्स, सोडा ॲश, वगैरे वस्तु तयार होतात. ओखा बंदराची वाढ झाली, म्हणजे ओखा, मीठापूर आणि द्वारिका हीं तिन्ही एकाच प्रचंड शहराचा भाग बनतील आणि श्रीकृष्णाच्या वेळीं जशा तऱ्हेची भरभराट येथें होती असें समजलें जातें, त्याहून किती तरी मोठ्या प्रमाणावर, परंतु औद्योगिक भरभराट येथें होईल, अशीं चिन्हें आतांच दिसूं लागलीं आहेत. मग द्वारिका ( छोटें दार ) ही खरोखरीच Gateway of Gujrat – गुजरातचें प्रवेशद्वार – बनेल.

# रमणीय, तसेंच उद्यमशील शहर : मोरवी

## मोरवीचें दुहेरी आकर्षण

वस्तुतः भारत सरकारनें प्रसिद्ध केलेल्या ‘भारत पाहा’ पुस्तिकामालेंतील ‘मुंबई व सौराष्ट्र’ ह्या पुस्तिकेंत मोरवी (गुजराती ‘मोरवी’) शहाराचा उल्लेख आलेला नाहीं. त्यामुळें तें फारसें प्रेक्षणीय नसावें, असा कोणाचाही समज होणें साहजिक आहे. त्याप्रमाणें माझाही तसाच समज झालेला होता. तरीही मला तेथें जाण्याची उत्सुकता लागून राहिलेली होती. त्याचीं कारणें दोन. एक असें, कीं ज्यांनीं माझा सौराष्ट्रांतील दौरा आखून, ठिकटिकाणीं माझी सोय केलेली होती, ते गुजरातीचे प्रसिद्ध कवि व कथालेखक श्री. नाथालाल दवे हे तेथें राहात होते आणि दुसरें म्हणजे, मोरवीच्या गणपुल्यांच्या ‘परशुराम पॉटरी’ संबंधीं ज्या ज्या वेळीं मराठी वृत्तपत्रांतून मी कांहीं वाचीत असें, त्या त्या वेळीं आधींच व्यापारउदिमांत मागासलेल्या महाराष्ट्रांतील एका गृहस्थांनीं आपल्या बुद्धिमत्तेच्या व उद्यमशीलतेच्या जोरावर, उद्यमप्रवीण गुर्जरांच्या प्रदेशांत जाऊन, कारखाना काढला आणि तो नांवारूपाला आणला, ह्याबद्दल मला मोठें कौतुक वाटत असे. त्यामुळें सौराष्ट्रांत जाण्याचें ठरतांच, मोरवीचा कार्यक्रम मीं निश्चित करून टाकला. श्री. नाथालाल दवे ह्यांची नि माझी ओळख पन्हाळ्याच्या ‘लिटररी वर्कशॉप’ मध्यें झालेली होती. इतका सज्जन, मनमिळाऊ, सच्चा आणि कलाप्रेमी साहित्यिक क्वचितच पाहायला मिळतो.

## रुक्ष प्रदेशांतील रम्य नगर

विरमगांवपासून राजकोटकडे जातांना ८७ मैलांवर वांकानेर हें जंक्शन लागतें. तेथून नवलखी बंदरापर्यंत ४६ मैलांचा एक लहानसा

रेल्वे-फांटा आहे. ह्या नवलखी बंदरांतूनच फेरीबोटीनें सुप्रसिद्ध कंडला बंदराला व तेथून कच्छमध्यें जायला मार्ग आहे. ह्यामुळेंच ह्या छोट्या फाट्यावर खूप गाड्या दौडत असतात. ह्या रस्त्यावर वांकानेरपासून १८ मैलांवर मोरवी हें जंक्शन आहे. मोरवी हें उद्योगधंद्यांचें ठिकाण असल्यामुळें वांकानेर ते मोरवी ये-जा करणाऱ्याही तीन गाड्या आहेत. ह्या वांकानेर स्टेशनवरील पेढे फार प्रसिद्ध आहेत. त्यांची चव तर वेगळी आहेच, पण त्यांचा आकारही सामान्य पेढ्यांपेक्षां वेगळा आहे.

येथली गाडीही लक्षांत राहाण्यासारखी छोटेखानी आहे. तीन अरुंद डबे असतात तिला आणि पुढें तेलावर चालणारें इंजिन.

वांकानेरलाही 'परशुराम पॉटरी'ची शाखा असून, तेथें शौचकूप, मुताऱ्या, वगैरेंसाठीं लागणारें सामान व लाद्या तयार होतात. आगगाडींतून जातांना ही फॅक्टरी आपल्याला सहज दिसूं शकते.

हा भाग अत्यंत रुक्ष आणि ओसाड वाटतो. जुन्या संस्थानी राजवटींत शेती व पाटबंधारे ह्यांच्याकडे विशेष लक्ष न दिलें गेल्यामुळें, सारें माळरान ओकेंओकें पडलेलें दिसतें.

तीन स्टेशनें सोडलीं, कीं चौथें स्टेशन येतें नझरबाग. हें स्टेशन मुख्यतः परशुराम पॉटरीच्या सोईसाठींच बांधलेलें आहे. ह्या स्टेशनच्या आवारांतच ही फॅक्टरी आहे. येथून दोनच मैलांवर मोरवी स्टेशन आहे. नझरबागेपासून मोरवी शहर सुरू होतें आणि ओसाड माळ पाहून कंटाळलेल्या डोळ्यांना जरा चांगलें दृश्य पाहायला मिळतें.

## दोन घोडे व दोन बैल

गांवांत प्रवेश करीत असतां, आगगाडींतून, चार अत्यंत उत्कृष्ट कलाकृति आपल्याला पाहायला मिळतात. रेल्वे-रस्त्याच्या मच्छु नदीवरील पुलावर चार जनावरें आहेत. त्यांपैकीं दोन घोडे असून, दोन बैल आहेत. हे पशु ब्रॉंझचे असून, त्यांच्यांतील जिवंतपणा ते पाहाणाऱ्याला आकर्षून घेतो. घोडे जणूं मुक्त संचार करायला निघाले

आहेत आणि बैल – किंवा सांड – टक्कर घेण्याच्या किंवा ढुशी मारण्याच्या तयारींत आहेत! त्यांच्या स्नायूंतील सामर्थ्य आणि डोळ्यांतील तरतरी आपल्याला इतकी जाणवते, कीं आपण खरोखरीचेच घोडे-बैल पाहात आहोंत, असा भास होतो. पूर्वीच्या संस्थानी राजवटींत जनावरांचे हे पुतळे परदेशांतून आणून येथें उभे केलेले आहेत. आपल्या देशांत इतके आकर्षक पुतळे करतां येतील कीं नाहीं, हें अजमावून पाहाण्यासारखें आहे.

## भक्त नसलेलें 'मणि-मंदिर'

स्टेशनपासून जवळच 'मणि-मंदिर' नांवाचें सुंदर मंदिर आहे. तेथील राधाकृष्णाच्या मूर्ति खरोखरीच प्रेक्षणीय आहेत. मंदिराची बांधणीही मोठी शानदार आहे. देवाची पूजा, आरती, वगैरेची चांगली सोय आहे, पण येथें भक्तांचीच उणीव आहे. ह्याचें कारण असें, कीं ह्या मंदिराची उत्पत्ति फार चमत्कारिक पद्धतीनें झालेली आहे. येथील एका राजानें आपल्या मणिबाई नांवाच्या रखेलीच्या स्मरणार्थ हें मंदिर बांधून त्याला 'मणि-मंदिर' असें नांव दिलेलें आहे. आतां आपल्या देशांत कान्होपात्रेच्या भक्तीचें गुणगान करणारे लोक कितीही असले, तरी एका सामान्य रखेलीच्या नांवानें बांधलेल्या देवळांत जायला, भाविक माणूस तयार होणार नाहीं, ही गोष्ट त्या राजाच्या लक्षांत आली नसावी. शिवाय राजवाड्यासारख्या मोठ्या अशा ह्या मंदिरांत समोरच्या बाजूला सरकारी खजिना असल्यामुळें, तेथें नेहमीं संत्र्यांचा पहारा असतो. अशा जागीं सामान्य भक्त सहसा कसा जाणार? सत्तेच्या आणि संपत्तीच्या जोरावर मंदिर बांधतां येईल, पण त्या मंदिराला भक्त मिळतीलच, असें नाहीं, ही गोष्ट ह्या देवळावरून चटकन् लक्षांत येते.

## प्रेक्षणीय झुलता पूल

येथील मच्छु नदीवरील झुलता पूल विशेष प्रेक्षणीय आहे. जवळजवळ दीड-दोन फर्लांग लांबीचा हा अधान्तरीं लटकणारा पूल

दोन्ही तीरांवर जाडजूड तारांनीं आवळलेला आहे. प्रत्यक्ष पुलाची रुंदी फार कमी असून खालीं घातलेल्या फळ्या पुष्कळच ढिल्या झालेल्या आहेत. शिवाय ह्या ठिकाणीं नदीचें पात्र डोळे फिरण्याइतकें खोल असल्यामुळें ह्या पुलावरून जातांना सामान्य माणसाला भीति वाटल्याशिवाय राहात नाहीं.

## परशुराम पॉटरी

मोरवीला थांबण्यांत तेथील काचसामान व चिनी मातीचीं भांडीं, वगैरे तयार करणारा श्री. गणपुले ह्यांचा 'परशुराम पॉटरी' हा कारखाना पाहाणें हाही माझा एक उद्देश होताच. त्यामुळें तेथील एका महाराष्ट्रीय गृहस्थांबरोबर हिंडून, सगळा कारखाना व्यवस्थित पाहून घेतला. कंदिलाच्या काचा, पेले, वगैरे काचमाल विशेष आकर्षक किंवा वैशिष्ट्यपूर्ण वाटला नाहीं, पण हें त्या कारखान्याचें वैशिष्ट्य नसून, चिनी मातीच्या विशिष्ट प्रकारच्या विटा किंवा असेंच सामान तयार करणें, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. ज्या ठिकाणीं अत्यंत अधिक उष्णता वापरली जाते, तेथील भट्ट्यांना सामान्य विटा वापरल्यास त्या जळून किंवा वितळून जातील, म्हणून विशिष्ट प्रकारच्या उष्णता सहन करणाऱ्या विटा वापराव्या लागतात, त्या येथें तयार होतात. विजेच्या वाहातुकीसाठीं लागणारीं उपकरणें तयार करण्याचें कामही आम्ही गेलों तेव्हां तेथें चालू होतें. अर्थात् अशा प्रकारचे कारखाने देशांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. परंतु महाराष्ट्रीय गृहस्थांनीं परप्रांतांत जाऊन चालविलेला कारखाना, ह्या दृष्टीनें ह्याचें महत्त्व आम्हां महाराष्ट्रीयांना विशेष वाटतें.

कारखान्याचे संचालक श्री. अंतूभाई गणपुले हे खूप उत्साही असून, स्थानिक गुजराती लोकांमध्यें त्यांच्याबद्दल चांगली आदराची व विश्वासाची भावना असल्याचें मला दिसून आलें.

## ग्रामीण विकासाचें ओझरतें दर्शन

शहराची आखणी फार व्यवस्थित झालेली असून, सोय आणि सौंदर्य ह्यांची दृष्टि त्यांत आहे. ह्यामुळें सौराष्ट्रांतील दोन सर्वांत सुंदर शहरांत त्याची गणना होते: एक पोरबंदर आणि दुसरें मोरवी. गांवांतील बाजारभाग व इतर वस्ती ही आखीव रस्त्यांच्या कडेनें वसलेली आहे. बाजार-रस्ता तर चांगला ऐसपैस आहे. ह्यामुळें तेथून जातांना विशेष प्रशस्त वाटतें. येथील राजवाडे चांगले प्रेक्षणीय आहेत. पूर्वींच्या राजांनीं जे अनेक राजवाडे बांधून ठेवले आहेत, त्यांचा उपयोग लोकशाही जमान्यांत शिक्षण-संस्थांना व अन्य समाजोपयोगी संस्थांना होत आहे. सबंध सौराष्ट्रभर इतके राजवाडे मोकळे पडलेले आहेत, कीं शाळा-कॉलेजांना नव्या इमारती बांधण्याची सध्या तरी येथें जरूर भासत नाहीं. मोरवीचें इंजिनिअरिंग कॉलेज एका राजवाड्यांतच आहे. तेथील 'वाघमहाल' प्रेक्षणीय आहे. तेथें मोरवी संस्थानचें सेक्रेटरीएट होतें. अशा प्रकारच्या इतरही अनेक इमारती येथें पाहाण्यासारख्या आहेत.

येथें असतांना मला एक मोठी चांगली संधि मिळाली, ती म्हणजे येथील विकास-योजनेंतील स्त्रियांची एक रात्र-शाळा पाहाण्याची. अर्थात् तिला रात्र-शाळा म्हणण्यापेक्षां साक्षरतेचा वर्गच म्हणणें योग्य होईल. कारण तिचा मुख्य उद्देश, स्त्रियांना अक्षरज्ञान करून देणें, हाच आहे. दहा वर्षांच्या मुलीपासून पंचवीस-तीस वर्षांच्या बाईपर्यंत सर्व वयाच्या स्त्रिया त्या वर्गात होत्या. अर्थात् त्यांतल्या बहुतेक सगळ्या विवाहित होत्या, हें सांगायला नकोच! त्या छोट्याशा गांवीं शिक्षणाची इतकी आवड उत्पन्न झालेली आहे, कीं शाळेची छोटी इमारत अपुरी पडल्यामुळें दोन पाळ्या कराव्या लागतात.

मी गेलों त्या वेळीं सुगीचा हंगाम होता. दिवसभर थकूनभागून आलेल्या त्या बायकांना परत शेतावर जायचें होतें. पण मधल्या वेळेंत

त्या शाळेला आलेल्या होत्या. कांहींजणी तर वर्ग संपण्यापूर्वीच शेताकडे निघून गेल्या, पण वर्गांत चाललेला कार्यक्रम सोडून जातांना, त्यांच्या जिवावर आलें होतें, हें स्पष्ट दिसत होतें. त्यांच्याकडून मीं कांहीं गाणीं ऐकलीं, तेव्हां त्यांनीं मलाही एखादें भजन म्हणून दाखविण्याचा निर्भयपणें आग्रह केला. मीं त्यांना ' उठ, जाग मुसाफिर भोर भई ' हें भजन गाऊन दाखविलें, तें त्यांना इतकें आवडलें, कीं तें लगेच लिहून देण्याबद्दल त्यांनीं लकडा लावला. माझे मित्र श्री. नाथालाल दवे ह्यांनीं त्यांना तें लिहून देण्याचें आश्वासन दिलें, तेव्हांच आमची सुटका झाली.

## मुंबईचा नक्षा उतरून टाकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारें
# कंडला बंदर

सौराष्ट्राचा दौरा करीत करीत मी द्वारकेला पोंचलों, तेव्हां नोव्हेंबर १९५५ ची ९ तारीख उजाडली होती. ता. १२ ला दिवाळी होती. घरून निघाल्याला मला तीन आठवडे होऊन गेले होते आणि महाराष्ट्रीय माणूस कितीही पुरोगामी अथवा निधार्मिक बनला, तरी दिवाळीविषयीं त्याच्या मनांत असणारें जबरदस्त आकर्षण मुळींच कमी झाल्याचें आढळत नाहीं. ह्यामुळें दिवाळी-दिवशीं स्वतःच्या घरीं, आपल्या मुलांबाळांमध्यें जाऊन पोंचण्याची ओढही मला लागलेली होती. ह्यामुळें सौराष्ट्राचा परिचय करून घेतला तेवढा पुरे झाला, कच्छची मुशाफरी करण्यासाठीं पुनः केव्हां तरी यावें, असा विचार मनांत घोळूं लागल्यास नवल नाहीं. वस्तुतः द्वारकेपासून कच्छ कांहीं तसें फार दूर नाहीं. योग्य साधनें असतील, तर दोन-चार तासांत द्वारकेहून कच्छला जातां येईल, परंतु सरंजामशाही राजवटीच्या जोखडाखालून नुकत्याच मुक्त झालेल्या सौराष्ट्रांत, वाहतुकीचीं साधनें

फारच दुबळीं व अपुरीं असलीं तर काय आश्चर्य ? म्हणून कच्छमधील भुज, मांडवी, वगैरे ठिकाणीं जाण्याचा बेत रहित करून, फक्त कंडला बंदर पाहून यावें, असें मीं ठरविलें. तेंही कांहीं सोपें नव्हतें. द्वारकेहून राजकोटला जाऊन व तेथून वांकानेर जंक्शन (एकूण १६४ मैल) गांठायचें व तेथून मोरवीवरून नवलखी बंदरापर्यंत (४६ मैल) गाडीनें जायचें. तेथून फेरीबोटीनें किंवा वाफरांत बसून सुमारें २०-२२ मैलांची कच्छची खाडी ओलांडायची, तेव्हां कोठें कंडला बंदर दिसणार! वाहतुकीचीं साधनें व्यवस्थित असतील, तर हा सव्वादोनशें किंवा अडीचशें मैलांचा प्रवास कांहीं फार मोठा म्हणतां येणार नाहीं, पण एवढ्या अल्प अंतरासाठींही मला तीस तास घालवावे लागले! द्वारकेहून सायंकाळीं ४ ला मी निघालों आणि दुसऱ्या दिवशीं रात्रीं ९-९॥ च्या सुमारास गांधीधामला पोंचलों.

## कंडला बंदराचें महत्त्व

वस्तुतः इतकी धडपड नि धावपळ करायची जरूर तरी काय होती, असें कोणी विचारील. त्यावर माझें उत्तर असें, कीं कंडला बंदराला दिवसेंदिवस जें महत्त्व येत आहे, त्यामुळें तें बंदर आहे तरी कसें, हें पाहाण्याची तीव्र उत्कंठा माझ्या मनांत निर्माण झाली होती. म्हणून कच्छचा फेरफटका करणें जमलें नाहीं, तरी निदान इतक्या दूर आल्यानंतर, कंडला बंदर तरी नजरेखालून घालायचेंच, असें मीं ठरवलें आणि त्याप्रमाणें तें पाहून आलों.

अखंड भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर मुंबई व कराची हीं दोन मुख्य व मोठीं बंदरें होतीं. ह्यांपैकीं मुंबईचे हात पश्चिम व मध्यभारतापर्यंत पोंचलेले होते आणि कराचीनें उत्तर भारताचा व्यापार आपल्याकडे ओढून घेतलेला होता. सिंध, पंजाब, राजस्थान व उत्तर प्रदेश आणि कच्छ व सौराष्ट्र, एवढा प्रदेश कराचीच्या कक्षेंत येत होता. तें बंदर पाकिस्तानांत गेल्यामुळें मुंबईवरील ताण भयंकरच वाढला आणि कच्छ, सौराष्ट्र, राजस्थान, पंजाब व उत्तर प्रदेश ह्या

विभागाला मुंबईवर अवलंबून राहावें लागलें. ह्याचा प्रत्यक्ष व्यापारावर काय परिणाम होतो, ह्याची कल्पना आपल्यासारख्या व्यापारांत अनभिज्ञ असणाऱ्या लोकांना सहसा येत नाहीं. मीही ह्याला अपवाद कसा असेन ? पण नवलखी बंदराहून कंडला बंदराकडे वाफरांतून जात असतां, प्रवासांत भेटलेल्या एका सिंधी व्यापाऱ्याला मीं ह्यासंबंधीं प्रश्न विचारला, तेव्हां तो म्हणाला, "माझा स्वतःचाच अनुभव तुम्हांला सांगतों, म्हणजे तुमच्या लक्षांत येईल. मी एक छोटा दुकानदार आहें. माझं सायकलचं दुकान आहे. मला लागणारं सामान जर मीं मुंबईहून मागवलं, तर मला रुपयाला ६ पैसे खर्च येतो. उलट तेंच सामान दिल्लीहून मागवलं, तर ४ पैसे किंवा कित्येकदा २ पैसेही खर्च येतो. ह्याचं कारण मुंबईपर्यंतचं अंतर जास्त आहे नि वाहतुकीचीं साधनंही चांगलीं नाहींत."

"मग तुम्हीं सगळं सामान दिल्लीहूनच कां मागवीत नाहीं ?" मीं विचारलें.

"आम्हांला लागणाऱ्या सगळ्याच गोष्टी दिल्लीला मिळतातच असं नाहीं. शिवाय भावांत फरक पडतोच. दिल्लीचा माल मुंबईहूनच गेलेला असतो. ह्यामुळें तो मुंबईपेक्षां महाग पडतो. तेव्हां मालाचा दर नि वाहतूकखर्च ह्यांचा विचार करून, आम्हांला ऑर्डर द्यावी लागते. उद्यां कंडला बंदरांतून वाहतूक सुरू झाली, कीं मुंबईपेक्षांही जास्त स्वस्त माल इथें मिळूं लागेल, कारण कंडला ते मुंबईपर्यंतचं अंतर कमी होईल आणि दिल्लीलाही माल थोड्या वेळांत नि कमी खर्चांत मिळूं लागेल."

अशी आहे ही व्यापारी ग्यानबाची मेख ! कंडला बंदर झाल्यानंतर उत्तर भारतांत जाणाऱ्या ( व येणाऱ्या ) मालाचा सुमारें दोनशें मैलांचा रेल्वे-प्रवास वांचेल आणि तेवढ्यानेंच दरसाल नव्वद लाख रुपयांचा दळणवळणखर्च कमी होईल. शिवाय वेळ व परिश्रम वांचतील तें वेगळेंच.

## थोडासा इतिहास

हिंदुस्थानला जवळजवळ साडेतीन हजार मैल लांबीचा समुद्र-किनारा लाभला आहे. वस्तुतः ही किती भाग्याची गोष्ट आहे! समुद्र-किनाऱ्यामुळें संरक्षण तर होतेंच, पण जमिनीवरील वाहतुकीपेक्षां समुद्रांतील वाहतूक ही अनेक पटींनीं स्वस्त असल्यामुळें, त्या दृष्टीनेंही समुद्राचा खूप उपयोग होतो. परंतु दीडशें वर्षांच्या पारतंत्र्याच्या काळांत इकडे कोणालाच लक्ष देतां आलें नाहीं. म्हणून ह्या साडेतीन हजार मैल लांबीच्या किनाऱ्यावर फक्त पांच मोठीं बंदरें निर्माण होऊं शकलीं. तीं म्हणजे मुंबई, मद्रास, कलकत्ता, कोचीन व विशाखापट्टण हीं होत. ह्यांच्यापेक्षां कितीतरी अधिक बंदरांची आपल्याला आवश्यकता आहे आणि त्या दृष्टीनें स्वतंत्र भारताच्या सरकारनें प्रयत्नही सुरू केला आहे.

कंडला बंदराचें नांव जरी आपण नुकतेंच ऐकूं लागलों असलों, तरी पश्चिम किनाऱ्यावर कोठें कोठें मोठीं बंदरें तयार करतां येतील, हें पाहाण्यासाठीं नेमण्यांत आलेल्या 'दि वेस्ट कोस्ट मेजर पोर्ट डेव्हलपमेंट कमिटी' नें भारताच्या फाळणीपूर्वींच, म्हणजे १९४६ सालीं ह्या ठिकाणीं मोठें बंदर तयार करण्याची शिफारस केलेली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

हें बंदर अगदींच नवें नसून सुमारें पंचवीस वर्षांचें जुनें आहे. इ. स. १९३० सालीं कच्छच्या महाराजांनीं स्थानिक गरजा भागविण्यासाठीं म्हणून हें छोटेंसें बंदर बांधलें. आज त्याला जुनें बंदर असें म्हणतात. सध्या नवलखीहून जाणारीं वाफरें ह्याच बंदराला लागतात आणि तेल, मीठ, वगैरे मालाची वाहतूक ह्याच बंदरांतून होते. अजून नव्या बंदरांत माणसांचीं जहाजें येऊं लागलेलीं नाहींत. ह्यामुळें सगळी वाहतूक ह्या जुन्या बंदराच्या द्वारेंच होते. नवें कंडला बंदर ह्या जुन्या बंदराजवळच असून, नवें बंदर तयार झाल्यानंतरही हें जुनें बंदर आपलें काम करीतच राहील, असें दिसतें.

श्री. कस्तुरभाई लालभाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या पश्चिम भारत मुख्य बंदर कमिटीनें १९४८ सालीं, कंडला येथें मोठें बंदर व्हावें, अशी शिफारस केली आणि ती भारत-सरकारनें ताबडतोब स्वीकारली व १९४९ सालीं प्रारंभिक कामाला सुरुवातही झाली. प्रत्यक्ष कामास सुरुवात ( पायाभरणी ) ता. १० जानेवारी, १९५२ रोजीं भारताच्या पंतप्रधानांच्या हस्तें झाली.

## आणि गांधीधाम

ह्याच वेळीं भारताच्या फाळणीमुळें सिंधमध्यें शांततेच्या आशेवर राहिलेले हजारों हिंदु लोक निर्वासित बनून भारतांत येऊं लागले. सिंधपासून कच्छचा प्रदेश जवळ आहे आणि तेथील हवापाणी व एकूण वातावरण सिंधी लोकांना मानवणारें आहे, त्यामुळें आपल्याला कच्छमध्यें वस्ती करून राहातां आलें तर बरें होईल, असें सिंधी निर्वासितांना वाटलें असल्यास नवल नाहीं.

श्रीप्रताप दियालदास ( दयाळदास ) ह्या सिंधी धनिक गृहस्थांनीं आपल्या कांहीं मित्रांच्या सहकार्यानें १९४७ सालींच ‘ सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ’ ( सिंधु पुनर्वसाहत संस्था ) नांवाची जॉइंट स्टॉक कंपनी स्थापन केली व भारत-सरकारकडे ( कारण कच्छचा प्रदेश भारत-सरकारच्या हुकमतीखालीं होता ) कंडला बंदराजवळ पंधरा हजार एकर जमिनीची मागणी केली. त्याप्रमाणें जानेवारी १९४८ मध्यें ही जमीन दरसाल एक हजार रुपयांच्या नाममात्र भाड्यानें कंपनीला मिळाली.

पुढें १२ फेब्रुवारी, १९४८ रोजीं राष्ट्रपिता गांधीजींची थोडीशी रक्षा कंडलाच्या खाडीमध्यें आचार्य जे. बी. कृपलानी ह्यांच्या हस्तें विसर्जित करण्यांत आली आणि त्याच दिवशीं नव्या नगरीचा पायाभरण समारंभ झाला व तिला ‘ गांधीधाम ’ असें नांव देण्यांत आलें. आचार्य जीवतराम कृपलानी हे ह्या सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष असून श्री. भाईप्रताप दयाळदास हे ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

तेव्हांपासून ह्या नगरीची निर्मिति मोठ्या वेगानें सुरू असून आतांपर्यंत पुष्कळच काम झालेलें आहे.

## कंडला बंदराचीं वैशिष्ट्यें

परंतु 'गांधीधाम' ची माहिती करून घेण्यापूर्वी, कंडला बंदराचाच परिचय करून घेणें आवश्यक आहे. कारण कंडला बंदर येथें झालें नसतें, तर 'गांधीधामा' कडे कोणाचें लक्ष गेलें असतें कीं नाहीं, हें सांगणें कठीण आहे. किंबहुना, कंडला बंदर झालें नसतें, तर 'गांधीधाम' ही उभें राहिलें असतें, असें सांगतां येत नाहीं.

कंडला बंदर हें मोठें बंदर बनविण्यांत यावें, अशी जी शिफारस 'दि वेस्ट कोस्ट मेजर पोर्ट डेव्हलपमेंट कमिटी' नें केली, तिचीं कारणें काय आहेत, हें प्रथम पाहिलें पाहिजे.

कराची पाकिस्तानांत गेल्यामुळें पंजाब, राजस्तान, उत्तर प्रदेश, वगैरे प्रदेशांत मुंबईसारख्या दूर अंतरावरच्या बंदरावर अवलंबून राहावें लागूं लागलें आणि म्हणून कराची व मुंबई ह्यांच्या दरम्यान एखाद्या मोठ्या बंदराची आवश्यकता फाळणीमुळें निर्माण झाली होती, हें वर सांगितलेंच आहे. ही आवश्यकता पुरी करण्यासाठीं सौराष्ट्रांतील भावनगर, पोरबंदर, ओखा, वगैरेंपैकीं एखादें बंदर निवडतां आलें नसतें, असें नाहीं, पण ह्या सर्व बंदरांपेक्षां कंडलाजवळ एक वैशिष्ट्य आहे, तें म्हणजे त्याची वाकण असलेली खोल खाडी. कोणत्याही ठिकाणीं उत्कृष्ट बंदर बनवायचें असेल, तर त्याला दोन गोष्टी आवश्यक असतात : एक म्हणजे मोठमोठीं वादळें आणि वावटळी ह्यांपासून तें स्थान सुरक्षित असलें पाहिजे. (अशा प्रदेशाला 'sheltered waters' असें म्हणतात.) म्हणजे तें बंदर अगदीं उघड्यावर असतां कामा नये. (अर्थात् उघड्यावर असलेलें बंदर शत्रूच्या माऱ्यांत चटकन् सापडतें हाही त्याचा एक दोष असतोच.) आणि दुसरी गोष्ट अशी, कीं बंदराजवळील पाणी खोल असलें पाहिजे. पाणी खोल नसेल, तर

मोठमोठ्या जहाजांना बंदरापर्यंत येतांच येणार नाहीं. शिवाय बंदरभाग चांगला विस्तृत असला पाहिजे. तो इतका ऐसपैस असला पाहिजे, कीं आंत येणाऱ्या जहाजाला कोणतीही अडचण न पडतां, इकडे तिकडे वळतां आलें पाहिजे.

कंडलाच्या बाबतींत ह्या सर्व अटी पूर्ण झालेल्या आहेत. कंडला बंदर हें कच्छच्या आखाताच्या एका टोकाला एखाद्या नालाच्या आकाराच्या सहा मैल लांबीच्या दक्षिणोत्तर खाडीच्या किनाऱ्यावर आहे. त्यामुळें उघड्या समुद्रांत उठणाऱ्या वादळांची भीति त्याला नाहीं. ह्या खाडींतील पाणी पावसाळ्यांतही फार शांत राहातें. तेथें खोलीही भरपूर म्हणजे ३० फूट ड्राफ्टवाल्या मोठ्या बोटी (स्टीमर्स) सहज ये-जा करूं शकतील एवढी, म्हणजे संथ जलपृष्ठाच्या (lowest tide) खालीं ३० ते ५५ फूट इतकी आहे. (ड्राफ्ट म्हणजे कोणत्याही गलबताला तरण्यासाठीं लागणारें पाणी.) ह्या नालाच्या आकाराच्या खाडीची सरासरी रुंदी २,५०० फूट (कांहीं ठिकाणीं २ हजार फूट, तर कांहीं ठिकाणीं ३ हजार फूट आहे.) असल्यामुळें एका वेळीं अधिक जहाजें बंदरांत राहूं शकतात आणि बंदरांत येणाऱ्या जहाजांना हालचाली करतांना अडचण भासत नाहीं. मीं ज्या वेळीं रात्रीं ८ च्या सुमारास कंडला बंदरांत प्रवेश केला, त्या वेळीं तेथें एक प्रचंड तेलवाहू जहाज येऊन थांबलेलें होतें. त्याच्यावरील दिव्यांच्या झगझगाटामुळें तो एखादा तरता राजवाडाच असावा, असा त्या अंधारांत भास होत होता. पाण्याची खोली व उथळपणा दाखविणारे विजेचे दिवेही संबंध खाडीमध्यें रस्त्याच्या दोन्ही बाजूंस लुकलुकत असून, रात्रीच्या वेळीं त्यांची शोभा मोठी छान दिसत होती.

## एक मोठा दोष

ह्या बंदरांत एक फार मोठा दोष आहे व तो निसर्गानेंच निर्माण केलेला आहे. तो असा, कीं ह्या खाडीच्या तोंडाशीं एक रेतीचा मोठा

बंधारा आहे. ह्याला इंग्रजींत 'बार' ( Bar ) असें म्हणतात. बंदरांत शिरणाऱ्या प्रत्येक जहाजाला हा बंधारा ओलांडून आंत प्रवेश करावा लागतो. ह्या बंधाऱ्यावर ओहटीच्या वेळीं १३ फूट पाणी असतें. ह्यामुळें त्या वेळीं मोठीं जहाजें येथून जाऊं-येऊं शकत नाहींत. परंतु ज्या निसर्गानें हा अडथळा निर्माण केला आहे, त्यानेंच त्यांतून सुटण्याचा एक मार्गही स्वतःच्या हातीं राखून ठेवलेला आहे. त्यासाठीं माणसाला निसर्गाच्या इच्छेवर किंवा कालचक्रावर अवलंबून राहावें लागतें, एवढेंच. त्या बाबतींत निसर्ग आडदांडपणा किंवा लहरीपणा मात्र मुळींच करीत नाहीं, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. हा मार्ग म्हणजे भरतीची लाट. समुद्राच्या ऐन भरतीच्या वेळीं येथील पाण्याची उंची ( Tidal Range ) जवळ जवळ २४ फुटांनीं वाढते. सप्तमी-अष्टमीच्या दिवशींही पाणी १६ फुटांनीं चढतें. ह्यामुळें भरतीच्या वेळीं मोठ्या जहाजांना ह्या बंधाऱ्यावरून सहज आंत प्रवेश करतां येतो व बाहेर पडतां येतें. त्यामुळें बोटींच्या अष्टौप्रहर गमनागमनांवर निर्बंध पडतो व भरती-ओहटीच्या वेळा सांभाळाव्या लागतात, हें मान्य केलेंच पाहिजे. सगळ्याच बंदरांतून अष्टौप्रहर जहाजांची ये-जा चालू शकते, असें थोडेंच आहे ? त्यामुळें हा दोषही फार तापदायक आहे, असें म्हणतां येत नाहीं. मात्र ह्या बंधाऱ्याचा विस्तार वाढूं नये किंवा खाडींतील एखाद्या ठिकाणचें पाणी उथळ होऊं नये, ह्यासाठीं रेती हटविण्याचें ( ड्रेजिंग ) काम सतत करावें लागणार आहे, पण तें सर्वच बंदरांतून करावें लागतें.

## आंतर-प्रदेशाची भरभराट

मोठ्या बंदरासाठीं जागेची निवड करतांना आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. ती म्हणजे त्याच्या आसपासचा आंतर-प्रदेश ( Hinter-land ) ही होय. कंडला बंदराला सुमारें चार कोटि पन्नास लक्ष लोकसंख्या असलेला, दोन कोटि सत्तर लक्ष चौरस मैलांचा उत्तर व पश्चिम भारताचा प्रदेश 'आंतर-प्रदेश' म्हणून लाभलेला आहे. ह्या

भागांत दुसरें मोठें बंदर नसल्यामुळें, त्यांतील सगळी वाहतूक ह्याच बंदरामार्फत होईल. म्हणजे ह्या बंदराला कामाची उणीव अशी कधीं भासणार नाहीं. हें बंदर बनवण्यापूर्वी कच्छचा प्रदेश इतर भारतापासून जवळ जवळ वेगळा पडलेला होता. ह्याच्या पश्चिमेस व दक्षिणेस समुद्र असून, उत्तरेची व पूर्वेची बाजू कच्छच्या रणानें व्यापलेली आहे. ह्या रणांत पावसाळ्यामध्यें मॉन्सून वाऱ्यामुळें समुद्राचें पाणी शिरतें आणि त्याच वेळीं कांहीं नद्याही आपापल्या पुरांचें पाणी घेऊन ह्या रणांत प्रवेश करतात. त्यामुळें एरव्हीं कोरडें ठणठणीत असणारें हें रण, जुलैपासून नोव्हेंबरपर्यंत सुमारें सहा महिने, पाण्यानें तुडुंब भरलेलें असतें. त्या वेळीं कच्छला एखाद्या बेटाचें स्वरूप प्राप्त झालेलें असतें. ही परिस्थिति नाहींशी करण्यासाठीं भारत सरकारनें कच्छला रेल्वेच्या द्वारें, खुष्कीच्या मार्गानें, इतर भारतीय प्रदेशांशीं जोडण्याचें नोव्हेंबर १९४९ मध्यें ठरविलें व त्याप्रमाणें जानेवारी १९५० मध्यें कामाला सुरुवात होऊन, २ ऑक्टोबर, १९५२ रोजीं राष्ट्रपति डॉक्टर राजेंद्रप्रसाद ह्यांच्या हस्तें कंडला (गांधीधाम) – डीसा ह्या १७० मैलांच्या मीटर गेज रस्त्याचें उद्‌घाटनही झालें. किती झपाट्यानें हें काम झालें, ह्याची कल्पना मनांत आली, कीं मन आश्चर्यानें थक्क होतें. ह्या रेल्वेमुळें कच्छचा भाग अहमदाबाद-अजमेर ह्या रेल्वे फाट्याला पालनपूरजवळ जोडला गेला. कारण डीसा–पालनपूर रेल्वे फाटा ( १७ मैल ) पूर्वीपासून होताच. आतां आणखी एक ब्रॉड गेज (मोठी लाईन) चा फाटा काढून, कंडला बंदराचा संबंध अहमदाबाद शहराशीं जोडण्याची योजना अंमलांत आणली जात आहे. अहमदाबादपर्यंत मोटार रस्ता ( Highway ) बांधण्याचें काम तर सुरूही झालें आहे. ह्यामुळें ह्या रेल्वे व मोटार मार्गावरील भागांत एक नवीन चैतन्य व उत्साह खेळूं लागेल आणि व्यापार-धंदा वाढल्यानें त्याची भरभराट होऊं लागेल. हीच गोष्ट राजस्थानलाही लागू आहे.

एक बंदर झाल्यामुळें ह्या भागांतील सगळ्या सुप्त शक्ति जागृत होतील आणि उद्योगधंद्यांना फार मोठें उत्तेजन मिळेल, ही गोष्ट आत्तांच स्पष्ट दिसूं लागली आहे. मालाची आयात-निर्यात सहजासहजीं होऊं शकते, अशी परिस्थिति नसेल, तर तेथील उद्योगी लोक (मारवाडी, कच्छी, वगैरे) आपला प्रदेश सोडून अन्यत्र जातात. आतां त्यांना अन्य प्रांतांत किंवा परदेशांत जावें लागणार नाहीं.

## निम्म्याहून अधिक आयात तेलाची

कंडला बंदरामध्यें बाहेरून येणाऱ्या मालामध्यें सर्वांत अधिक प्रमाण तेलाचें (पेट्रोल, रॉकेल, वगैरे) राहाणार आहे. १९४५-४६ सालीं ह्या जुन्या बंदरांतून साठ हजार टनांपेक्षांही कमी वजनाच्या मालाची आयात-निर्यात झाली होती. ती १९५५-५६ सालीं आठ लाख टनापर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. बंदराचा पूर्ण विकास झाला, म्हणजे हीच आयात-निर्यात तीस लाख टनांपर्यंत जाईल. ह्यावरून ह्या बंदराच्या अवाढव्यपणाची कल्पना येईल. कराचीमधून १९ लाख टनांचा व्यापार चालत होता आणि मुंबईमधून ४० लाख टन वजनाचा व्यापार चालतो. ह्यावरूनही ह्या बंदरासंबंधीं कांहीं कल्पना येऊं शकेल.

ह्या बंदरामध्यें रॉकेल, पेट्रोल, वगैरे तेलेंच प्रामुख्यानें आयात होणार असून, त्यांचें प्रमाण निम्म्याहून अधिक आहे. ह्यामुळें ह्या भागांत ह्या तेलांची अगदीं रेलचेल होऊन जाईल. डीसा – गांधीधाम रेल्वेवर चालणाऱ्या वाफेच्या आगगाड्यांचे बॉयलर वाटेंतील खारट पाण्यामुळें खराब होऊं नयेत, म्हणून त्या मार्गावर तेलावर चालणारीं इंजिनें वापरावींत, अशीही कल्पना कांहीं लोकांच्या डोक्यांत आहे. त्याचें कारण, येथें तेल स्वस्त पडेल, हेंच होय.

जुन्या कंडला बंदरांतही तेल उतरून घेण्यासाठीं एक उत्कृष्ट धक्का असून, त्याच्या द्वारें बराच मोठा तेल-पुरवठा कच्छच्या आंतर-प्रदेशांत होत असतो. तेलाचे हे येथील जाडजूड नळ पाहाणाऱ्याचें लक्ष चटकन् वेधून घेतात. हा धक्का मीं नीट हिंडून पाहिला, पण तो लक्षांत

राहाण्याचें कारण मात्र वेगळेंच आहे. जुन्या बंदर कचेरींतील ( Oil Port Offiice ) जे वृद्ध गृहस्थ तो धक्का दाखविण्यासाठीं माझ्याबरोबर आले होते, त्यांचा चेहरा, रंग, डोळे, कपाळावरचें गंध व कपडे हीं सर्व आपल्याकडील नमुनेदार कोंकणस्थ ब्राह्मणासारखीं होतीं. ह्यामुळें मी फसून त्यांना महाराष्ट्रीयच समजलों. पण ते कच्छी ब्राह्मण निघाले. वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकांत इतकें विलक्षण साम्य क्वचितच आढळतें. ह्यामुळें ते गृहस्थ आणि तो तेल-धक्का दोन्हीही माझ्या लक्षांत पक्कीं राहिलीं आहेत.

## ८ एप्रिल, १९५५

कंडला बंदराच्या इतिहासांत ८ एप्रिल, १९५५ हा दिवस अत्यंत महत्त्वाचा गणला जाईल. कारण त्या दिवशीं भारताचे वाहतूक व रेल्वे मंत्री श्री. लालबहादुर शास्त्री ह्यांच्या हस्तें तेथील तेल-धक्क्याचें उद्‌घाटन होऊन, कंडलों हें भारतांतील मुख्य बंदर झाल्याचें जाहीर करण्यांत आलें. तेव्हांपासून ह्या बंदरांत तेलाची मोठ्या प्रमाणावरील आयात सुरू झाली आहे. त्या वेळीं जरी तेल-धक्क्याचें उद्‌घाटन झालें असलें, तरी त्याचें काम पुरें झालें नव्हतें. मी गेलों त्या वेळीं हा धक्का पूर्ण होऊन, मोठीं तेलवाहू जहाजें येण्यास सुरुवात झाली होती. आपण आगगाडींतून जुन्या कंडला बंदरापासून गांधीधामला ( ६ मैल ) जाऊं लागलों, कीं वाटेंत बर्माशेल, काल्टेक्स व स्टँडर्ड व्हॅक्यूम ऑईल ह्या कंपन्यांच्या प्रचंड पांढऱ्या शुभ्र टाक्या रेल्वेच्या दोन्ही बाजूंना दिसतात. ह्यांत तेलाचा सांठा करण्यांत येतो व तेथून तो रेल्वेनें रवाना होतो. ह्या टाक्या देशपांडे नांवाच्या महाराष्ट्रीय कॉंट्रॅक्टरनीं बांधल्या आहेत असें समजलें, तेव्हां इतक्या लांब येऊन कंत्राट घेणाऱ्या मराठी माणसाचें कौतुक वाटल्याशिवाय राहिलें नाहीं.

तेलाच्या आयातीवरच मुख्यतः लक्ष केंद्रित करण्यांत आलेलें असल्यामुळें, तेलाच्या वाहातुकीसाठीं आधुनिकतम साधनें वापरण्यांत येत असलीं, तर त्यांत आश्चर्य नाहीं. तेलवाहू जहाजांसाठीं एक खोल

पाण्यांतील धक्का, एक थांबण्याचा धक्का, १२ इंच व्यासाचा एक व १६ इंच व्यासाचा एक, असे दोन-तीन हजार फूट लांबीचे प्रचंड लोखंडी नळ, एवढी सामग्री तेथें सज्ज आहे. ह्यांपैकीं १२ इंची नळ पेट्रोलसाठीं व १६ इंची नळ रॉकेल, क्रूड ऑइल्स, वगैरेंसाठीं आहे. जहाजांतील तेल ह्या नळांच्या द्वारें पंपानें सरळ पांच मैल दूर असलेल्या टाक्यांत सोडण्यांत येतें. ह्या पंपाच्या द्वारें दर मिनिटास २,५०० गॅलन तेल दर चौरस इंचास ३०० ते ४०० पौंडाच्या दाबानें टाक्यांतून भरलें जातें.

## सायकलवरून फेरफटका

वस्तुतः मला गांधीधामच्या गोपालपूर भागांत एका गुजराती मित्राकडे उतरायचें होतें, परंतु रेल्वेच्या लहरीपणामुळें, गांधीधाम स्टेशनपर्यंत पोंचायलाच रात्रीचे दहा वाजून गेले. तेथून गोपालपूर दोनच मैल असलें, तरी गाडी तेथपर्यंत पोंचायला तासभरसुद्धा सहज घेईल आणि मग अपरिचित ठिकाणीं अपरात्रीं पत्ता शोधून काढणेंही जमणार नाहीं, म्हणून गांधीधाम स्टेशनजवळच्या रेल्वे कॉलनींतच मीं एखाद्या हॉटेलांत उतरावें, असा पोक्त सल्ला गाडींतील उतारू मित्रांनीं दिल्यामुळें, मी गांधीधाम स्टेशनवरच उतरलों आणि रोजीं फक्त एक रुपया निवास-शुल्क घेणाऱ्या एका स्वस्त सिंधी हॉटेलांत ( ह्यापेक्षां अधिक स्वस्त हॉटेल कोठें असेल, असें मला वाटत नाहीं ! ) मीं मुक्काम ठोकला. त्या एक रुपयांत झोपायला कॉट ( गादीसह ) व स्नानाला पाणी ( कोमट ), एवढी सोय झाली. सकाळीं स्नान, वगैरे उरकून, कॉलनींत फेरफटका मारला आणि ताशीं चार आणे भाड्याची सायकल घेऊन, कंडला बंदर पाहाण्यासाठीं बाहेर पडलों. सायकल घेण्याचें कारण असें, कीं तेथें बस सर्व्हिस अजून म्हणण्यासारखी व्यवस्थित सुरू झालेली नव्हती व तिच्यावर विसंबून राहिल्यास खूपच वेळ वायां जाणार होता. शिवाय सायकल घेऊन वाटेल तेथपर्यंत जातां येणार होतें. म्हणून मीं सायकलचाच प्रवास पसंत केला.

गांधीधामपासून नवें कंडला बंदर सुमारें ८ मैल दूर आहे. बहुतेक रस्ता डांबरी व उत्कृष्ट असल्यामुळें सायकल चालविण्यास फार श्रम पडले नाहींत. मी सायकल हातांत घेऊन, अगदीं समुद्राच्या कांठापर्यंत जाऊन आलों व तेथें चाललेलें बांधकाम पाहून घेतलें.

मी गेलों त्या वेळीं एक धक्का पूर्ण होऊन, दुसऱ्या धक्क्याचेंही काम बरेंच होत आलें होतें. एखादें बंदर तयार होत असतां, तेथील पाहाण्यासारखी गोष्ट, म्हणजे समुद्राच्या खोल पाण्यांत शिरून, माणूस समुद्रावर जें आक्रमण करतो, ती होय. कारण सगळे समुद्र कांठाला उथळच असणार. बोटी धक्क्याला लागायच्या, म्हणजे खोल समुद्रामध्यें जाऊनच धक्का बांधला पाहिजे. तें काम कसें चालतें, तें कंडल्याला मला पाहायला मिळालें. शिवाय बोटींतील माल उतरून घेणारीं व बोटींवर माल चढविणारीं यंत्रेंही तेथें खूप मोठ्या संख्येनें दिसलीं. येथील माल-धक्काही जवळ जवळ तयार होत आला होता. तेथें ३ टनी, ६ टनी, १० टनी अशा वेगवेगळ्या शक्ति असलेल्या यात्र्या वापरण्यांत येणार आहेत. प्रत्यक्ष बंदरावरून हा भाग पाहिला, तर त्याचें स्वरूप व अवाढव्यपणा नीट लक्षांत येत नाहीं. जुन्या कंडला बंदरांत वाफरांतून शिरतांना किंवा बंदरांतून बाहेर पडतांना, नव्या बंदराचा भव्यपणा चटकन् नजरेंत भरतो. तेथील यात्र्यांमुळें मोठमोठे प्रचंड बगळे किंवा करकोचे ह्यांची गर्दी तेथें झाल्याचें दिसूं लागतें. सूर्यास्ताच्या वेळीं तर येथील दृश्य फारच छान दिसतें.

बंदर बांधायचें, म्हणजे त्याच्या जवळ आयात केलेला व निर्यात करायचा माल ठेवण्यासाठीं मोठमोठ्या वखारी किंवा कोठारेंही हवींत. तींही बांधलीं जात आहेत. हीं सध्या एकमजलीच आहेत, परंतु पुढें मालाची आवक-जावक वाढल्यानंतर, त्यांवर आणखी एक मजला चढवितां येईल, अशी सोय आधींच करून ठेविलेली आहे. हें सर्व काम सीमेंट-कॉंक्रीटचें होणार असल्यामुळें, भूकंपाचाही त्यावर परिणाम होणार नाहीं, असें म्हणतात.

ह्या ठिकाणीं एकूण चार सामानाचे धक्के, तीन माल-उताराचीं कोठारें, एक तेलाचा धक्का, एक उतारूंचा धक्का, एक तरता धक्का, वगैरे अनेक कामें व्हायचीं आहेत. ह्यांतील बहुतेक कामें १९५७ पर्यंत पुरीं होतील, असा अंदाज आहे. बंदरापर्यंत रेल्वे मार्गही येऊन पोंचणार आहे. त्यामुळें माल-वाहतूक सोपी होईल. ह्या सर्व कामासाठीं एकूण सुमारें १४ कोटि रुपये ( १३·८३ कोटि ) खर्च येणार आहे.

बंदराच्या आसपास बराचसा भाग दलदलीचा आहे. तो भरून काढण्यासाठींही बराच खर्च करावा लागेल, परंतु सध्या त्याची घाई नाहीं. बंदरापासून गांधीधामापर्यंतचा ८ मैलांचा प्रदेश सध्या तरी मोकळाच राहील. जसजशी आयात-निर्यात वाढत जाईल, तसतसा हा प्रदेश वापरांत येऊं लागेल, असें वाटतें.

## पुनश्च गांधीधाम

अशा प्रकारें हें बंदर आधुनिक सुखसोयींनीं सज्ज करून, त्याला पश्चिम किनाऱ्यावरील उत्कृष्ट बंदर बनविण्यासाठीं भारत सरकार प्रयत्न करीत आहे. त्यांतील बारीक सारीक गोष्टींविषयीं इतक्यांत विस्तारानें लिहितां येणार नाहीं. १९५७ सालीं तें पुरें झालें, म्हणजेच त्याचें यथातथ्य चित्र आपल्यासमोर येऊं शकेल. तोंपर्यंत आपण तितक्याच महत्त्वाच्या दुसऱ्या भागाकडे, म्हणजे गांधीधामाकडे वळून त्याचें विहंगावलोकन करूं या.

बंदरभाग हा मध्यवर्ती सरकारच्या अधिकार-कक्षेंतील असून, तेथील सगळें काम ज्या बंदर अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं चाललेलें आहे, त्याला ‘डेव्हलपमेंट कमिशनर’ असें म्हणतात. ह्याच्या उलट गांधीधामची जबाबदारी प्रारंभी उल्लेखलेल्या ‘सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशन’ वर आहे. ह्या कंपनीचें अधिकृत भांडवल अडीच कोटींचें असून, तेवढ्यापुरती सरकारची देखरेख ह्या कामावर राहील, असें म्हणतां येईल. शिवाय सरकारनें १ कोटि, १० लाख रुपये इमारती बांधण्याकरितां लांब मुदतीनें कर्जाऊही दिले आहेत.

ह्या नगराचा प्रारंभीं जो आराखडा तयार करण्यांत आला होता, त्यांत १० ते १२ लाख लोकसंख्येच्या निवासाची तरतूद होती. त्याप्रमाणें आदिपूर व सरदारगंज ह्या दोन उपनगरांची आखणी करून, कामही हातीं घेण्यांत आलें, परंतु तो अव्यवहार्य असल्याचें लवकरच आढळून आलें, म्हणून दुसरा आराखडा तयार करण्यांत आला. त्यांत ५ लाख लोकसंख्येचा समावेश करण्याचें उद्दिष्ट होतें, परंतु अविकसित आंतर-प्रदेश आणि कंडला बंदराची मर्यादित प्रगति पाहातां हा आराखडाही सध्या अव्यवहार्य असल्याचें आढळून आलें आणि एका अमेरिकन कंपनीकडून तिसरा आराखडा तयार करवून घेण्यांत आला. ह्या आराखड्यामध्यें ६० हजारांपासून ४ लाखांपर्यंत हळूहळू वाढत जाणाऱ्या लोकवस्तीची कल्पना आहे. आतां ह्याच आराखड्याप्रमाणें काम चालू असून, आदिपूर, सरदारगंज (सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ), गोपालपुरी (श्री. एन्. गोपालस्वामी अय्यंगार ह्यांच्या स्मरणार्थ) आणि रेल्वे कॉलनी अशीं चार छोटीं उपनगरें तयार झालीं आहेत. ह्यांच्यांत भरपूर अंतर असल्यामुळें, पुढें-मागें वाटेल तितकी वाढ करतां येईल.

सरकारकडून मिळालेल्या मदतीवर आतांपर्यंत ३,१२४ घरें व ३४८ दुकानें बांधून तयार झालीं आहेत. हीं घरें व दुकानें निर्वासितांना विकत देण्यांत आलेलीं असून, त्यांची किंमत त्यांनीं २५ वर्षांत फेडायची आहे. कांहीं निर्वासितांना त्यांच्या पाकिस्तानांत राहिलेल्या मालमत्तेचा मोबदला म्हणूनही घरें व दुकानें मिळालेलीं आहेत.

ह्याखेरीज बंदर विभाग आणि रेल्वे खातें ह्यांनींही आपापल्या नोकरवर्गाकरितां घरें बांधलेलीं आहेत.

गांधीधामाच्या सर्व घरांतून राहात असलेल्या लोकांची एकूण संख्या आतां सुमारें २५ हजार झालेली आहे. ह्या सर्व घरांना पाणी व वीज ह्यांचा पुरवठा झालेला असून, ही सर्व जबाबदारी ' सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशन ' वर आहे. सध्या तेथें म्युनिसिपालिटी, वगैरे नाहीं. त्यामुळें

नगरपालिकेचें कामही कॉर्पोरेशनच करते. नगरनिर्मितीसाठीं लागणारें सीमेंट, विटा, ह्यूम पाइप्स, लाकूडकाम, लोखंडी सामान, वगैरे वस्तूंसाठीं कॉर्पोरेशननें स्वतःचे कारखाने उभारलेले असून, त्यांतून फार मोठ्या प्रमाणावर माल तयार होतो आणि बांधकाम झटपट होण्यास त्यायोगें मदत होते.

## मुख्य प्रश्न पाण्याचा

कंडला बंदर आणि गांधीधाम ह्यांचें भवितव्य जर कोणत्या एका गोष्टीवर अवलंबून असेल, तर ती म्हणजे पिण्याचें पाणी होय. कंडला व गांधीधामच नव्हे, तर सारा कच्छ देशच वालुकामय आणि रणानें वेढलेला असा आहे. येथें गोडें पाणी मिळणें ही गोष्ट, सोन्याची खाण सापडण्यापेक्षांही जास्त मोलाची व महत्त्वाची आहे. जर येथें भरपूर गोडें पाणी मिळूं शकलें, तर येथील लोकसंख्या वाटेल तितकी वाढूं शकेल आणि वृक्षराजीचीं दृश्यें दिसूं लागून, ह्या भागाला नंदनवनाचें स्वरूप प्राप्त होईल, पण सारें घोडें येथेंच पेंड खात आहे.

गांधीधामाच्या वायव्येस चार मैलांवर वीडी नांवाच्या गांवाजवळ सध्या पांच नलिकाकूप ( ट्यूब वेल्स ) तयार करण्यांत आलेले असून, त्यांचें पाणी सर्वत्र पोंचविलें जात आहे. आदिपूर विभागांत मुख्यतः वरिष्ठ अधिकाऱ्यांची वस्ती असल्यामुळें, तेथें घरोघरीं नळ जाऊन पोंचले आहेत. परंतु इतरत्र सार्वजनिक हौदावरूनच पाणी न्यावें लागतें. ह्याखेरीज नागलपूर आणि खंभरा ह्या गांवांतूनही पाणी आणण्याची योजना सध्या चालू आहे, परंतु हें सगळें पाणी मिळालें, तरी तें दोन लाखांपेक्षां अधिक लोकसंख्येला पुरणार नाहीं. पाण्याचा प्रश्न असा महत्त्वाचा होऊन बसल्यामुळें, जेथें माणसांनाच पुरेसें पाणी मिळेल कीं नाहीं ह्याची शंका आहे, तेथें झाडांकडे कोण लक्ष देणार ? सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशननें स्वतःच्या आवारांत बांधलेल्या सुमारें १२ मैल लांबीच्या रस्त्याच्या कडेला १५,११५ झाडें लावलेलीं आहेत. त्यांपैकीं जीं मोठीं झालीं आहेत, त्यांच्याबद्दल फारशी चिंता नाहीं,

पण नव्या झाडांना पाणी कसें मिळणार, ह्याविषयीं तेथील एका गृहस्थांनीं काळजी व्यक्त केली.

ह्या पाणी-पुरवठ्याचा पावसाशींही संबंध आहे, ही गोष्ट मला तेथें कळली. पाण्यासंबंधीं माहिती देणारे गृहस्थ म्हणत होते, " इथें दरसाल सरासरीनें जरी १३ किंवा १४ इंच पाऊस पडत असला, तरी त्यांत नियमितता मुळींच नसते. ह्यामुळें लागोपाठ दोन-दोन तीन-तीन वर्षेंही पावसाशिवाय जातात. अशा वेळीं पाण्याचे फार हाल होतात. यंदाचीच गोष्ट घ्या. ह्या वर्षीं इथें पाऊस फार कमी पडला. त्याबरोबर ट्यूब-वेलसमधील पाण्याला वरून मिळणारं प्रेशर कमी झालं आणि पाणी कमी प्रमाणांत येऊं लागलं. असं अवर्षण लागोपाठ पडलं, तर प्यायलाही पाणी मिळेल कीं नाहीं, ह्याची शंका आहे. अशा स्थितींत झाडांना पाणी कुठलं आणायचं ? म्हणून तर तुम्हांला जिकडे तिकडे हा ओसाड नि वैराण प्रदेश पसरलेला दिसतो आहे. "

## मुंबईचें स्थान घेऊं शकेल काय ?

येथें असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं पाण्याची इतकी टंचाई असतांना ह्याची वाढ कशी होईल ? मुंबईवरील ताण ( लोकसंख्येचा ) कमी करण्याच्या बाबतींत कंडला बंदर कितपत उपयोगी पडेल, ह्याचा मात्र विचार करावा लागेल. जेथें जास्तींत जास्त २ लाख लोक राहूं शकतील, तेथें मुंबईवरील लोकसंख्येचा ताण कसा कमी होणार ? कामाचा ताण थोडाफार कमी होईल, हें खरें, पण तें कामही फक्त बंदरभागापुरतेंच असेल. गिरण्यांचा पसारा सहजासहजीं हलवितां येण्यासारखा नाहीं आणि म्हणूनच कंडल्याला अथवा गांधीधामला तेथील लोकांची इच्छा असूनही कापडगिरणी निघूं शकलेली नाहीं. अर्थात् तेथील हवा कापडगिरणीला कितपत अनुकूल आहे, याचाही विचार करावा लागेलच. कारण कंडला हें समुद्रकांठीं असलें, तरी तेथील हवा मुंबईप्रमाणें दमट नसून खूपच कोरडी आहे.

पाण्याच्या पुरवठ्यासंबंधीं एका मित्रानें अशी कल्पना सांगितली, कीं भाक्रा-नानगल धरणाचें पाणी राजस्थानांत येणार आहे. तेंच पुढें कच्छमध्यें आणतां आलें, तरच तेथील पाण्याचा प्रश्न सुटेल. अर्थात् पाण्याचा तुटवडा असूनही सुमारें १८ एकर जमीन, उद्यानें, बागा, नर्सरी ह्यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत आलेली असून, तेथें बागाही लावण्यांत आल्या आहेत. तसेंच ८६ एकर जमीन शेतीसाठीं ठेवलेली असून, त्यापैकीं १८ एकर जमिनींत सांडपाण्यावर शेती केली जाते. तिच्यांत हिरवा चारा, फळें, भाजीपाला, भुईमूग, डाळी व धान्यें ह्यांचा समावेश होतो.

ह्या रेताड प्रदेशांत मध्येंच एखादें हिरवेंगार शेत पाहिलें, कीं मनाला किती आनंद होतो, ह्याचा अनुभव मला गांधीधामपासून कंडल्याला सायकलवरून जातांना आला. गांवाबाहेरच एका लहानशा शेतांत बाजरीचीं इवलींशीं रोपें सकाळच्या संथ वाऱ्याबरोबर हलकेंच डोलत असलेलीं पाहून सानंदाश्चर्य वाटलें. कारण तेथें विहीर, वगैरे दिसत नव्हती. पावसाळ्याच्या अखेरीस एखादा पाऊस पडला असेल आणि त्यावरच तें छोटें शेत उभें राहिलें असेल.

## शिक्षणाची व्यवस्था

रस्ते, पाणी व वीजपुरवठा, ड्रेनेज, वगैरे सोयींप्रमाणें सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशननें मुलांच्या शिक्षणाचीही व्यवस्था केलेली असून, ती त्यासाठीं दरसाल ५४ हजार रुपये खर्च करीत असते. त्यापैकीं १९ हजार रुपये कच्छ सरकारकडून व ३५ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या फीमधून वसूल होतात. येथें बालवर्गापासून मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण तर मिळतेंच, पण त्याशिवाय सिव्हिल इंजिनियरिंग व व्यापारकला ह्यांचेही वर्ग चालविले जातात. ह्याखेरीज दवाखाने, रुग्णालयें, बँका, देवळें, चित्रपटगृहें, क्लब, वगैरे गोष्टीही येथें आहेत. सारांश, जीवनाचें कोणतेंही अंग उपेक्षित राहूं नये, ह्यासाठीं येथें शक्य तेवढी सर्व खबरदारी घेतली

जात असते. नगरपालिकेचीं कामें करण्यासाठीं 'गांधीधाम पालिका समिति' नांवाची संस्था कॉर्पोरेशननें तयार केलेली आहे.

## गांधीधामचें सुंदर स्टेशन

ह्या सारा भाग सपाट व वैराण असल्यामुळें, मुंबईच्या मलबारहिलवरील हॅंगिंग गार्डनची किंवा कलकत्त्याच्या उद्यानांची शोभा येथें आणतां येणार नाहीं, परंतु इमारतींमध्यें सौंदर्य आणून, ही उणीव थोडीफार भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. अशा इमारतींपैकीं गांधीधामचें स्टेशन हें एक आहे. गांधीधामांत मीं प्रवेश केला, तेव्हां रात्र असल्यामुळें ह्या स्टेशनची भव्यता माझ्या लक्षांत आली नव्हती, पण जातांना मात्र मीं तें नीट पाहून घेतलें आणि त्यानें मुंबईच्या स्टेशनला खास मागें टाकलें आहे, हें मीं स्वतःशीं कबूल केलें. सुमारें साडेसहा लाख रुपये खर्चून बांधलेल्या ह्या दुमजली स्टेशनांत चार वेटिंगरूम्स, एक मोठा वेटिंग हॉल व १२ रिटायरिंग रूम्स आहेत. हा भाग भूकंपीय प्रदेशांत मोडत असल्यामुळें स्टेशनची इमारत व बंदरांतील इमारतीही भूकंपाला दाद न देणाऱ्या, अशा बांधलेल्या आहेत.

## बकालीपणाची छाया

मीं मुख्यतः रेल्वे कॉलनीच पाहिली, पण तेथील स्वरूपावरून एकूण शहरासंबंधीं थोडी फार कल्पना आली. गांधीधाममध्यें निम्म्याहून अधिक लोक सिंधी असल्यामुळें, त्यांच्या संस्कृतीची छाप ह्या शहरावर पडली असल्यास नवल नाहीं. अस्वच्छता व गलिच्छता बऱ्याच मोठ्या प्रमाणावर तेथें दिसली. मुंबई शहर अलीकडे बकाली बनत चाललें असलें, तरी त्याला एक सुसंस्कृत परंपरा आहे व तेथील लोकांना संस्कारितेविषयीं थोडेंफार कां होईना, आकर्षण आहे. गांधीधाममध्यें तें अजिबात दिसत नाहीं. गांधीधामला जाण्यापूर्वीं मला असें कळलें होतें, कीं तेथें दारू व जुगार ह्यांचें राज्य आहे. जुगाराचें दर्शन मला झालें नाहीं, तरी दारूची मात्र कल्पना आली. माझ्याबरोबरच गाडींतून

उतरलेले एक मुंबईचे महाराष्ट्रीय गृहस्थ माझ्याच हॉटेलांत आले होते. त्यांनीं हॉटेलांत पाय ठेवतांच बीर (दारू) मागविली, परंतु हॉटेलांत फक्त ब्रँडीच होती आणि खालचें दारूचें दुकान बंद झालें होतें. त्यामुळें त्या गृहस्थांचा कसा जळफळाट झाला, तें मीं डोळ्यांनीं पाहिलें व मनांतल्या मनांत मला हसूं आलें.

अशा ह्या शहरांत सुसंस्कृत गुजराती समाज कितपत समरस होईल हें सांगणें कठीण आहे. सिंधी लोकांनंतर पंजाबी व मारवाडी लोकांची संख्या मात्र येथें वाढण्याची शक्यता जास्त आहे, कारण त्यांना हा भाग जवळ असून, येथील हवापाणी त्यांच्या परिचयाचें आहे. ह्यामुळें मुंबईवर गुजराती धनिकांना जसें वर्चस्व प्रस्थापित करतां आलें, तसें येथें करतां येईल, अशी फारशी शक्यता दिसत नाहीं. येथील स्थानिक जनता म्हणजे कच्छी लोकही सिंधी, पंजाबी, मारवाडी लोकांप्रमाणेंच व्यापारी असून त्यांचाही बराच प्रभाव ह्या बंदरावर राहील, असें दिसतें. सध्याच त्यांना बिगर कच्छी लोकांचें आगमन आवडेनासें झालेलें आहे!

हमाली व कारकुनी करणाऱ्या मराठी माणसांना मात्र येथें चांगलाच वाव आहे. अर्थात् इंजिनिअरिंग, वगैरे खात्यांत मोठमोठ्या हुद्द्यांवर असणारे अनेक महाराष्ट्रीयही येथें पाहायला मिळाले.

आणखी एका बाबतींत हें स्थान महत्त्वाचें ठरणार आहे. ती बाब म्हणजे विमानतळ. आज युरोपला जातांना कराचीचा विमानतळ टाळतां येत नाहीं. त्याला तोड म्हणून, कंडला येथें एक प्रचंड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यांत येणार आहे. तो तयार झाल्यानंतर कराचीच्या सागरी महत्त्वाप्रमाणें आकाशीय महत्त्वही हिंदुस्थानच्या दृष्टीनें पुष्कळच कमी होईल आणि दोन्ही बाबतींत भारत [illegible] स्वावलंबी होईल, असें समजायला हरकत नाहीं. ह्या दृष्टीनें ह्या बंदराचें सर्व भारतीयांनीं मनापासून स्वागतच केलें पाहिजे.

**स मा प्त**

ह्या नगराचा प्रारंभीं जो आराखडा तयार करण्यांत आला होता, त्यांत १० ते १२ लाख लोकसंख्येच्या निवासाची तरतूद होती. त्याप्रमाणें आदिपूर व सरदारगंज ह्या दोन उपनगरांची आखणी करून, कामही हातीं घेण्यांत आलें, परंतु तो अव्यवहार्य असल्याचें लवकरच आढळून आलें, म्हणून दुसरा आराखडा तयार करण्यांत आला. त्यांत ५ लाख लोकसंख्येचा समावेश करण्याचें उद्दिष्ट होतें, परंतु अविकसित आंतर-प्रदेश आणि कंडला बंदराची मर्यादित प्रगति पाहातां हा आराखडाही सध्या अव्यवहार्य असल्याचें आढळून आलें आणि एका अमेरिकन कंपनीकडून तिसरा आराखडा तयार करवून घेण्यांत आला. ह्या आराखड्यामध्यें ६० हजारांपासून ४ लाखांपर्यंत हळूहळू वाढत जाणाऱ्या लोकवस्तीची कल्पना आहे. आतां ह्याच आराखड्याप्रमाणें काम चालू असून, आदिपूर, सरदारगंज (सरदार वल्लभभाई पटेल ह्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ), गोपालपुरी (श्री. एन्. गोपालस्वामी अय्यंगार ह्यांच्या स्मरणार्थ) आणि रेल्वे कॉलनी अशीं चार छोटीं उपनगरें तयार झालीं आहेत. ह्यांच्यांत भरपूर अंतर असल्यामुळें, पुढें-मागें वाटेल तितकी वाढ करतां येईल.

सरकारकडून मिळालेल्या मदतीवर आतांपर्यंत ३,१२४ घरें व ३४८ दुकानें बांधून तयार झालीं आहेत. हीं घरें व दुकानें निर्वासितांना विकत देण्यांत आलेलीं असून, त्यांची किंमत त्यांनीं २५ वर्षांत फेडायची आहे. कांहीं निर्वासितांना त्यांच्या पाकिस्तानांत राहिलेल्या मालमत्तेचा मोबदला म्हणूनही घरें व दुकानें मिळालेलीं आहेत.

ह्याखेरीज बंदर विभाग आणि रेल्वे खातें ह्यांनींही आपापल्या नोकरवर्गाकरितां घरें बांधलेलीं आहेत.

गांधीधामाच्या सर्व घरांतून राहात असलेल्या लोकांची एकूण संख्या आतां सुमारें २५ हजार झालेली आहे. ह्या सर्व घरांना पाणी व वीज ह्यांचा पुरवठा झालेला असून, ही सर्व जबाबदारी ‘सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशन’ वर आहे. सध्या तेथें म्युनिसिपालिटी, वगैरे नाहीं. त्यामुळें

नगरपालिकेचें कामही कॉर्पोरेशनच करते. नगरनिर्मितीसाठीं लागणारें सीमेंट, विटा, ह्यूम पाइप्स, लाकूडकाम, लोखंडी सामान, वगैरे वस्तूंसाठीं कॉर्पोरेशननें स्वतःचे कारखाने उभारलेले असून, त्यांतून फार मोठ्या प्रमाणावर माल तयार होतो आणि बांधकाम झटपट होण्यास त्यायोगें मदत होते.

## मुख्य प्रश्न पाण्याचा

कंडला बंदर आणि गांधीधाम ह्यांचें भवितव्य जर कोणत्या एका गोष्टीवर अवलंबून असेल, तर ती म्हणजे पिण्याचें पाणी होय. कंडला व गांधीधामच नव्हे, तर सारा कच्छ देशच वालुकामय आणि रणानें वेढलेला असा आहे. येथें गोडें पाणी मिळणें ही गोष्ट, सोन्याची खाण सापडण्यापेक्षांही जास्त मोलाची व महत्त्वाची आहे. जर येथें भरपूर गोडें पाणी मिळूं शकलें, तर येथील लोकसंख्या वाटेल तितकी वाढूं शकेल आणि वृक्षराजीचीं दृश्यें दिसूं लागून, ह्या भागाला नंदनवनाचें स्वरूप प्राप्त होईल, पण सारें घोडें येथेंच पेंड खात आहे.

गांधीधामाच्या वायव्येस चार मैलांवर वीडी नांवाच्या गांवाजवळ सध्या पांच नलिकाकूप (ट्यूब वेल्स) तयार करण्यांत आलेले असून, त्यांचें पाणी सर्वत्र पोंचविलें जात आहे. आदिपूर विभागांत मुख्यतः वरिष्ठ अधिकाऱ्यांची वस्ती असल्यामुळें, तेथें घरोघरीं नळ जाऊन पोंचले आहेत. परंतु इतरत्र सार्वजनिक हौदावरूनच पाणी न्यावें लागतें. ह्याखेरीज नागलपूर आणि खंभरा ह्या गांवांतूनही पाणी आणण्याची योजना सध्या चालू आहे, परंतु हें सगळें पाणी मिळालें, तरी तें दोन लाखांपेक्षां अधिक लोकसंख्येला पुरणार नाहीं. पाण्याचा प्रश्न असा महत्त्वाचा होऊन बसल्यामुळें, जेथें माणसांनाच पुरेसें पाणी मिळेल कीं नाहीं ह्याची शंका आहे, तेथें झाडांकडे कोण लक्ष देणार ? सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशननें स्वतःच्या आवारांत बांधलेल्या सुमारें १२ मैल लांबीच्या रस्त्याच्या कडेला १५,११५ झाडें लावलेलीं आहेत. त्यांपैकीं जीं मोठीं झालीं आहेत, त्यांच्याबद्दल फारशी चिंता नाहीं,

पण नव्या झाडांना पाणी कसें मिळणार, ह्याविषयीं तेथील एका गृहस्थांनीं काळजी व्यक्त केली.

ह्या पाणी-पुरवठ्याचा पावसाशींही संबंध आहे, ही गोष्ट मला तेथें कळली. पाण्यासंबंधीं माहिती देणारे गृहस्थ म्हणत होते, " इथें दरसाल सरासरीनें जरी १३ किंवा १४ इंच पाऊस पडत असला, तरी त्यांत नियमितता मुळींच नसते. ह्यामुळें लागोपाठ दोन-दोन तीन-तीन वर्षेंही पावसाशिवाय जातात. अशा वेळीं पाण्याचे फार हाल होतात. यंदाचीच गोष्ट घ्या. ह्या वर्षीं इथें पाऊस फार कमी पडला. त्याबरोबर ट्यूब-वेल्समधील पाण्याला वरून मिळणारं प्रेशर कमी झालं आणि पाणी कमी प्रमाणांत येऊं लागलं. असं अवर्षण लागोपाठ पडलं, तर प्यायलाही पाणी मिळेल कीं नाहीं, ह्याची शंका आहे. अशा स्थितींत झाडांना पाणी कुठलं आणायचं ? म्हणून तर तुम्हांला जिकडे तिकडे हा ओसाड नि वैराण प्रदेश पसरलेला दिसतो आहे. "

## मुंबईचें स्थान घेऊं शकेल काय ?

येथें असा प्रश्न उत्पन्न होतो, कीं पाण्याची इतकी टंचाई असतांना ह्याची वाढ कशी होईल ? मुंबईवरील ताण ( लोकसंख्येचा ) कमी करण्याच्या बाबतींत कंडला बंदर कितपत उपयोगी पडेल, ह्याचा मात्र विचार करावा लागेल. जेथें जास्तींत जास्त २ लाख लोक राहूं शकतील, तेथें मुंबईवरील लोकसंख्येचा ताण कसा कमी होणार ? कामाचा ताण थोडाफार कमी होईल, हें खरें, पण तें कामही फक्त बंदरभागापुरतेंच असेल. गिरण्यांचा पसारा सहजासहजीं हलवितां येण्यासारखा नाहीं आणि म्हणूनच कंडल्याला अथवा गांधीधामला तेथील लोकांची इच्छा असूनही कापडगिरणी निघूं शकलेली नाहीं. अर्थात् तेथील हवा कापडगिरणीला कितपत अनुकूल आहे, याचाही विचार करावा लागेलच. कारण कंडला हें समुद्रकांठीं असलें, तरी तेथील हवा मुंबईप्रमाणें दमट नसून खूपच कोरडी आहे.

पाण्याच्या पुवरठ्यासंबंधीं एका मित्रानें अशी कल्पना सांगितली, कीं भाक्रा-नानगल धरणाचें पाणी राजस्थानांत येणार आहे. तेंच पुढें कच्छमध्यें आणतां आलें, तरच तेथील पाण्याचा प्रश्न सुटेल. अर्थात् पाण्याचा तुटवडा असूनही सुमारें १८ एकर जमीन, उद्यानें, बागा, नर्सरी ह्यांच्यासाठीं राखून ठेवण्यांत आलेली असून, तेथें बागाही लावण्यांत आल्या आहेत. तसेंच ८६ एकर जमीन शेतीसाठीं ठेवलेली असून, त्यापैकीं १८ एकर जमिनींत सांडपाण्यावर शेती केली जाते. तिच्यांत हिरवा चारा, फळें, भाजीपाला, भुईमूग, डाळी व धान्यें ह्यांचा समावेश होतो.

ह्या रेताड प्रदेशांत मध्येंच एखादें हिरवेंगार शेत पाहिलें, कीं मनाला किती आनंद होतो, ह्याचा अनुभव मला गांधीधामपासून कंडल्याला सायकलवरून जातांना आला. गांवाबाहेरच एका लहानशा शेतांत बाजरीचीं इवलींशीं रोपें सकाळच्या संथ वाऱ्याबरोबर हलकेंच डोलत असलेलीं पाहून सानंदाश्चर्य वाटलें. कारण तेथें विहीर, वगैरे दिसत नव्हती. पावसाळ्याच्या अखेरीस एखादा पाऊस पडला असेल आणि त्यावरच तें छोटें शेत उभें राहिलें असेल.

## शिक्षणाची व्यवस्था

रस्ते, पाणी व वीजपुरवठा, ड्रेनेज, वगैरे सोयींप्रमाणें सिंधु री-सेटलमेंट कॉर्पोरेशननें मुलांच्या शिक्षणाचीही व्यवस्था केलेली असून, ती त्यासाठीं दरसाल ५४ हजार रुपये खर्च करीत असते. त्यापैकीं १९ हजार रुपये कच्छ सरकारकडून व ३५ हजार रुपये विद्यार्थ्यांच्या फीमधून वसूल होतात. येथें बालवर्गापासून मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण तर मिळतेंच, पण त्याशिवाय सिव्हिल इंजिनियरिंग व व्यापारकला ह्यांचेही वर्ग चालविले जातात. ह्याखेरीज दवाखाने, रुग्णालयें, बँका, देवळें, चित्रपटगृहें, क्लब, वगैरे गोष्टीही येथें आहेत. सारांश, जीवनाचें कोणतेंही अंग उपेक्षित राहूं नये, ह्यासाठीं येथें शक्य तेवढी सर्व खबरदारी घेतली

जात असते. नगरपालिकेचीं कामें करण्यासाठीं 'गांधीधाम पालिका समिति' नांवाची संस्था कॉर्पोरेशननें तयार केलेली आहे.

## गांधीधामचें सुंदर स्टेशन

हा सारा भाग सपाट व वैराण असल्यामुळें, मुंबईच्या मलबारहिल-वरील हँगिंग गार्डनची किंवा कलकत्त्याच्या उद्यानांची शोभा येथें आणतां येणार नाहीं, परंतु इमारतींमध्यें सौंदर्य आणून, ही उणीव थोडीफार भरून काढण्याचा प्रयत्न चालू आहे. अशा इमारतींपैकीं गांधीधामचें स्टेशन हें एक आहे. गांधीधामांत मीं प्रवेश केला, तेव्हां रात्र असल्यामुळें ह्या स्टेशनची भव्यता माझ्या लक्षांत आली नव्हती, पण जातांना मात्र मीं तें नीट पाहून घेतलें आणि त्यानें मुंबईच्या स्टेशनला खास मागें टाकलें आहे, हें मीं स्वतःशीं कबूल केलें. सुमारें साडेसहा लाख रुपये खर्चून बांधलेल्या ह्या दुमजली स्टेशनांत चार वेटिंगरूम्स, एक मोठा वेटिंग हॉल व १३ रिटायरिंग रूम्स आहेत. हा भाग भूकंपीय प्रदेशांत मोडत असल्यामुळें स्टेशनची इमारत व बंदरांतील इमारतीही भूकंपाला दाद न देणाऱ्या, अशा बांधलेल्या आहेत.

## बकालीपणाची छाया

मीं मुख्यतः रेल्वे कॉलनीच पाहिली, पण तेथील स्वरूपावरून एकूण शहरासंबंधीं थोडी फार कल्पना आली. गांधीधाममध्यें निम्म्याहून अधिक लोक सिंधी असल्यामुळें, त्यांच्या संस्कृतीची छाप ह्या शहरावर पडली असल्यास नवल नाहीं. अस्वच्छता व गलिच्छता बऱ्याच मोठ्या प्रमाणावर तेथें दिसली. मुंबई शहर अलीकडे बकाली बनत चाललें असलें, तरी त्याला एक सुसंस्कृत परंपरा आहे व तेथील लोकांना संस्कारितेविषयीं थोडेंफार कां होईना, आकर्षण आहे. गांधीधाममध्यें तें अजिबात दिसत नाहीं. गांधीधामला जाण्यापूर्वीं मला असें कळलें होतें, कीं तेथें दारू व जुगार ह्यांचें राज्य आहे. जुगाराचें दर्शन मला झालें नाहीं, तरी दारूची मात्र कल्पना आली. माझ्याबरोबरच गाडींतून

उतरलेले एक मुंबईचे महाराष्ट्रीय गृहस्थ माझ्याच हॉटेलांत आले होते. त्यांनीं हॉटेलांत पाय ठेवतांच बीर ( दारू ) मागविली, परंतु हॉटेलांत फक्त ब्रँडीच होती आणि खालचें दारूचें दुकान बंद झालें होतें. त्यामुळें त्या गृहस्थांचा कसा जळफळाट झाला, तें मीं डोळ्यांनीं पाहिलें व मनांतल्या मनांत मला हसूं आलें.

अशा ह्या शहरांत सुसंस्कृत गुजराती समाज कितपत समरस होईल हें सांगणें कठीण आहे. सिंधी लोकांनंतर पंजाबी व मारवाडी लोकांची संख्या मात्र येथें वाढण्याची शक्यता जास्त आहे, कारण त्यांना हा भाग जवळ असून, येथील हवापाणी त्यांच्या परिचयाचें आहे. ह्यामुळें मुंबईवर गुजराती धनिकांना जसें वर्चस्व प्रस्थापित करतां आलें, तसें येथें करतां येईल, अशी फारशी शक्यता दिसत नाहीं. येथील स्थानिक जनता म्हणजे कच्छी लोकही सिंधी, पंजाबी, मारवाडी लोकांप्रमाणेंच व्यापारी असून त्यांचाही बराच प्रभाव ह्या बंदरावर राहील, असें दिसतें. सध्याच त्यांना बिगर कच्छी लोकांचें आगमन आवडेनासें झालेलें आहे !

हमाली व कारकुनी करणाऱ्या मराठी माणसांना मात्र येथें चांगलाच वाव आहे. अर्थात् इंजिनिअरिंग, वगैरे खात्यांत मोठमोठ्या हुद्द्यांवर असणारे अनेक महाराष्ट्रीयही येथें पाहायला मिळाले.

आणखी एका बाबतींत हें स्थान महत्त्वाचें ठरणार आहे. ती बाब म्हणजे विमानतळ. आज युरोपला जातांना कराचीचा विमानतळ टाळतां येत नाहीं. त्याला तोड म्हणून, कंडला येथें एक प्रचंड आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यांत येणार आहे. तो तयार झाल्यानंतर कराचीच्या सागरी महत्त्वाप्रमाणें आकाशीय महत्त्वही हिंदुस्थानच्या दृष्टीनें पुष्कळच कमी होईल आणि दोन्ही बाबतींत भारत बराच चांगला स्वावलंबी होईल, असें समजायला हरकत नाहीं. ह्या दृष्टीनें ह्या बंदराचें सर्व भारतीयांनीं मनापासून स्वागतच केलें पाहिजे.

**स मा प्त**

REFBK-0017699

REFBK-0017699